# ऐंद्रजाल



- सुप्रिया जोशी

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# ऐंद्रजाल

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# ऐंद्रजाल

(कादंबरी)

लेखिका

सुप्रिया जोशी

# ऐंद्रजाल


## लेखिका: सुप्रिया जोशी,

व्हाट्सएप नंबर +254738475843
पत्ता- नैरोबी, केनिया
wagmayik@gmail.com

मुखपृष्ठ: श्रेयस मकरंद शाळीग्राम
पत्ता - 56, "मकरंद", पावनगर, चिंचवडगाव, पुणे, ४११०३३
फोन नंबर +९१ ८८०६७ ७९३२८



या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**Whatsapp: 9987737237**

प्रकाशन : १२ ऑक्टोबर २०२२, अश्विन कृष्ण तृतिया शके १९४३



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# मनोगत



नमस्कार,

'ऐंद्रजाल' हे माझे प्रकाशित होणारे तिसरे पुस्तक! एकदा लिहिण्याचा नाद लागला की सारखे सुचत जाते व तसे आपण लिहीत जातो, माझेही तसेच झाले. पहिले पुस्तक 'रंगीन दुनियेचे रोमांचक अनुभव (RDRA)' हे प्रवासादरम्यान घडलेल्या प्रसंगावर आधारित आहे, तर दुसरे पुस्तक 'अश्रुतपूर्व' ही वेगळ्या प्रकारची कौटुंबिक कथा आहे जिथे कोणाचीच चूक नसताना प्रत्येक सदस्याची झालेली कुचंबणा व्यक्त केली आहे. दोन्ही पुस्तकांना भरघोस प्रतिसाद मिळाला. 'अश्रुतपूर्व' ह्या कादंबरीला प्रेक्षकांचे खूप वेगवेगळ्या प्रकारचे मनोगत, प्रतिसाद वाचून कधीकधी भरून आले तर अरे ह्या कथेला असा वेगळा दृष्टिकोनसुद्धा असू शकतो हे जाणवले.

अगोदर 'अश्रुतपूर्व -भाग २' लिहायला सुरुवात केली होती पण लिहिताना वेगळीच कथा सुचायची. शेवटी ही कादंबरी अर्धवट सोडून, नवीन कथा लिहायला सुरुवात केली. ही गोष्ट संगीता, आनंद व आईला वाचायला दिली. त्यांना जेव्हा ही गोष्ट खूपच आवडली व माझा भाचा श्रेयस हा लगेच मुखपृष्ठ करून द्यायला सुद्धा स्वतःहून तयार झाला त्यावेळी अर्थातच लिहून झालेली गोष्ट इसाहित्यच्या सुनीळ सामंत ह्यांना पाठवली व आज ती प्रकाशित होत आहे.

मला प्रोत्साहन देणाऱ्या सगळ्या वाचकांचे मला मनापासून आभार मानायचे आहेत. त्यांच्यामुळेच मला अजून लिहायला हुरूप येतो. असाच प्रतिसाद देत रहा.

लिखाणाबरोबरच मला, माझ्या मुलींना, आईला इतरही छंद आहेत. मला विविध सामग्रीसह विविध प्रकारच्या गोष्टी तयार करण्यात आनंद होतो. मला क्रोशे करायला, रांगोळी काढायला शिवाय आर्ट अँड क्राफ्ट मध्ये पण रुची आहे. त्याबरोबरच माझ्या दोन्ही मुली खूप उत्कृष्ट नृत्य करतात शिवाय त्या नृत्यदिग्दर्शन सुद्धा करतात. तर ह्यासंदर्भाचे वेगवेगळे व्हिडिओसाठी मी एक यूट्यूब चॅनल शिवाय इंस्टाग्राम अकाउंट सुरु केले आहे. सगळे व्हिडिओज नक्की बघा आणि तुम्हाला कसे वाटले हे सांगाल. त्याच्या लिंक मी इथे देत आहे.

https://www.youtube.com/user/wagmayik

https://www.instagram.com/myhobby_mycreation/

आपल्या सर्वांना हे पुस्तकसुद्धा खूप आवडेल ही अपेक्षा आहे!.


सुप्रिया


सुप्रिया जोशी यांची गाजलेली पुस्तके.

दोन्हीही पुस्तकांचे विषय जगावेगळे आहेत. मराठीत तर प्रथमच.

नक्की वाचा.

क्लिक करताच पुस्तक उघडेल.



माझे लिखाण

मी

आईबाबा, आनंद, जान्हवी, आर्या, संगीता व सागर

ह्यांचे प्रोत्साहन नसते तर लिहूच शकले नसते.

# प्रस्तावना

जन्माला आल्याबरोबरच मितालीची आई तिला सोडून कायमची निघून गेली. त्याचे शल्य मितालीला नेहमीच वाटत असते. जाताजाता आई मितालीला नाव तर देऊन जातेच पण तिला मोगऱ्याच्या हवाली सुद्धा करून जाते. मोगरा व घरातल्या सर्वांची लाडकी असणारी मिताली व कुटुंबीय आपले आयुष्य छान जगत असतानाच अचानक त्यांच्या आयुष्यात एक मोठे झंझावात येऊन सर्वांचे आयुष्य बदलून जाते.

त्या सर्व अकल्पित घडणाऱ्या घटनांना सर्व कुटुंबीय मात देतात, त्याच्याशी लढतात की एकमेकांच्या विरुद्ध जाऊन उध्वस्त होतात हे जाणून घेण्यासाठी नक्की वाचा ऐंद्रजाल!.....

सुप्रिया

# ऐंद्रजाल

# एक

रोजच्याप्रमाणे आजपण मोगऱ्याने हळुवारपणे उठवले. प्रसन्न अंतःकरणाने आळोखेपिळोखे देऊन, उठून अगोदर मोगऱ्याला 'सुप्रभात' म्हंटल्यावर त्यानेपण मान हलवून प्रसन्नचित्ताने हसल्यावर मग मी माझ्या दिवसाची सुरुवात केली. रोज सकाळी उठल्यावर मोगऱ्याचे तोंड बघितल्याशिवाय मी कोणालाही भेटायचे नाही.

आमच्या मोगऱ्याला खूप मोठमोठ्याने बोलता येत नव्हते किंबहुना तो फक्त माझ्याशी बोलायचा. ना त्याला काही काम करता येत होते, त्याला बिचाऱ्याला जागेवरून पण उठता येत नव्हते तरीही त्याची उपस्थिती आम्हा सगळयांसाठी प्रसन्नदायी तर होतीच पण खूप सारा आधार देणारी होती. घरात सगळेचजण त्याच्याशी खूप जोडलेले होते. कोणीही उदास असले तरीही आम्ही त्याच्याकडे जाऊन बसायचो, आमच्या मनातल्या भावना बोलून दाखवायचो. आम्ही खुश असलो तर तो आनंदाने मान डोलवायचा, आम्ही उदास असलो तर तो शांत राहून आमचे सगळे ऐकून घ्यायचा. असा हा आमचा मोगरा सगळयांच्या खूप जवळचा!

"मोगऱ्याबरोबर गप्पा झाल्या असतील तर आता स्वयंपाकघरात पाऊल ठेवा", आजीचा आवाज ऐकल्यावर मोगरा आणि मी दोघे हसलो. मी स्वयंपाकघरात पळत जाऊन आजीला मिठी मारली. "काय ग हे, सकाळी उठल्यावर आधी देवाला नंतर घरातील मोठ्यांना नमस्कार करावा. तर तुमचे वेगळेच! मिठ्या काय मारता, पप्या काय देता.. जगावेगळेच सगळे" ह्यावर काकूने हसून,"अहो आई, आता हे सगळे एकदम सामान्य झाले आहे. आपल्या सगळ्या रीती जगावेगळ्या झाल्या आहेत हो". आजीने मस्त नुकतेच काढलेले गाईचे ताजे दूध प्यायला दिले. श्रीला कच्चे दूध आवडत नसल्याने तापवून मला त्याला नेऊन द्यायला सांगितले. त्यावर मी तिला,"मलामात्र तू स्वयंपाकघरात स्वतः येऊन दूध घेऊन प्यायला सांगतेस, त्यावेळी आपल्या चालीरीती सांगतेस. श्रीलामात्र कुठलीही बंधन नाहीत. त्यानेपण सगळ्यांना नमस्कार केला पाहिजे. इथे येऊन दूध घेतले पाहिजे ना". आजीने त्यावर,"अगं बाई! तुला लग्न करून सासरी जायचे आहे. त्यामुळे तुला आपल्या सर्व चालीरीती, संस्कार, स्वयंपाक ह्या सगळ्या गोष्टी आल्याच पाहिजे. महत्वाचे म्हणजे अंगात जरा नाजूकपणा यायला हवा, धुसमुसळेपणा असून चालत नाही". बाबा आत येतायेता,"हे सगळे रोजचे संवाद ऐकले म्हणजे दिवस सुरु झाला असे वाटते" असे म्हणून त्यांनी घंटा वाजवून देवपूजेला सुरुवात केली. लगेच आजीने,"बघ, श्रीधनने पूजेलापण सुरुवात केली तरी अजून तू फुले घेऊन आली नाहीस. मी

तोंडाला लावलेला दुधाचा कप खाली ठेवून फुले आणायला उठल्यावर परत,"रोज कसे ग तुला सांगावे लागते? अगोदर दूध संपवा, नंतर जाऊन फुले आणा". मी तिकडून हळूच काढता पाय घेतल्यावर काकूने,"भाऊजी, तिच्यावर अवलंबून राहिलात तर तुमची पूजा फुलांशिवायच होणार हो!" असे म्हणून सकाळीच काढून आणलेली फुलांची परडी तिथे ठेवली.

मी जाऊन श्रीला गुदगुल्या करून उठवल्यावर त्याने मला उशीने जोरात मारले. मी खूप जोरात लागल्यासारखे भासवून खूपच जोरात ओरडले. ते ऐकून श्री रोजच्याप्रमाणे एकदम उठून 'आमच्या चिमणीला जोरात लागले का?" असे म्हणून मला जोरात मारले. त्यावर मी अजून जोरात ओरडले. त्यावर आजीने स्वयंपाकघरातूनच,"श्री अरे का मारतोस तिला? मुलीची जात आहे कुठे लागले तर कोण लग्न करेल तिच्याशी?" असे म्हंटल्यावर त्याने हळूच,"तुला काय कुठलेतरी व्यंग असलेला मुलगा मिळाला तरी चालण्यासारखे आहे. हो ना!" असे म्हंटल्यावर मी त्याला जोरात उशी फेकून मारून तिथून रागाने फणफणत आवरायला निघून गेले. त्यानंतर काकूने श्रीला आवाज देऊन,"स्वयंपाकघरात येऊन दूध पिऊन जा म्हणून सांगितले."

मी बंबातले गरम पाणी काढून बादली न्हाणीघरात नेऊन ठेवली तर श्री लगेच आत घुसला. मी परत आरडाओरडा सुरु केल्यावर काकाने येऊन

बाहेरून कडी लावून घेऊन माझ्या डोक्यावर टपली मारून निघून गेला. श्रीने खूप हाका मारूनही काकाने दार उघडले नाही. शेवटी आजीनेच येऊन दार उघडून आम्हाला दोघांना ओरडून निघून गेली. श्री बाहेर येऊन,"काय हो बाबा, तुम्ही अंघोळपण करू देत नाही. मी कपडे नेले नव्हते ना आत" असे म्हणून तो तिथेच ठेवलेले कपडे आत घेऊन जाईपर्यंत काकाने गरम पाण्याने भरलेली दुसरी बादली आत ठेवून मला पटकन जायला सांगितले. त्यावर श्री काकावर खूप चिडला पण मी मात्र खुश झाले होते.

आम्ही आवरून निघालो. श्रीने बाईक सुरु केली आणि मी पटकन पळत परत आत गेले. त्यावर श्री,"मला ऑफिसला जायला उशीर होतोय, रोजचे आहे हिचे, घरातून निघतानाच मोगऱ्याला सांगून निघायचे तर ते नाही, मी बाईक सुरु केली की ही परत जाते. रोज कशी ग विसरतेस?" असे जोरात ओरडला. श्रीने त्याच्या बाईकवरून मला कॉलेजला सोडून थोडे पैसे हातात देऊन ऑफिसला निघून गेला.

आमच्या घरातली ही रोजची सुरुवात!

कॉलेजला गेल्यावर मी लगेच वर्गात जाऊन बसले तर अनिता माझी वाटच बघत होती. "थोडे लवकर यायला काय होते ग तुला? रोज तास सुरु व्हायच्या अगोदर २ मिनिटं येतेस" तिची तोंडाची तोफ थांबवत मी तिला,"अगं शिऱ्याला रोज उशीर होतो आवरायला, त्यामुळे तो मला

उशिरा सोडतो. काय करू ग!" अशी बिनधास्त थाप मारली. तोपर्यंत प्रधान मॅडम वर्गात आल्या. आम्ही शांत बसून अभ्यास करायला सुरुवात केली. अनिता, माझी जिवलग मैत्रीण. मी आणि ती दोघीही तश्या शांत होतो. अभ्यासात खूप हुशार नव्हतो पण तरीही सगळ्या तासांना हजेरी लावायचो. आम्ही दोघी खूप सर्वसामान्य मुली असल्यामुळे कॉलेजमध्ये दुर्लक्षित होतो. ती आमच्च्या घरीच पडीक असायची. माझ्यासारखा तिलापण मोगऱ्याचा खूप लळा होता. मोगऱ्यालापण ही खूप आवडायची.

आम्ही दोघी रोज दुपारी कॉलेजमधून एकत्र घरी जायचो. गेल्यागेल्या आम्ही अगोदर मोगऱ्याजवळ जाऊन बसायचो. त्याच्याबरोबर गप्पा मारून झाल्या की मग पोटात भुकेचे डोंब उसळायचे. आम्ही आलेलो कळताच काकू नाश्ता करायला लागायची. त्यामुळे हातपायतोंड धुवून आल्याआल्या आम्हाला गरमगरम नाश्ता खायला मिळायचा. नाश्ता करून आम्ही थोडावेळ अभ्यास करून कर्णिक आजींकडे पेटी शिकायला जायचो. एक तास तिथे घालवला की नंतर असेच कुठेतरी गप्पा मारत हिंडायचो. पण ६ वाजले की मोगरा मला हाक मारायचा. त्याची हाक ऐकू आली की मी कुठेही असले तरीही अनिताला 'टाटा' करून लगेच घरी जायची.

परत आले की हातपाय तोंड धुवून होईपर्यंत श्री घरी आला की आम्ही दोघे शुंभंकरोति म्हणायचो. रोज तेचतेच श्लोक म्हणायचा कधीतरी कंटाळा यायचा पण श्री मला समजावून सांगायचा,"अगं, आजीच्या थोड्याथोड्या अपेक्षा आपण पूर्ण केल्या तर काय बिघडणार आहे? किती छोट्याछोट्या गोष्टींमधून आनंद मिळतो तिला! किती जीव आहे आणि तिचा तुझ्यावर...." त्याचे वाक्य मी अर्धेच तोडून,"आजीचे माझ्यावर काही प्रेम नाही हो. तिचा फक्त तुझ्यावर जीव आहे. माझ्यावर तर नुसते चिडते. मुलीच्या जातीला हे यायला हवे, ते यायला हवे, हे कर, ते कर, एवढेच असते." श्री समजवायचा,"अगं, जुन्या पिढीतली आहे ग ती! तिच्यामते लग्न झाल्यावर तुला कोणी नावे ठेवू नयेत, तुझे सगळे व्यवस्थित व्हावे म्हणून ती अशी वागते. पण तिला किती कौतुक आहे तुझे, हे तुलापण माहित आहे. मला सांग, आजी तुला ओरडते पण काही खायला केलेतर अगोदर तुला देते, कुठे गेली तर आवडीने तुझ्यासाठी काहीतरी घेऊन येतेच ना! मग घ्यायचे थोडे ऐकून!" असे म्हंटल्यावर मी त्याला घट्ट मिठी मारायची. हे आजीने बघितले तर मात्र ती शिऱ्याला जोरदार दणका देऊन,"अरे श्री, मोठी झालीये ना ती आता. मिठ्या वगैरे काय मारता रे?" असे म्हणून खूप चिडायची पण तो कधी मीच त्याच्याजवळ जाते हे सांगायचा नाही. श्रीशी मी भांडत असले तरीही मला त्याच्याशिवाय करमायचे नाही. त्याचेपण माझ्यावर खूप प्रेम. खूपदा आजी बोटे मोडून,"श्री

लग्न झाल्यावर आपल्या बहिणीला विसरू नकोस हो! दोघांचे प्रेम शेवटपर्यंत असेच राहू दे."

सकाळचा नाश्ता, स्वयंपाक सगळे आजी करायची पण संध्याकाळच्या स्वयंपाकाची जबाबदारी माझी आणि काकूची असायची. काकू बरेचदा एकटीच सगळे करायची पण आजी आली की मग मात्र मला स्वयंपाक करायला लागे. जेवणे उरकली की सगळे आवरून मी हळूच मोगऱ्याकडे गप्पा मारायला जायची. खरेतर मला संध्याकाळनंतर मोगऱ्याकडे जायला परवानगी नव्हती पण मी सगळे झोपायला गेले की हळूच त्याच्याबरोबर गप्पा मारायला जायची. हा माझा खूप चांगला आणि घनिष्ट मित्र! तोपण फक्त माझ्याशीच बोलायचा. माझ्याशी खुप छान गप्पा मारायचा. मला बघितले की एकदम कळी खुलायची त्याची.

रोजच्याप्रमाणे आजपण जेवणं झाल्यावर सगळे झोपले ह्याची खात्री करून मी हळूच मोगऱ्याकडे धाव घेतली पण मोगऱ्या आज खूप उदास दिसत होता. त्याला "काय झाले?" म्हणून विचारल्यावर खाली तोंड करून बसला. नेहमी उत्साही असलेला माझा भिडू इतका उदास का आहे तेच कळत नव्हते. एकदम माझ्या लक्षात आले की उद्या आईचे वर्षश्राद्ध आहे. हे आठवल्यावर मीपण खूप उदास झाले, त्याला खेटून बसल्यावर त्याने मला जवळ घेऊन,"आमच्या ताईला आठवले का? मला वाटले ह्यावर्षी

विसरली की काय!" त्याने असे म्हंटल्यावर तर मी आणखीन खट्टू झाले. “असे कसे विसरेन रे! आज सगळे श्राद्धाचीच तयारी करत होते ना!”

"मी झाले आणि आई गेली. माझ्यामुळेच आई गेली रे. स्वतःचा जीव धोक्यात घालून आईने मला का जन्म दिला तेच कळत नाही मला. मी खूप चिडले आहे तिच्यावर. तिला स्वतःच्या जीवापेक्षा माझा जीव इतका महत्वाचा का वाटला? तिच्याशिवाय मी कशी राहेन असा विचार तिच्या मनात का नसेल आला? सगळे लाड करतात माझे. मला काही हवेनको बघतात. बाबांनी तर सगळ्यांनी इतके सांगूनसुद्धा माझ्यासाठी दुसरे लग्न केले नाही. काकूने तर आता ही माझीच मुलगी आहे असे ठरवून दुसरे बाळपण होऊ दिले नाही. माझ्यावर आणि श्रीवर काकाकाकू दोघेही तसेच प्रेम करतात किंबहुना श्रीपेक्षा माझ्यावर जास्त प्रेम करतात पण तरीही आई ती आईच असते ना! मला खूप आठवण येते रे तिची. तिने मला असे सोडून जायला नव्हते पाहिजे." मोगऱ्यालापण माझी समजूत कशी काढावी तेच कळत नव्हते. तरीही तो माझी समजूत काढायचा प्रयत्न करत,"मिताली, असे रडू नकोस ग! तू रडायला लागली की मला काही सुचत नाही माहित आहे ना तुला! घरी सगळे किती प्रेम करतात तुझ्यावर. काकू आणि आजी तुला आईची कमी तरी जाणवून देतात का सांग बरं मला. काका तर तुझ्या सगळ्या इच्छा पूर्ण करतो आणि श्रीतर तुझ्यावर जीव ओवाळून टाकतो. अनितासारखी किती गोड मैत्रीण लाभली आहे तुला. हो तू मलातर पूर्ण

विसरलीस ना! बाबांनी आईला स्मशान घाटावर नेले होते तिथेच मला असे अचानक खाली पडलेले बघितल्यावर उचलून घरी आणले. मी जेव्हा घरी आलो ना तेव्हा माझ्यात जीवपण नव्हता. पण बाबांनी मला खूप प्रेम दिले. मला घरी घेऊन येताना वाटेतच मला म्हणाले होते,"मैथिली आम्हाला सोडून गेली पण तुला बघितल्यावर ती मला कानात येऊन म्हणाली ह्या मोगऱ्याला घरी घेऊन जा, आपल्या मितालीला खूप आधार देईल हा. म्हणून तुला मी घरी घेऊन आलोय. काहीही झाले तरी तुला घरी छान राहिलेच पाहिजे. अगं तुझ्या आईने तर तुझे नावपण तिथेच ठेवले होते. आईने बाबांना हे नाव तेव्हा सांगितले होते, म्हणून तर तुझे नाव ‘मिताली’ ठेवले. बघ आईला तुझी किती काळजी होती ते आणि मला खात्री आहे आईला अजूनही तुझी काळजी असणारच आहे." असे म्हंटल्यावर मी मोगऱ्याला अजूनच चिकटून झोपले.

श्रीला माझी ही सवय माहित असल्याने तो रोज रात्री मी आत येऊन झोपले की नाही ही खात्री करायचा. बरेचदा मी मोगऱ्याजवळच झोपून जायचे त्यावेळी तो मला उठवून आत झोपवून नंतरच झोपायला जायचा. आजपण तो आला तर मला असे बघून एकदम घाबरला. मला मोगऱ्याने त्याच्या मिठीत घेतले होते आणि मी शांतपणे त्याच्या मिठीत झोपले होते. मोगऱ्या आज काही वेगळाच दिसत होता. त्याला बघून श्रीच्या तोंडून आवाजच फुटेना! तरीही हिंमत करून तो थोडा जवळ आला आणि त्याने

मला आवाज दिला पण मी गाढ झोपले होते. मोगऱ्या खरेतर माझ्याशिवाय कोणाशीच बोलायचा नाही पण आज चक्कचक्क तो श्रीशी बोलला, "हे बघ श्री, आज मिताली खूप उदास आहे त्यामुळे तिला इथेच झोपू दे. मी काळजी घेतो तिची, तू जा"

हे ऐकून तर श्री आणखीनच दचकला,"अरे मोगऱ्या तुला बोलता कसे यायला लागले? काय झाले?"

त्यावर मोगऱ्या,"हे बघ श्री, तुझ्या आवाजाने मिताली उठायची, तू आत जातोस की नाही?" असे म्हणून त्याने श्रीला जोरात फटका मारला.

श्री खूपच घाबरून गेला. त्याला काय करावे कळेना. तो तसाच आत जाऊन सगळ्यांना बाहेर बोलावून घेऊन आला तर मोगऱ्याने मला एकदम घट्ट धरून ठेवले होते. बाबांनी त्याच्याजवळ यायचा प्रयत्न केल्यावर त्याने बाबांनासुद्धा एक जोरदार ठेवून दिली. मोगऱ्याला एकदम काय झाले तेच कळत नव्हते. आज तो खूपच विचित्र वागत होता. काकाने त्याला,"मोगऱ्या उद्या मैथिलीचे श्राद्ध आहे, तू जर असा आज वागायला लागलास तर तिला किती वाईट वाटेल विचार केलास का? तुला तिने मितालीचे रक्षण करण्यासाठी, तिची काळजी घेण्यासाठी पाठवले आहे ना! मग तू तिला रात्रीचे असे स्वतःजवळ झोपवून घेतलेस तर तिला आवडेल का?" असे म्हंटल्यावर त्याने त्याची मिठी सैल केली. श्रीने हळूच जवळ येऊन मला उचलून घेतलं. मी खूपच गाढ झोपले होते. त्यामुळे मला तसेच उचलून घेऊन तो मला आत घेऊन आला. काकूने मला तिच्या खोलीत

झोपवायला सांगितले. काका, बाबा आणि श्री तिघेही तिथेच खाली गाद्या घालून झोपले.

मी एकदम गाढ झोपलेले असताना त्यांना कोणालाच झोप येत नव्हती. काकू तर खूपच घाबरली होती,"मला ना एवढ्यात मोगरा खूपच वेगळा वाटत आहे. त्याचा आकारपण किती विचित्र झाला आहे बघितले का? मागच्या आठवड्यात मी त्याच्याजवळ गेले तर त्याने मला एकदम ढकलून दिले. मला वाटले माझाच तोल जाऊन मी पडले. पण त्याच दिवशी संध्याकाळी आई त्याच्याकडे गेल्यातर त्यांनापण ढकलून दिले, मी त्यांच्या मागेच असल्याने त्यांना धरले. आम्ही दोघींनी आम्हालाच काहीतरी भास होत असेल म्हणून सोडून दिले. पण आज हे सगळे बघितल्यावर हे प्रकरण नक्कीच काहीतरी वेगळे आहे असे वाटत आहे." खरेतर घरी कोणाचाच अंधश्रद्धेवर, भुताखेतांवर विश्वास नव्हता पण आजचे सगळे बघितले असल्याने कोणी काहीच बोलले नाही.

त्यादिवशी आईचे श्राद्ध असल्याने सगळ्यांनीच सुट्टी घेतली होती. आईचे श्राद्ध झाल्यावर मी एक ताट मोगऱ्यासमोर नेऊन ठेवल्यावर त्याने माझ्या हाताला विळखा घातला. जेवणासाठी सगळे थांबले असल्याने मी त्याला,"मोगराबा सोडा हो मला. सगळे जेवायला थांबले आहेत." असे म्हणून मी विळखा सोडायचा प्रयत्न करायला लागले तर त्याने तो विळखा आणखीनच घट्ट केला. मी त्याला,"मोगऱ्या, मला दुखत आहे बरं! सोड हा

विळखा" असे जोरात ओरडल्यावर त्याने पटकन विळखा सोडला. मी तसेच हात चोळत येत असतानाच श्री आला व त्याने,"तू कशाला आलीस ताट ठेवायला? मी ताट ठेवतो म्हणून सांगितले होते ना तुला" असे म्हणून जोरात ओरडला. आम्ही तसे मोगऱ्यापासून २-२ हात तरी लांब असू पण तिथून त्याने श्रीला जोरात दगड फेकून मारला आणि,"मितालीला ओरडलास ना तर फेकून देईन हं मी तुला इथून"असे एकदम ओरडला. त्याचे हे अक्राळविक्राळ रूप बघून आम्ही दोघे खूप घाबरलो, दोघांच्याही तोंडून शब्दच फुटेना. तेवढ्यात अनिता तिकडून जात असताना तिने आम्हाला असे घाबरलेले बघितल्यावर आमच्या जवळ आली. म्हणाली,"श्री अरे कोणी दगड मारला तुला? मी तुला दगड लागताना बघितले पण इथेतर कोणी नाही." असे म्हंटल्यावर आम्ही मोगऱ्याकडे बघितले तर त्याचे रूप एकदम व्यवस्थित झाले होते. आम्ही तिघेही आत गेलो., कशीबशी जेवणं उरकली. काकूने आज पहिल्यांदा अनिताला घरी जायला सांगितले.

मी आणि श्री त्याच्या खोलीत आलो. मी त्याच्या हातावर डोके ठेवून झोपले होते. एरवी आजीला आम्ही दोघे एकत्र झोपलेलो अजिबात खपायचे नाही पण आजमात्र तिने तिथे येऊन आमच्या दोघांच्या तोंडावरून हात फिरवून डोक्यावर हात मोडून निघून गेली. आज दुपारी मोगऱ्याने काय केले कोणालाच माहित नाही तरीही सगळे असे का वागत आहेत तेच कळत

नव्हते. मी श्रीला तसे सांगितल्यावर त्याने काल रात्री झालेला सगळा प्रकार मला सांगितला. मला ह्यातले काहीच कसे आठवत नव्हते? इतकी गाढ झोप कशी काय लागू शकते? काहीच कळत नव्हते. श्रीलापण तेच आश्चर्य वाटत होते. श्राद्धाच्या दिवशी आमच्या घरातले वातावरण तसे उदासच असायचे पण आजतर हे वातावरण नुसतेच उदास नसून भयावहसुद्धा झाले होते. घरी अंगावर येणारी शांतता होती. जवळपास रात्रभर जागल्याने श्रीला लगेच झोप लागली. मलामात्र झोप लागत नव्हती.

मोगऱ्याला एकदम काय झाले असेल हे न सुचून मी हळूच तिथून उठून परत त्याच्याजवळ आले. मी अगदी त्याच्याजवळ जाऊन बसले. तर त्याने मला घट्ट मिठी मारून,"मिताली, तुला माहित आहे का की मैथिली तुला माझ्या भरवश्यावर सोडून गेली आहे. म्हणून तर तिने मला बरोबर बाबांच्या पायापाशी आणून सोडले आणि बाबा मला इथे घेऊन आले. नाहीतर मी इथे कशाला आलो असतो? हे बघ, इथे सगळी लोकं स्वार्थी आहेत. बाबांचे त्यांच्या ऑफिसमधल्या पांढरेबाईंशी चक्कर चालू आहे. म्हणून तर ते रोजच रात्री घरी उशिरा येतात. काकाकाकू तुला इतके प्रेम करतात हे फक्त दाखवतात कारण त्यांना ही सगळी मालमत्ता श्रीला द्यायची आहे. तुझ्याशी गोड बोलून तुला फसवून ते हे सगळे कधी श्रीच्या नावावर करतील तुला कळणारपण नाही. आजी काय पिकले पानं आहे. तिचे आयुष्य संपत आले...." मी त्याचे वाक्य अर्धे तोडून "मोगऱ्या तुला

आजीविषयी असे बोलताना लाज नाही वाटत. हे बघ तुला काकाकाकूंविषयी गैरसमज झाला आहे, ते मला मुलगीच मानतात आणि बाबांचे आईवर खूप प्रेम आहे, ते स्वप्नातदेखील असे काही करणार नाहीत. तू इथे एका जागेवर बसतोस आणि स्वतःला सगळे माहित असल्यासारखे दाखवतोस", असे एकदम चिडून बोलल्यावर,"मी जे खरे आहे ते सांगतोय. मी स्वतः काकाकाकूंना बोलताना ऐकले आहे. त्यांच्या हे लक्षात आले आहे की, मला त्यांच्याबद्दल सगळे कळले आहे त्यामुळे ते मला इथून हाकलून लावतात की नाही बघ. मग तू एकटीच पडशील ग. त्यापेक्षा तू एक काम कर, मला बरोबर घे. गावाकडे आपले एक घर आहे जे कोणालाच माहित नाही. तिथे आपण दोघे आरामात राहुयात."हे सगळे ऐकून तर मला चक्कर यायचीच बाकी होती. तोपर्यंत काका बाहेर आला, त्याने मला तिथे बघितल्यावर त्याचा रागाचा पाराच चढला," धनू, हे बघ ही कार्टी परत इथे येऊन बसली. बोललेले कळतच नाही हिला" असे म्हणून मला हात धरून घेऊन जाणार तितक्यात मोगऱ्याने त्याच्या दोन्ही हाताला इतक्या जोरात विळखा घातला की तो खूपच जोरात विव्हळला. मी मोगऱ्याचा विळखा काढायचा प्रयत्न करत होते तर तो आणखीनच घट्ट होत होता. काकाचा आवाज ऐकून सगळेच बाहेर आले होते. माझ्याबरोबर बाबा, श्री, काकू सगळेचजण विळखा काढायचा प्रयत्न करत होते पण जसे आम्ही विळखा काढायचा प्रयत्न करत होतो तसतसा तो घट्ट होत होता. काकाचा हात काळानिळा पडायला सुरुवात झाली होती. ह्याला अचानक काय झाले तेच

कळत नव्हते. मी मोगऱ्यासमोर हात जोडले,"मोगऱ्या तुझे माझ्यावर थोडेजरी प्रेम असेल तर काकाला सोड" असे म्हंटल्यावर त्याने काकाचा विळखा जोरात काढून घेतला. काकाबरोबर सगळेच जोरात खाली पडले. मी सगळ्यांना हात देऊन परत उभे केले. बाबा काकाला घेऊन दवाखान्यात जायला म्हणून निघाले. काकू आणि आजी तिथेच रडायला लागल्या तर श्री रागाने कुऱ्हाड घेऊन आला. त्याने मोगऱ्यावर जोरदार खालूनच वार केला. त्याचा वरचा भाग उडून दुसरीकडे पडला आणि तिथून रक्त वाहायला लागले. ते बघून तर आम्ही सगळे खूपच घाबरलो. तिथेच कुऱ्हाड टाकून आम्ही सगळे आत गेलो. सगळी दार खिडक्या बंद केली. बाहेर असलेली गाय आणि तिला नुकतेच झालेले पिल्लू पण रडायला लागले. गाईच्या हंबरायचा आवाज नकोसा होत होता पण आम्ही सगळे खूपच घाबरलो होतो. थोड्यावेळाने श्रीने बाबांना फोन करून झालेले सगळे सांगितले. पण मोगऱ्यातून रक्त कसे येऊ शकते ह्याचे आम्हाला राहून राहून आश्चर्य वाटत होते.

जवळपास तीन तासांनी काका आणि बाबा एका विचित्र दिसणाऱ्या माणसाला बरोबर घेऊन आले. मी आतूनच त्याला बघत होते. श्रीने आम्हाला तिघींना आत बसायला सांगून तो बाहेर गेला. हळू आवाजात त्यांची बराच वेळ कुजबुज चालू होती. आम्हाला नीट ऐकू पण येत नव्हते. त्या बाबांनी बहुतेक मला बाहेर बोलवायला सांगितले. श्री जेव्हा मला

बोलवायला आला तेव्हा आजीने ठामपणे नकार दिला व स्वतः त्याच्याबरोबर बाहेर गेली. ते बाबाजी खूप चिडलेले वाटत होते. रागारागाने तणतणत ते निघून जायला लागले. जाताना,"मला आजपर्यंत कोणीच असे अपमानित केले नाहीये. तुमच्या घराचे वाट्टोळे वाट्टोळे होणार आहे. ह्यातून तुम्हाला फक्त मीच सावरू शकतो लक्षात ठेवा. कितीही फिरा तुम्ही परत माझ्याकडेच येणार", असे म्हणून दाराबाहेर पडले आणि मोगऱ्याच्या धडावर जाऊन जोरात आदळले. मोगऱ्याने त्यांना उचलून बाहेर फेकून दिले आणि आत यायला लागला पण बाबांनी पटकन जाऊन दार बंद केले. आम्ही सगळेजण खूपच घाबरलो होतो.

मी त्यांना माझे मोगऱ्याशी झालेले बोलणे सांगितल्यावर सगळ्यांनीच आश्चर्याने एकमेकांकडे पहिले.

रात्री एकदम जोरजोरात दार वाजवायचा आवाज यायला लागला. इतक्या जोरजोराने कोण दार वाजवतय म्हणून आम्ही 'कोण' म्हणून विचारल्यावर काहीच उत्तर आले नाही. थोड्यावेळाने परत कोणीतरी जोरजोरात दार वाजवायला लागले. आम्ही सगळे घाबरून एकमेकांना चिकटून बसलो.

“मी नीट सांगतोय बऱ्याबोलाने दार उघडा. मला जबरदस्तीने आत यायला लावू नका. दार उघडताय का मी दार तोडून आत येऊ?" आम्ही कोणी काहीच उत्तर दिले नाही म्हंटल्यावर थोडे शांत होऊन,"ठीक आहे, तुम्ही दार उघडू नका, मितालीला बाहेर पाठवून द्या. तुम्हाला माहित आहे माझे तिच्यावर प्रेम आहे. मी तिला काहीच करणार नाही." आमच्या उत्तराची वाट बघून तो खूपच खवळला,"मी तुम्हाला पाच मिनिटाची वेळ देतो. एकतर दार उघडा नाहीतर मितालीला बाहेर पाठवा. पाच मिनिटानंतर तुमचे काही खरे नाही लक्षात ठेवा" असे बोलल्यावर मी शहाणी होऊन लगेच,"तुम्हा कोणाला माझ्यामुळे त्रास नको. मोगऱ्या मला कधीच काही करू शकत नाही. मी जाते बाहेर!"असे म्हणून बाहेर जायला लागल्यावर बाबांनी येऊन मला एक जोरदार लगावली,"जास्त शहाणपणा करू नकोस. एकतर जन्माला आली आणि आईला वर पाठवले. आता काय आम्हालापण वर पाठवणार का?" हे ऐकून मी गळूनच गेले, तिथेच कोपऱ्यात एकटी बसून राहिले. बाबांना आपण काय बोलून गेलो हे जाणवल्यावर खूपच वाईट वाटले. माझ्याजवळ येऊन त्यांनी मला जवळ घेऊन,"मिता, माफ कर ग मला! मला खरेच असे काही म्हणायचे नव्हते. माझ्या तोंडून हे कसे बाहेर आले मलाच माहित नाही" असे बोलून हात जोडून माफी मागितली. तेवढ्यात,"बघितलेस मिताली! मी तुला हेच समजावून सांगत होतो. ह्या घरातले कोणीही तुझ्यावर प्रेम करत नाही. त्यांना

कोणालाच तू नको आहेस. फक्त ते तुला तसे दाखवत आहेत. माझे ऐक, चल तू माझ्याबरोबर"असे म्हणून जोरजोरात घुरघुरायला लागला.

"तुम्ही मला थांबवू शकत नाही. मी मितालीला इथून घेऊन गेल्याशिवाय थांबणार नाही. तुमच्या चंगूलमधून मी तिला सोडवणार आहे. मला आईनेच तसे सांगितले आहे. म्हणूनच तिने मला बाबांकडे सुपूर्त केले होते. तिला माहित होते इथे मितालीची काळजी करणारं कोणी नाहीये. आतातर तिने सगळे स्वतः बघितले आहे. मिताली मागच्याच आठवड्यात काकांनी वकिलांकडे जाऊन कागदपत्र तयार करून घेतली आहेत ज्यावर ते तुझी सही घेऊन सगळी मालमत्ता श्रीच्या नावावर करणार आहेत. बाबांना तर फक्त पांढरे बाईंचीच चिंता आहे. तू इतकी काळजीमध्ये आहे हे दिसूनसुद्धा आता अर्ध्यातासापूर्वी तुझ्याशी कसे बोलत होते. राहता राहिली आजी- ती किती दिवस असणार आहे?" हे ऐकल्यावर मी खूप चिडले,"मोगऱ्या खबरदार आजीबद्दल काही बोललास तर!" हे ऐकून,"हो ग मीते, मलापण आजीची काळजी आहे पण ती पिकलेल्या झाडाचे खोड आहे ना!" असे म्हणून जोरजोरात हसायला लागला. सकाळीच श्रीने मोगऱ्याचे धड वेगळे केले होते आणि आता मोगऱ्या असे म्हणत आहे म्हंटल्यावर आम्ही सगळेच खूप घाबरलो. मी लगेच आजीकडे जाऊन तिला मिठी मारली. आजीच्या तोंडात सकाळपासूनच रामाचे नाव घेणे अखंड चालू होते. तिने मला जवळ घेऊन आपण सगळे रामरक्षा म्हणूयात

म्हणून सांगितले. आजीने देवघरातून धूप आणून लावला. आम्ही सगळ्यांनीच रामरक्षा, मारुती स्तोत्र असे सतत म्हणायला सुरुवात केली. थोड्यावेळाने गाय आणि वासरूचे ओरडणे थांबले.

आम्ही रात्रभर अखंड रामरक्षा, मारुती स्तोत्र म्हणत होतो. सकाळी उजाडल्यावरमात्र आम्ही सगळ्यांनी थोडा खंड घेतला. आजीने सगळ्यांना अंगारा लावून आवरायला सांगितले. आमचे शौचालय घराबाहेर असल्याने आता तिथे कसे जायचे हा प्रश्न पडला. आजीने सगळ्यांना थांबायला सांगून अगोदर स्वतः बाहेर गेली. गाय, वासरूला कुरवाळून त्यांना खायला घालून नंतर तिने आम्हाला एकएक करून बाहेर येऊन आवरून लगेच आत जावा म्हणून सांगितले. आम्ही सगळ्यांनी एकएक करून आवरून नंतर परत आत येऊन बसलो. आजी-काकूने केलेला चहा-नाश्ता करून आम्ही परत सगळे तसेच बसलो. बाहेरचे दार उघडायची हिंमत मात्र कोणातच नव्हती.

आमचे घर जरा वस्तीपासून लांब होते. आजोबांनी आमचे खानदानी घर सोडून इथे गावाबाहेर स्वस्तात जागा मिळत असल्याने ती विकत घेऊन तिथे ऐसपैस बैठे घर बांधले होते. प्रशस्त दिवाणखाना, मोठे स्वयंपाकघर, तिथेच आत कोठीखोली, त्याबाजूलाच देवघर. देवघराला लागून आजीआजोबांची खोली, त्याच्या उजवीकडे अजून दोन खोल्या

होत्या जिथे कोणीच रहात नसे. त्यानंतर श्रीची, माझी खोली, स्वयंपाकघराच्या डाव्या बाजूला बाबांची व काकाकाकूची खोली होती. मध्ये खूप मोठी जागा होती. पुढे व मागे खूप मोठे अंगण होते. घरासमोर दारात मोठे तुळशीवृंदावन होते. घराच्याबाजूने बरीच फुलझाडे, शोभेची झाडे लावली होती. मागच्या बाजूला गाईचा गोठा होता ज्यात आता फक्त एक गाय व तिचे वासरू होते. पूर्वी म्हणे ५-६ गायी, २-३ बैल होते; पण ते सांभाळणे जमत नसल्याने त्यांना काही गरजू शेतकऱ्यांना दान करून टाकले होते. आता फक्त दूध, दही, तूप मिळण्यासाठी एक गाय ठेवली होती. मागच्या अंगणात बऱ्याच फळभाज्या लावल्या होत्या. मागे मोरी व संडास होते. त्याच्याजवळच बंब ठेवला होता. शिवाय विहीरसुद्धा होती. पूर्वी घरामागे असलेली शेतीपण आमचीच होती म्हणे पण सांभाळणे जमत नसल्याने तीपण विकली. बाहेरची सगळी स्वच्छता ठेवण्यासाठी एक गडी होता. अण्णाकाकांचे वय झाल्याने त्यांना ही सगळी कामे जमत नव्हती त्यामुळे त्यांनी राजारामला आमच्याकडे कामाला लावले. राजारामपण खूप साधा होता. वयाने तसा लहान होता पण सगळी कामे मनापासून करायचा. त्याला बागेत काम करायला खूप आवडायचे. घराची लाईट, प्लम्बिंग आणि बाकी दुरुस्तीची कामेसुद्धा तो करायचा. भांडी, धुणे करण्यासाठीसुद्धा जयश्री काकू त्या लहान असल्यापासून यायच्या. अगोदर त्या त्यांच्या आईबरोबर यायच्या. त्यांचे लग्न झाल्यानंतर मुलं होत नसल्याने घरच्यांनी त्यांना हाकलून दिले त्यामुळे त्या परत इथे राहायला

आल्या. दिसायला जरा बऱ्या असल्याने बिचार्यांना इथे खूप त्रास झाला त्यामुळे आता त्या फक्त आमच्याकडे कामाला यायच्या. सकाळी कामाला आल्या की आजी त्यांना रोज चहा व नाश्ता द्यायची, धुणंभांडी झाल्यावर घरी न जाता त्या कुठे बंब स्वच्छ कर, गायींना स्वच्छ कर, भाज्या आल्या असतील तर त्या काढून ठेव अशी बारीकसारीक कामे करत राहायच्या. दुपारी आजी त्यांना जेवायला वाढायची, मग जेवण करून घरी जायच्या की परत दुपारच्या चहाच्यावेळी दुपारची भांडी घासायची म्हणून घरी यायच्या. त्यावेळी काकू त्यांना आमच्यासाठी केलेला नाश्ता आणि चहा द्यायची. दुपारचा नाश्तामात्र त्यांना पोटभरून होईल इतका द्यायची. त्या भांडी घासून पोटभर खाऊन घरी जायच्या. बिचाऱ्यांची खूप दया यायची पण त्या काहीही न बोलता गुपचूप आपले काम करायच्या.

तिथे खूप जणांची शेती होती पण तिथे कोणीच रहात नसत. सकाळी सगळे कामाला येऊन संध्याकाळी परत घरी जात. आम्हाला अश्या शांत वातावरणात रहायची सवय झाली होती. त्यामुळे काल रात्री जो काही गोंधळ झाला तेव्हा कोणीही मदतीला धावले नाही.

सकाळी अनिता आत आल्यावर आश्चर्याने, "दार तर बंद आहे मग तू आत कशी आलीस?" असे मी विचारल्यावर,"अगं मागचे दार उघडे दिसले म्हणून मग तिथून आले असे सांगितल्यावर आजी,"शेवटी कोण

बाहेर गेले होते, दार का नाही लावले?" असे विचारल्यावर मी,"कुठल्या तंद्रीत आत आले माहित नाही. दार लावायचे विसरले असेल बहुतेक" असे म्हंटल्यावर आजीने माझ्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला.

काकू अनिताला बघून,"अनिता काल सांगितले होते ना की थोडे दिवस घरी येऊ नकोस. तरीही आज का आलीस?" त्यावर अनिता,"हो काकू, पण मला मितालीशिवाय करमत नाहीये, मी तरी काय करू?" आजीने काकूला 'राहू दे ग' असे म्हणून शांत केले व अनिताला तिला आज कॉलेजला जायचे नाही का? विचारल्यावर तिनेपण मितालीशिवाय नको वाटते जायला, असे म्हंटल्यावर "अगं उलट तू रोज कॉलेजला जाऊन सगळा अभ्यास करून मितालीला शिकवलं पाहिजे ना! आता दोघीही नाही गेलात तर अभ्यास कसा करणार ग तुम्ही?" असे म्हणून आत गेली.

आर्टस् मध्ये मास्टर डिग्री करताना पहिल्याच दिवशी अनिता आणि माझी ओळख झाली. म्हणजे मी वर्गात गेले तर ही एकटीच बसली होती. मी आत गेलेतर तिने हसून मला बस म्हणून हाताने खूण केल्यावर कसे माहित नाही पण मी तिच्याशेजारी बसले. पहिल्याच दिवशी आमची खूप छान मैत्री झाली. हळूहळू बाकी सगळ्यांशी मैत्री कमी होत होत माझे सगळ्यांशी बोलणेपण बंद झाले. घरी कितीही दंगा करत असले तरी बाहेर मात्र मी शांतच असायचे. पूर्ण मैत्रिणींच्या घोळक्यात मी सगळ्यांचे फक्त

ऐकायचे. अनितापण थोडी लाजाळू असल्याने आमच्या दोघींची खूप घट्ट मैत्री झाली. कुठेही जातायेता आम्ही दोघी नेहमी एकत्र असायचो. अनिताला सावत्र आई असल्यामुळे ती मला कधीच तिच्या घरी घेऊन जात नव्हती. त्याउलट ती आमच्या घरीच पडीक असायची. ती घराबद्दल कधी काहीच बोलायची नाही. घरी कोण कोण असते? वडील काय करतात, तिच्या सख्या आईचे काय झाले, आम्हाला कोणाला काहीच माहित नव्हते. बऱ्याचवेळा मी तिला विचारायचा प्रयत्न केला पण तिने,’’नको ना काढूस माझ्या घराचा विषय! मला घरी जाणे अगदीच नको होते, खूप कटकट आहे घरी, मी कधी एकदा ह्या चंगूल मधून सुटते असे झाले आहे. घरी तेच असते, बाहेर ती आठवण काढू नकोस ना प्लिज’’ असे सांगून शांत केले. सावत्र आईचा त्रास होत असेल हे समजून घेऊन काकू आणि आजीपण तिचे लाड करायचे.

अनिता आणि मी माझ्या खोलीत जाऊन बसलो. अनिताने मला नक्की काय झाले हे विचारल्यावर मी तिला सगळे सांगितले. नंतर आम्ही श्रीच्या खोलीत गेलो.

अनिता, मी आणि श्री खूप वेळ त्याच्याच खोलीत गप्पा मारत बसलो होतो. थोड्यावेळाने मला कंटाळा आल्याने,"मी आजीकडे जात आहे, तू येणार आहेस का?" असे विचारल्यावर तिने,"नको मी इथेच बसते पण तू लगेच परत ये" असे म्हंटल्यावर मी आजीच्या खोलीत गेले तर आजी

नामःस्मरण करत बसली होती. घरी सगळेचजण मानसिक तणावाखाली होते. मी आजीच्या मांडीवर डोके ठेवून पडल्यावर ती हळुवारपणे माझ्या केसातून हात फिरवत होती. तिच्या डोळ्यातले पाणी माझ्या चेहऱ्यावर पडल्यावर मी दचकून तिच्याकडे बघितल्यावर तिने "काही नाही ग, असेच!" असे म्हणून माझ्या केसातून परत हात फिरवायला लागली.

"आजी, आज आईची खूप आठवण येत आहे ग! का सोडून गेली ती मला? मला जन्म दिला तर तिच्या जीवाला धोका आहे हे माहित असूनही का जन्म दिला ग तिने मला? आई नसताना एकटा जीव कसा राहील? आपल्याशिवाय त्याचे किती आबाळ होतील? त्याच्याकडे कोण नीट लक्ष देईल? ते माझ्याशिवाय कसे राहू शकेल? असे कुठले प्रश्न तिच्या मनात आले नसतील का ग? हा निर्णय घ्यायच्या आधी एकदाही तिने माझा विचार केला नसेल ना!" त्यावर काकू आत येत,"असे का बोलतेस मितु? आम्ही तुझे कोणीच नाहीये का? आम्ही काहीच काळजी घेतली नाही का तुझी? आमचे कुठे चुकले का? तुला आईची कमी जाणवू द्यायची नाही म्हणून मी दुसरे बाळपण होऊ दिले नाही ग!" काकू असे बोलल्यावर आजी,"सोनल, अगं मितालीला असे काही म्हणायचे नाहीये!" असे म्हंटल्यावर मीपण "हो गं काकू, खरेच!" असे म्हंटल्यावर आजीने तिला स्वतःजवळ बसवले. आजी बोलत असताना बाबा, काका, श्री व अनिता सगळेच आजीच्या खोलीत आले.

"आजपर्यंत खुपश्या अडचणींना तोंड दिले. श्रीच्या बाळंतपणात तुला किती त्रास झाला होता, आठवतंय ना! त्यावेळीपण बाळ किंवा आई ह्यापैकी एकालाच आम्ही वाचवू शकतो असे सांगितल्यावर अविनाशने कुठलाही विचार न करता सोनलला वाचवा म्हणून सांगितले होते. पण नशिबाने तुम्ही दोघेही वाचलात. श्रीची तब्येत खूप नाजूक असल्याने तो दोन वर्षाचा होईपर्यंत त्याची पूर्ण काळजी घ्यायला सांगितली होती. कापसाच्या बोळ्याने दूध पाजायचो आपण त्याला. हा श्री एकदा रडायला लागला की थांबायचाच नाही. पण श्रीधनने घेतले की लगेच शांत बसायचा. मागच्या जन्मात दोघांचे काहीतरी नाते असणार. म्हणून तर सोनलने त्याचे नाव 'श्रीयश' असे ठेवले. श्रीधनचा श्रीयश! आपण सगळे ह्याच्या बालसंगोपनात बुडून गेलो होतो तर एका वर्षात आजोबा पायरीवरून घसरल्याचे निमित्त झाले आणि.... नंतर एका वर्षात घरी काहीतरी कार्य करायचे म्हणून मग श्रीधनच्या लग्नाचे बघायला सुरुवात केली पण पहिले स्थळ बघायला जायच्यावेळी पठ्ठ्याने मी अगोदरच मुलगी बघून ठेवली आहे म्हणून सांगितले. घरी ह्याबद्दल फक्त ह्यांना माहित होते. 'श्री २ वर्षाचा झाल्यानंतर सगळ्यांना सांगून लग्नाचा बार उडवून देऊ' असे ह्यांनी श्रीधनला सांगितले होते पण अगदी मलासुद्धा कळू दिले नव्हते. आता बाबा नसल्याने त्याने आम्हा सगळ्यांना सांगितले. मुलगी कोण आहे वगैरे विचारल्यावर त्याने,"बाबांनी पसंत केलेली मुलगी आहे तुम्ही तिलाच

प्रत्यक्ष भेटून मग ठरवा. मला काही विचारू नका" म्हणून सांगितले. त्यावर अविनाशने,"अरे नाव, गावं, पत्ता तरी सांगशील की नाही? का तेपण आम्हीच शोधायचे?" असे म्हंटल्यावर श्रीधन,"हो शोधा की! फार अवघड नाहीये" असे सांगून तिथून निघून गेला होता. त्यानंतर कितीतरी वेळ आपण मुलगी कोण असेल म्हणून तर्क करत बसलो होतो. पण कुठलेच नाव डोळ्यासमोर येत नव्हते. आपण एवढ्या गंभीर विषयावर बोलत असताना कविता,"काकू आईने खरवस दिला आहे. धन्याला खरवस खूप आवडतो म्हणून तिने त्याला घरीच खरवस खायला बोलावले आहे" असे सांगून निघून जायला लागली.

कविताला बघून आम्ही सगळ्यांनीच एकमेकांकडे पहिले. लगेच मी,"काय ग कविता? छुपी रुस्तुम निघालीस की! त्यावर कविता एकदम भोळा चेहरा करत,"काय झाले काकू? मी काय केले? तुम्ही सगळे माझ्याकडे असे का बघत आहात?" त्यावर सोनल,"जाऊबाई, आता काहीही लपवायची गरज नाहीये हो! आमच्या भाऊजींनी आम्हाला सगळे सांगितले आहे!" असे म्हंटल्यावर ती जोरजोरात हसायला लागली. हिला वेड लागले की काय असे वाटण्यासारखे ती हसत होती. मी तिला 'हसणे बंद कर' म्हणून ओरडल्यावर ती एकदम शांत होऊन,"धन्याने मुलगी कोण आहे सांगितले नाही ना! काकू तुम्ही मला ओरडला ना, आता मीपण तुम्हाला सांगणार नाही. शोधा तुम्हीच" असे म्हणून पळून गेली. आम्ही सगळे परत विचार करायला लागलो पण धनू इतके कोणाशी बोलतच

नव्हता. कविता आणि धनूचे लहानपणापासून खूप पटायचे. बाकी कुठल्याही मुलीशी तो फार बोलायचाच नाही. त्यामुळे प्रत्येक मुलीचे नाव घेऊन हिची आणि धनुची जोडी कशी वाटेल हे डोळ्यासमोर आणून आम्ही प्रत्येक मुलीला नकार देत गेलो. तोपर्यंत कविता परत आली. परत आमची खिल्लीच उडवायला आली असेल म्हणून आम्ही सगळे तिला ओरडलो. पण कविता म्हणजे वेगळेच रसायन! जे स्वतःला पाहिजे तेच करायची सवय. मुख्य म्हणजे आमच्या घरातली लाडोबा! खाली बसत म्हणाली मी तुम्हाला काही इशारे देते, बघा ओळखता येते का? कवितेचे काम कुठलेही साधे नसायचे त्यात ही इशारे करणार म्हंटल्यावर काहीतरी भन्नाटच असेल म्हणून आम्ही सगळे सरसावून बसलो. म्हणाली,"

मस्तानीची शोभे बहीणच ही
तरीही काशीबाईंसारखी आहे धीराची
हिच्यावर आहे कृपा अन्नपूर्णादेवीची
पण लाजाळूच्या पानामुळे उठूनच दिसत नाही चारचौघात ही

"काय ग! असा असतो का इशारा? हेतर तू कोडेच घातले आहेस की!" असे अविनाशने म्हंटल्यावर,"विचार करा, सोप्पे आहे" असे म्हणून निघून गेली. आम्ही सगळे विचार करून दमून आपापली काम करायला उठून निघून गेलो. संध्याकाळी श्रीधन आल्यावरमात्र मी त्याची चांगलीच

शाळा घेतली आणि लगेच नाव सांगायला सांगितले. त्याने जेव्हा नाव सांगितले तेव्हा ‘काखेत कळसा आणि गावाला वळसा’ अशी गत झाली आमची. तुझी आई 'मैथिली' तुझ्या पणजोबांच्या जवळच्या मित्राची नात. पणजोबा आणि तुझ्या आईचे आजोबा लहानपणापासूनचे मित्र. खूप घट्ट मैत्री होती दोघांच्यात! त्यामुळे सगळयांचे एकमेकांच्या घरी खूप येणेजाणे असायचे. कुठलेही कार्य असले तरीही एकमेकांना विचारल्याशिवाय दोघेही कुठलाही निर्णय घ्यायचे नाहीत. अगदी मुलांच्या लग्नाच्यावेळी बघायला जाताना दोघेही जायचेच. इतके घट्ट नाते होते दोघांच्यात. आम्हीपण सगळेजण त्यांना खूप मानायचो. दर सुट्टीत मुलं एकत्रच असायची. पुढच्या पिढीतपण हे नाते तसेच राहिले. इतकेच काय आता तुम्हीपण हे नाते चांगलेच जपत आहात. मैथिलीचे आपल्या घरी खूप येणेजाणे असे पण तिच्या वडिलांचे आणि श्रीराम आजोबांच्या मुलांबरोबर चांगले पटायचे त्यामुळे हिचे नाव आमच्या लक्षातपण नाही आले." काकू म्हणाली,"खरेच सांगते मिताली, आम्ही त्यांच्या घरातल्या बऱ्याच मुलींची नाव घेतली पण मैथिली आणि धनूचे काही असेल असे आम्हाला स्वप्नातदेखील वाटले नव्हते. आजी,"हो ना! पण श्रीधनला मैथिली लहानपणापासूनच आवडायची त्यामुळे तो तिच्याशी जास्त बोलायचा नाही." श्रीने,"म्हणजे काका लाजायचा. हो ना!"असे म्हणून बाबांना चिडवले तेव्हापण बाबा लाजले हे बघून आम्ही सगळेच हसायला लागलो.

हसणे थांबल्यावर मी,"आजी पुढे सांग ना!" असे म्हंटल्यावर आजीने पुढचे बाबांना सांगायला सांगितले.

"मला मैथिली आवडते हे माझ्याही अगोदर बाबांना कळाले होते. मी साधारण नववीत असताना मला मैथिली आवडते ह्याचा साक्षात्कार झाला तेव्हा बाबांनी मला लगेच बोलावून घेतले होते. त्यांनी मला तेव्हाच सांगितले होते की शाळा, कॉलेज सगळे पूर्ण करून नोकरी लागल्यावर मग मी मैथिलीला विचारावे. उगाचच घाई करू नये. पण मैथिली परत घरी जात असताना ती माझ्याकडे चोरून पाहत होती हे जेव्हा माझ्या लक्षात आले तेव्हाच मला कळाले की हिलापण मी आवडतो. आजोबांनी मला मैथिलीला घरी सोडायला सांगितले तेव्हा आम्ही दोघे खुश झालो. वाटेत आम्ही एका बागेत थांबलो, तिथेच मी तिला गजरा देऊन माझे मन मोकळे केले" हे सांगताना बाबा लाजले, हा क्षण श्रीने बरोबर आपल्या मोबाईलमध्ये पकडला. त्याबरोबर बाबांनी त्याला जोरात फटका दिला. बाबांनी पुढे बोलायला सुरुवात केली,"आम्ही दोघांनी घरी आत्ताच काही सांगायचे नाही हे ठरवले. तशीही मैथिली खूप शांत होती त्यामुळे तिच्याकडून कोणालाही काहीही कळण्याची शक्यता जरा कमीच होती. आम्ही दोघांनी एकाच कॉलेजमध्ये ऍडमिशन घेतल्यानेमात्र आम्ही खूप मजा केली. आमच्या दोघांचा एकच ग्रुप होता त्यामुळे सगळ्यांनी एकत्र उपहारगृहात जाणे, सिनेमाला जाणे, कॉलेजट्रीपला जाणे... असे खूप

फिरायचो. हो पण, फक्त आम्ही दोघेच असे कुठेही गेलो नाही. त्यामुळे कोणालाच कधी संशय आला नाही. त्यानंतर दोघांनाही नोकरी लागली. मैथिलीच्या घरी तर सगळेजण लग्न करण्यासाठी खूप मागे लागले होते पण बाबांनी ती जबाबदारी स्वतःवर घेतली त्यामुळे तो विषय तिथे थांबला होता. त्यावेळीच बाबांनी लवकरच तुझा बार उडवून देऊ म्हणून सांगितल्यावर आम्ही दोघेही निश्चिन्त झालो. त्यानंतर श्रीचा जन्म आणि हे सगळे झाल्याने आम्ही थोडे दिवस थांबायचे ठरवले. बाबाच सगळ्यांशी बोलणार होते पण त्यांचे अचानक देहावसान झाल्याने आता पुढे काय करायचे हे आम्हा दोघांनाही कळत नव्हते. त्यात मैथिलीला खूप स्थळे सांगून आलेली असल्याने घरी कसे बोलायचे हा विचार करत असतानाच माझे लग्न करायचे असे तुम्ही सगळे ठरवायला लागला तेव्हा खरेच सांगतो खूप मोठ्या तणावातून सुटका झाल्यासारखे वाटले. त्यादिवशी घरी यायच्या अगोदर मी मैथिलीला भेटलो त्यावेळी मैथिलीने दुसऱ्याच दिवशी तिला एक मुलगा पाहायला येणार आहे हे सांगितल्यावर मात्र मी घरी सगळ्यांना सांगून तिच्या घरी जाऊन लगेच बोलायला सांगितले. पण आई आणि अविला एकदम असे घरी जाऊन कसे बोलायचे ते कळत नव्हते. आजीने श्रीरामकाकाला बोलावून घेतले व सगळे सांगितल्यावर त्याने पुढाकार घेऊन मी त्यांच्याशी बोलतो म्हणून सांगितले. त्यानेच तुझ्या आजोबांना सांगितले. त्यांनीपण लगेच होकार दिला व आमचे लग्न झाले. पुढचे सगळे तुम्हाला माहितीच आहे." आत्तापर्यंतही गोष्ट हजारदातरी

ऐकली असेल, तरीही दरवेळी पहिल्यांदा ऐकत असल्यासारखे वाटायचे. अनिताने,"मला काहीच माहित नाही. सांगा ना!" असे म्हंटल्यावर काकूने पुढचे सांगितले,"आमची मैथिली म्हणजे कविताने सांगितल्यासारखीच होती हो. दिसायला सुंदर, एकदम नितळ त्वचा, खूप समजूतदार, सुगरण आणि एकदम शांत. घरी आहे की नाही हेसुद्धा कळणार नाही इतकी शांत पण खूप छान आवाज. सारखे काहीतरी गुणगुणत असायची त्यामुळे घरी तिचे अस्तित्व जाणवायचे. आमच्या दोघींचे खूप छान जमायचे. खरेतर आमच्या दोघींच्यात खूप अंतर पण तरीही आमच्या दोघींमध्ये खूप घट्ट मैत्री झाली होती. तुझे बाबा आणि मैथिली एकमेकांना अगदी अनुरूप. त्यामुळे सगळेजण दोघांना लक्ष्मीनारायणाचा जोडाच म्हणायचे. श्रीची तब्येत चांगली झाल्यानंतरच मी बाळाचा विचार करेन असे जेव्हा ती म्हणाली ना तेव्हा तिच्या गळयात पडून खूप रडले होते मी. ते तिने पाळलेपण. श्री साधारण चार वर्षाचा झाल्यावर आम्हाला तुझ्याबद्दल गोड बातमी कळाली. कधीही कंटाळा न म्हणणाऱ्या, सतत काही ना तरी करत राहणाऱ्या मैथिलीला खूप कडक डोहाळे लागले. पोटात पाणीपण रहात नव्हते, खूपच त्रास होत होता. तीन महिन्यानंतर त्रास कमी होईल असे वाटत होते पण तिचा त्रास काही कमी झाला नाही. दवाखान्यात ॲडमिट करून सोनोग्राफी केली तेव्हाच डॉक्टरांनी तिला तिची तब्येत खूप नाजूक झाली आहे, गर्भाशयाचे तोंड तेव्हाच उघडले असून बाळाचे वजनपण जास्त आहे तेव्हा हे बाळ आपण काढून टाकू. पण तिच्या गर्भाशयाला परत दुसरे

मुलंपण सहन झाले नसते त्यामुळे तिने बाळाला जन्म द्यायचा ठरवला. सगळयांनी खूप समजावून सांगितले पण ती एकदम ठाम राहिली. अगदी भाऊजींचेपण ऐकले नाही."असे म्हणून सगळयांनाच रडू यायला लागले. मीपण आजीच्या गळयात पडून खूप रडले.

थोड्यावेळाने अनिताने,"काका मोगऱ्याबद्दल सांगा ना!" असे म्हंटल्यावर बाबांनी,"मैथिली गेली. तिला निरोप देऊन परत येताना स्मशानघाटातच हे मोगऱ्याचे रोप अचानक माझ्या पायाखाली आले आणि मैथिली माझ्याजवळ येऊन म्हणाली की आपल्या मितालीची काळजी घेण्यासाठी ह्या मोगऱ्याला घेऊन जा. जेव्हापण तुम्हाला माझी आठवण येईल तेव्हा तुम्ही ह्याच्याशी बोला, मी तिथेच असेन. हे ऐकल्यावर मी हे रोप घेऊन आलो आणि आल्याआल्या ते लावले. खूप कोमेजले होते ते. जगेल की नाही ही शंका होती पण मी त्याची खूप मनापासून काळजी घेतली आणि ते एकदम बहरून आले. मितालीला मी नेहमी त्याच्याजवळ घेऊन बसायचो. मैथिलीने मला होणाऱ्या बाळाची काळजी घ्यायला सांगितली होती. बाळाला जन्म द्यायचा निर्णय पूर्णपणे तिचा असल्याने त्याला कधीच माझ्या मृत्यूसाठी जबाबदार ठरवायचे नाही हेपण सांगितले होते. श्रीच्यावेळीसुद्धा डॉक्टरांनी बाळ किंवा आई एकालाच वाचवू शकू म्हणून सांगितले होते पण दोघेही वाचले होते. ह्यावेळी पण डॉक्टर दोघांनाही

वाचवतील असेच तिला वाटत होते. मनातून तिला सारखे असे वाटत होते की देव तिला कधीच बाळापासून दूर करणार नाही!

बाबा ताडकन उठले व बाहेर जायचे म्हणून त्यांनी पुढचा दरवाजा उघडला तर मोगऱ्याचा तुटलेला भाग अगदी उंबऱ्यात आला होता. घाबरून बाबांनी पटकन दार बंद केले. पण तो निपचित होऊन पडला होता. बाबा एकदम घामाघूम होऊन परत खोलीत आले. त्यांना असे बघितल्यावर आम्हा सगळ्यांना परत काय झाले असेल हा विचार करूनच घाम फुटला. थोड्यावेळाने बाबा, काका आणि श्री तिघेही मागच्या दाराने हळूच बाहेर गेले. पुढच्या दारात जाण्यासाठी मोगऱ्याला पार करून जावे लागणार होते. ते जसे मोगऱ्याच्या थोडेसे जवळ आले तेव्हा एकदम आवाज आला,"मला चुकवून कुठे जाणार आहात? माझ्याशिवाय तुम्हाला पर्याय नाहीये. मी तुम्हाला शेवटचे सांगत आहे, मितालीला माझ्या सुपूर्त करा. मी तिची पूर्ण काळजी घेईन." तिघेजण तसेच परत घरी आले. आम्ही परत सगळेजण बाहेरच्या खोलीत एकत्र बसून रामाचा जप करायला लागलो. अनिता घरी जायचे म्हंटल्यावर काकूने ओरडुनच कोणी सांगितले होते तुला यायला? कशी आणि कुठून बाहेर जाणार आहेस? आता इथेच राहावे लागणार तुला!" ह्यावर काहीतरी उपाय करायलाच लागणार होता. अनिताने घरी फोन केल्यावर तिच्या वडिलांनी सांगितले की त्यांना अचानक सुट्टी मिळाली आहे त्यामुळे ते सगळेजण एक महिन्यासाठी बाहेरगावी जाणार

आहेत तेव्हा काही दिवस त्यांनी तिला इथे राहायला सांगितले. तिचा चेहरा खूप पडला होता, अगदी रडायला येत होते पण काकूने तिला जवळ घेऊन","काही होत नाही ग! तू तर आमची तिसरी मुलगी आहेस. एक महिना कशाला कायमचीच इथे रहा की." असे म्हंटल्यावर आजीने आम्हाला ‘स्वयंपाक घरात येऊन मदत करायला चला’ म्हणून ओरडल्यासारखे केले.

श्री काही कामानिमित्त त्याच्या खोलीत जाऊन बसला. मी, आजी, काकू आणि अनिता स्वयंपाकघरात गेलो. त्यावेळी काका व बाबा दोघेच तिथे असताना त्यांनी हळूच बाहेरचा दरवाजा उघडला. मोगऱ्याला लागलेले रक्त वाळले होते आणि तो तिथे निपचित पडला होता. बाबांनी घरातून फावडे आणून हळूहळू त्याला ढकलत ढकलत गाडीजवळ घेऊन गेले. दोघांनी त्याला गाडीवर टाकून नदीत टाकून दिले.

घरी आले तर एकदम जोरदार किंचाळायचा आवाज आला. दोघेही खूप घाबरले. पळत जाऊन दरवाजाच्या जवळ गेले तर दार बंद होते. त्यांनी जोरजोरात दार वाजवल्यावर आम्ही दार उघडायचा प्रयत्न केला पण दार उघडेना. तोपर्यंत मोगऱ्याने जोरजोरात घुरघुरायाला सुरुवात करून," ह्या शिऱ्याने माझे धड शरीरापासून वेगळे केले, ते मी परत बसवणार होतो. का फेकले तुम्ही ते? आत जाऊन दाखवाच मला". म्हणून जोरात आवाज

काढला. आतामात्र आम्ही तिघी रडायला लागलो. त्याने स्वतःचा विचित्र आकार केला होता. तो हळूहळू चालतचालत त्यांच्याकडे येताना बघून बाबा आणि काका पळत बाहेर आले. तिथून श्रीला फोन केला व ते सुखरूप आहेत पण दार उघडू नका म्हणून सांगून फोन ठेवला.

काका व बाबा मोने गुरूजीकडे गेले. मोने गुरुजी हे आमचे खूप जुने स्नेही. मोने कुटुंब आमचे पिढीजात गुरुजी होते. गावात सगळे त्यांना मान द्यायचे. त्यांचे म्हणणे असायचे, ज्यांचे जे कर्म असते त्याप्रमाणे ती व्यक्ती पुढच्या जन्मी तसा जन्म घेते. देवाने आपल्याला मनुष्यजन्म दिला आहे म्हणून त्याचे आभार मानून जमेल तितके सत्कार्य करून प्रत्येकाशी चांगले वागावे, कोणाशी हेवेदावे ठेवू नयेत. पुढचा असा वागला मग मीपण त्याच्याशी तसाच वागणार हा विचारसुद्धा मनात आणू नये. पुढचा चुकीचा वागला आहे तर आपण त्याच्याशी ह्याअगोदर कधीतरी कळतनकळत किंवा मागच्या जन्मात असे वागलो असू, म्हणून तो आपल्याशी असे वागला. कधीतरी आपले पैसे जातात, काहीतरी चुकीचे होते, नुकसान होते त्यावेळीसुद्धा आपण हाच विचार मनात आणावा व सोडून द्यावे. कुठलीही परिस्थिती असो कायम शांत रहायला हवे, नेहमी हसतखेळत, आनंदी असावे, आपल्या विचार करण्यावर, बोलण्यावर आपले नियंत्रण हवे, कोणाकडून कधीही कसलीही अपेक्षा करू नये, देण्याची वृत्ती ठेवावी...

असे बरेच काही ते आम्हाला लहानपणापासून शिकवत असत. आईविना मुलगी असल्याने त्यांचा माझ्यावर विशेष लोभ होता.

बाबा व काकांनी त्यांना जे काही घडले ते सगळे सांगितले. गेले महिनाभर मोगऱ्याचा आकार हळूहळू बदलत असल्याचेसुद्धा त्यांनी सांगितले. झाडाला मानवी आकार यायला लागला होता. एवढ्यात तर त्याचे हात पाय धड आहेत असेच वाटायचे. पण त्याच्यावरच्या प्रेमाने आम्हाला असे दिसत असेल म्हणून आम्ही समजूत करून घेतली होती. त्यांना जेव्हा हे सगळे समजले तेव्हा खूप आश्चर्य वाटले. त्यांच्याप्रमाणे ज्या अतृप्त आत्मा असतात त्या अश्या अचानक उठून त्रास देत नाहीत. अगोदर आपल्याला त्या अतृप्त शक्ती आपल्याजवळ जाणवत असतात.

त्यांनी थोडा विचार करून त्या दोघांना आता रात्र झाली आहे तेव्हा घरी जाण्यापेक्षा इथेच झोपा, सकाळी उठून काय करायचे बघुयात. घरी फक्त आम्ही असल्याने खरेतर त्या दोघांना रहायचे नव्हते पण दुसरा इलाजच नसल्याने ते तिथेच झोपले. त्या रात्री परत काहीही झाले नाही. आम्ही सगळे एकत्र एकाच खोलीत झोपलो.

बाबा, काका नसल्याने मोगऱ्याने अचानक रात्री काही त्रास दिला तर काय करायचे, तो अचानक आतमध्ये आला तर अश्या अनेक विचारांनी झोपच येत नव्हती. अनिता सोडली तर आम्ही सगळे जागे होतो. अचानक

२ वाजायच्च्या सुमारास अनिताला परसाकडे जायचे होते म्हणून ती बाहेर गेली. थोड्यावेळाने जोरात काहीतरी पडण्याचा आवाज आला. अचानक अनिताच्च्या ओरडण्याचा आवाज आला. श्री मी बघून येतो म्हणून उठला पण काकूने त्याला हाताने धरून ठेवले. आतातर अनिता जोरजोरात रडायला लागली. मी व श्री उठून निघालोच पण आजीने माझा हात धरून,"मोगऱ्याला तू हवी आहेस म्हणून हे सगळे करत आहे. अजिबात बाहेर जायचे नाही. बसा इथे गुपचूप. मी बघून येते" आजी असे म्हंटल्यावर मी तिला मोगऱ्याने तिच्च्याबद्दल बोलल्याचे सांगून तिला जायला नकार दिला. आता बाहेर कोण जाणार हा मोठा प्रश्न आमच्च्यापुढे पडला असतानाच अचानक घरातली लाईट गेली. डोळे थोडे अंधाराला सरसावयाला लागल्यावर काकू मेणबत्ती आणायला म्हणून उठायला लागली तर समोर अनिताच आमच्च्यासमोर येऊन उभी राहिली.

तिचा चेहराच दिसत नव्हता. विस्कटलेले केस तोंडावर आले होते, चिखलात पडल्यामुळे सगळ्या अंगाला चिखल लागला होता शिवाय ड्रेस खूप ठिकाणहून फाटला होता. आमच्च्याकडे बघून तिने केस मागे घेतले तर तिचे डोळे एकदम लाल झाले होते, ओठ एकदम जाड झाले होते, डोळ्याच्च्या खालून काळी ओळ उमटत खालपर्यंत गेली होती. दात लाल, काळे झाले होते. तिचा अवतार बघून आम्ही सगळे घाबरून गेलो. आमच्च्यासमोर येऊन उभी राहून ती बोलायला लागली. तिचा आवाज

एकदम घोगरा झाला होता. "काय शिऱ्या? आज कसे वाचवणार तू तुझ्या कुटुंबाला? इथे तू एकटाच कर्ता पुरुष आहेस. तुझ्या काका आणि बाबांना तर मी घराबाहेर काढले आहे. आता ते काही परत येत नाहीत. मोने गुरुजी सकाळी उठल्यावर त्यांना बघतील ना तेव्हा त्यांची बोलती बंद होणार आहे. ते मोने गुरुजी माझा बंदोबस्त करणार होते ना. आता त्यांचाच बंदोबस्त करतो की नाही बघ. चल उठ पटकन. उठून उभा रहा" असे म्हंटल्यावर श्री अजून आमच्याकडे सरकला. त्यावर ती हसत,"काय झाले रे! घाबरलास का? कर्ता पुरुष आहेस ना मग बायकांच्या मागे काय लपतोस?" ती बोलत असतानाच आजी हळूच तिथून उठून गेली होती. काठी घेऊन तिला ती मागून मारणार तोपर्यंत अनिताला कसे कळले माहित नाही पण तिने एक हात मागे घेऊन आजीला पकडले आणि झर्र्कन आजीला पुढे ओढले. तिच्या हातातली काठी खाली 'खळ्ळ' आवाज करून पडली. आजीचा हात पिरगाळून तो मागे घेऊन तिचे केस तोंडात घेऊन ते ओढू लागल्यावर मात्र आम्ही तिघेही तिची सुटका करायला गेलो. अनितामध्ये इतकी शक्ती कुठून आली होती माहित नाही पण तिने आजीला न सोडता आम्हाला एका हाताने जोरात धक्का दिला, आम्ही तिघेही जोरात खाली पडल्यावर ती खळखळून हसायला लागली. लगेच एकदम क्रोधीत होऊन तिने आजीला आमच्या अंगावर जोरात ढकलले. आम्ही चौघेही एकावर एक असे खाली पडलो होतो. ती पूर्ण घशातून बोलत होती. बोलताबोलता चेहरा वाकडा होत होता,"काय ग ये म्हातारे! फार ऊत

आलाय तुला. तुला काय वाटले तू मला काठीने मारल्यावर मी लगेच खाली पडेन. जास्त शहाणपणा केलास तर इथेच मारून खाईन बघ मी तुला. तसेही खूप दिवसात मला काही खायला मिळाले नाहीये." असे म्हणताना तिच्या तोंडातून साबणाच्या फेसासारखी लाळ गळायला लागली. तिने डोळे गरागरा फिरवायला सुरुवात केली. आमच्यासमोर येऊन ती गुढघ्यावर बसल्यावर मी आणि श्रीने तिला दोन्ही हातांनी घट्ट धरले. श्रीच्या हातात कुठून अंगारा आला माहित नाही पण त्याने तो तिच्या कपाळावर लावला तसे अचानक तिने तिचे अंग आमच्यावर टाकले. आम्ही आणखीनच घाबरलो पण आजी आमच्या अंगावर पडल्याने आम्हाला एकदम हलता आले नाही त्यात ती आजीवर पडली. श्रीने हळूहळू त्याचे आमच्याखाली अडकलेले पाय बाहेर काढून घेतले. नंतर मी बाहेर आले. श्रीने अनिता जिवंत आहे ना ही खात्री करून घेतली. तिचा श्वासोश्वास चालू होता. लाईट परत आली. आम्ही दोघांनी अनिताला बाजूला करून आजीला उचलायला गेलो तर ती अगदी विव्हळली. तिचा हात वाकडा झाला होता शिवाय पायपण सुजला होता. आम्ही तिला हळुवारपणे बाजूला केले. काकूला पण उठता येत नव्हते. आम्हाला दोघांनाच काहीतरी हालचाल करायला लागणार होती. हा धक्का सहन न झाल्याने आम्ही खूपवेळ तसेच बसून राहिलो. थोड्यावेळाने श्रीने उठून मला हलवले व बाबांना कॉल करायला सांगितले. तो आजीच्या हाताला एका कपड्याने बांधायला लागला. मी सगळ्यांना कॉल करायचा प्रयत्न करत होते पण सगळ्यांचे

फोन नॉट रिचेबल येत होते. खूपवेळा प्रयत्न करूनही नंबर न लागल्याने फोन ठेऊन मी श्रीला मदत करायला लागले. आजीला आम्ही दोघांनी हळुवारपणे उचलून पलंगावर झोपवले. काकूने आत जाऊन एका बादलीत पाणी घेऊन अनिताला पुसायला सुरुवात केली. मीपण काकूच्या मदतीला धावले. तोपर्यंत श्रीने तिथे झालेला सगळा पसारा आवरला.

अनिताला आम्ही उठवायचा खूप प्रयत्न केला पण ती शुद्धीतच येत नव्हती. ती उठल्यावर परत पूर्वीसारखी असेल का तिला भुताने पकडले असेल, ती आता कायम अशीच राहील हे कळत नव्हते त्यामुळे खरेतर तिला शुद्ध येत नाही हे बघितल्यावर मला बरे वाटले. आम्ही चौघेही तिथे भुतासारखे बसून होतो. त्यात काका, बाबा, मोने गुरुजी किंवा त्यांच्या घरातल्या कोणाचाच नंबर लागत नसल्याने खूप चिंतातुर झालो. मगाशी अनिताने त्यांच्याबद्दल जो उल्लेख केला होता ते जर खरे असेल तर! तिने त्यांना काय केले असेल तर... असे अनेक विचार मनात यायला लागले. आम्ही सगळ्यांना सारखे कॉल करून बघत होतो. पण आमच्या हाती अपयश येत होते. ह्यातून आता आम्हाला कोण वाचवणार हेच कळत नव्हते.

सकाळी उजाडल्यावर आम्ही तिघे हळूच खोलीबाहेर आलो. मागच्या दरवाजाकडे गेलो तर तो सताड उघडा होता. हळूहळू करून बाहेर

आलो तर सगळे व्यवस्थित वाटत होते म्हणून बाहेर आलो. काकूने गायवासरूकडे मोर्चा वळवला. आम्ही दोघांनी आन्हिक कार्य उरकून घेतली.

मी हळूच मागून मोगऱ्याकडे गेले तर त्याच्याकडे बघवत नव्हते. त्याचा आकार अक्राळविक्राळ झाला होता. वरचा सगळा भाग श्री ने छाटल्याने त्याचे फक्त पायच दिसत होते पण त्याने आज मला बघून काहीच प्रतिक्रिया दिली नाही. मी त्याच्याजवळ गेले तरीही त्याने साधी पानेपण हलवली नाहीत. मला त्याने सकाळच्या शुभेच्छा पण नाही दिल्या ना काही विचित्र बोलला. मला आज पहिल्यांदाच ते फक्त एक झाड आहे का हा प्रश्न पडला. पण हे सगळे घडल्यानंतर असे वाटायला लागले की हे नक्की झाड आहे की कुठला प्रेतात्मा आहे की माझी आई आहे? ही आपली आई असूच शकत नाही. ती आपल्या घरातल्या कोणालाही असा त्रास देणारच नाही. भले मोगऱ्याने मला सांगितल्याप्रमाणे काकाकाकूंना सगळी मालमत्ता स्वतःच्या नावावर हवी असली तरीही ती त्यांच्याशी असे नाही वागणार. आजीला त्रास द्यायला तिला स्वप्नातसुद्धा नाही जमणार. मेल्यावर कुठली स्वप्नं म्हणा! तरीही ती असे वागूच शकत नाही. त्यातून तिला माहित आहे अनिता ही माझी एकुलती एक मैत्रीण आहे त्यामुळे तिच्याशी ती असे करणे शक्यच नाही. खुपवेळ तिथे बसून मी तिथून अशीच घराला चक्कर मारून आले तर तिथे मला काहीतरी रक्तासारखे पडलेले

दिसले. मी घाबरून तिथून पळाले व श्रीला घेऊन आले. श्रीला पण काहीच सुचेना. त्याने मला मोने गुरुजींकडे जाऊन तिथे काय परिस्थिती आहे बघायला सांगितले. इथे सगळीकडे शोधून अजून काही दिसते का हे तो बघणार होता.

मी गाडी घेऊन मोने गुरुजींकडे जायला निघाले तर समोरची झोपडीपण एकदम सुनसान वाटली. तसे त्यांचा काही आवाज नसायचा पण ते नवराबायको सकाळी बाहेरच असत. बाई सकाळी बाहेरच चुलीवर चहा, पाणी उकळणे वगैरे कामे करत असते. पण आज कोणीच बाहेर नव्हते. त्यांना जाऊन विचारावे म्हणून मी गाडी परत स्टँडवर लावून चालत जात असताना श्रीने हाक मारून थांबवले. त्या झोपडीतली माणसे ठीक आहेत ना, त्यांना रात्री इथे काय झाले माहित असेल का हे विचारायला चालले आहे म्हणून सांगितल्यावर त्याने मला कुठलाही आगावूपणा न करता सरळ मोने गुरुजींकडे जायला सांगितले. अजून पूर्ण उजाडायचे असल्याने रस्त्यावर कोणीच नव्हते. हे १०-१५ मिनिटांचे अंतर संपतच नव्हते. आपण कुठल्या चकव्यात अडकलो आहोत का असाही प्रश्न मनात झळकून गेला. पण तोपर्यंत समोर गुरुजींचे घर दिसले. दार ठोठवल्यावर आतून लगेच दार उघडले गेले. मोने काकूंनी माझ्याकडे एकदम विसम्याने बघून,"काय ग मिताली! इतक्या लवकर आलीस. काय झाले? सगळे ठीक आहे ना" त्यांचे बोलणे ऐकून मोने गुरुजीसुद्धा बाहेर आले व काकूंना शांत करून मला आत

घेतले. माझा घाबरलेला चेहरा बघून त्यांनी मला तिथे बसवले पण मी मला बाबा आणि काकांना भेटायचे आहे म्हणून सांगितल्यावर ते अजून झोपले आहेत म्हणून सांगितले. मी त्यांना ते कुठे झोपले आहेत म्हणून विचारून लगेच शोधायला लागले.

ते दोघे ज्या खोलीत झोपले होते ते दार वाजवले तर आतून काहीच प्रतिसाद आला नाही. आम्ही खूप जोरजोराने दार वाजवत होतो. मी तर रडतरडत बाबा आणि काकाला हाक मारत होते पण दोघांकडून ना काही उत्तर येत होते ना दार उघडत होते. मोने गुरुजींनी शेजारी राहणाऱ्या मुलाला- अमितला हाक मारून बोलावून घेतले तोपण लगेच आला. त्याने दाराला धक्का मारून दार उघडायचा प्रयत्न केला पण दार काही उघडले गेले नाही. तोपर्यंत गुरुजींनी बाहेर जाऊन त्यांच्या खोलीतल्या खिडकीवर जोरजोरात थापा मारायला सुरुवात केली तर खिडकीचे दार उघडे होते.

काकांनी अमितला बोलावल्यावर आम्ही सगळेच तिकडे गेलो तर बाबा आणि काका पलंगावर झोपले होते पण इतक्या हाका मारूनही दोघांचीही काही हालचाल होत नव्हती. मनात नको नको ते विचार येऊन मी आणि काकू खूप रडत होतो. आमचा गोंधळ ऐकून खूपजण जमले होते. प्रत्येकजण काही ना काही सुचवत होता. तोपर्यंत अमित पाण्याचा पाईप घेऊन आला व त्याने त्या दोघांवर पाण्याचा फवारा मारल्यावर दोघेजण

हडबडून उठले. सगळ्यांनी त्यांना जागे झालेले बघून जल्लोष केला. ते उठेपर्यंत तिथे पोलीस हजर झाले.

जमलेल्या जमावाला पोलिसांनी परत पाठवले व आमच्याबरोबर आत आले. काकूंनी सगळयांसाठी चहा करून आणला. बाबा व काका अजूनही थोडे झोपेतच असल्यासारखे होते. पोलिसांनी खूप साऱ्या प्रश्नांची सरबत्ती सुरु केली पण त्या दोघांनाही आपल्याला इतकी गाढ झोप कशी काय लागली हे सांगता येईना. पोलिसांनी बिचाऱ्या मोने काकूंना रात्री नक्की काय जेवायला दिले? त्यातले शिळे काही उरले आहे का? अश्या अनेक प्रश्नांची सरबत्ती सुरु केल्यावर बाबांनी पोलिसांना,"आमचा ह्यांच्यावर खूप विश्वास आहे. आणि आम्हाला बेशुद्ध करून ह्यांना काय मिळणार आहे? आम्ही दोघेही ठीक आहोत तेव्हा मला वाटते की आपण हे सगळे इथे थांबवूयात."असे म्हंटल्यावर पोलीस उठून जायला लागले व गुरुजींना म्हणाले,"गुरुजी, तुम्हाला जरा त्रास दिला. आमचा तुमच्यावर पूर्ण भरवसा आहे. आम्हाला क्षमा करा पण चौकशी करणे हे आमचे कर्तव्यच आहे." असे म्हंटल्यावर उलट मोने गुरुजींनी हसून,"इन्स्पेक्टर विजय तुम्हाला असे कर्तव्यदक्ष बघून मला खरेच खूप बरे वाटले. आपले काम असेच करत जा" असे म्हणून त्यांना नाश्त्यासाठी आग्रहाने थांबवून घेतले. मला काल रात्री झालेला सगळा प्रकार कधी एकदा सांगते असे झाले होते पण हे सगळे असल्याने निराश होऊन मी परत घरी जायला निघाले तर

गुरुजींनी मलापण नाश्ता करून जायला सांगितले. पण मी मानेनेच नकार देऊन घराबाहेर पडले. दारात माझी गाडीच दिसेना. आता काय नवीन! असे म्हणून मी गाडी शोधायला लागले तर अमित माझी गाडी ढकलत घेऊन येत होता.

आमची आणि मोने गुरुजींची खूप जवळीक असल्याने त्यांच्या शेजारी राहणाऱ्या बेलवंडी कुटुंबाबरोबरसुद्धा आमचे स्नेहाचे नाते होते. त्यामुळे मी अमितशी फारशी बोलत नसले तरीही आम्ही एकमेकांना खूपच चांगले ओळखत होतो. त्याच्या हातात माझी गाडी बघून मी पुरती गोंधळून गेले. किल्ली माझ्याकडे होती मग हा गाडी घेऊन कसा गेला असेल हेच कळत नव्हते. त्याने माझ्या चेहऱ्यावरचे भाव ओळखले. मगाशी सगळा जमाव जमला होता तेव्हा बहुतेक कोणीतरी गाडी घेऊन जायचा प्रयत्न करत होता पण तिथल्या एकांनी आमची गाडी ओळखून त्याला हटकल्यावर तो गाडी सोडून पळून गेला म्हणे. त्यांनी आत येऊन हे सांगितल्यावर अमित त्यांच्याबरोबर जाऊन गाडी घेऊन आला होता.

मी त्याचे आभार मानून गाडी घ्यायला गेले तर त्याने तो मला सोडायला येत आहे म्हणून सांगितले. त्याची काही गरज नाही म्हणून मी सांगितल्यावर त्याने माझे ऐकून न घेता मला गाडीची किल्ली मागितली. घरी काय परिस्थिती असेल माहित नव्हते त्यामुळे त्याला घरी कसे घेऊन जायचे हे कळत नव्हते पण त्याने माझे न ऐकता मला घरी सोडले.

त्याने घरी गाडी लावल्यावर मी त्याला तिथेच 'धन्यवाद' म्हणून त्याच्याकडून किल्ली घेतली. त्यावर त्याने,"आत बोलावणार नाही का?" असे विचारल्यावर मी त्याला,"सकाळची घाई आहे" म्हणून सांगितल्यावर त्याने,"मॅडम, आज रविवार आहे" म्हणून सांगितले. नाईलाजाने मी काही न बोलता दार वाजवले. अमितपण निर्लज्जासारखा माझ्या मागेच उभा राहिला. श्रीने दार उघडल्यावर अमितला बघून एकदम आश्चर्यचकित झाला. अमितनेच त्याला प्रेमाने मिठी मारली व स्वतःहून आत आला. श्रीने माझ्याकडे रागाने बघितले पण मी काहीच करू शकले नाही. त्याने मला"बाबा, काका कुठे आहेत?" असे विचारल्यावर अमितनेच,"अरे ते नाश्ता करून येणार आहेत. मिताली एकटीच येत होती गाडीवर पण मीच तिला म्हणालो की चल तुला सोडतो म्हणून". आम्ही दोघेही काही न बोलता नुसते बसून राहिलो त्यावर त्याने,"अरे श्री चहातरी विचारशील की नाही?" श्रीने 'हो' म्हणून मला चहा घेऊन यायला सांगितले. आत गेल्यागेल्या मी आजीकडे गेले तर काकूपण लगेच तिथे आली. मी झालेला सगळा प्रकार त्यांना सांगितला. काका, बाबा मोनेंकडे सुरक्षित आहेत म्हंटल्यावर दोघींनी हात जोडून देवाचे आभार मानले.

तिथे मला अनिता दिसलीच नाही. तिच्याबद्दल विचारल्यावर ती थोड्यावेळापूर्वीच उठून आवरायला गेली आहे म्हणून सांगितले. काल रात्री

तिने काय केले हे तिच्या काहीही लक्षात नव्हते. आम्ही तिला स्वच्छ पुसून तिचे कपडेपण बदलले असल्याने तिला शंकासुद्धा आली नव्हती. अनिता तिथे आल्यावर तिने मी कुठे होतीस म्हणून विचारल्यावर इथेच जरा बाहेर गेले होते म्हणून सांगितले. ती एकदम व्यवस्थित दिसत होती म्हणजे तिला काल काय झाले हे काहीच आठवत नसणार. काल रात्री काय झाले हे आपल्याला कसे समजणार हेपण कळायला मार्ग उरला नव्हता.

श्रीने परत हाक मारून चहा झाला की नाही विचारल्यावर काकूने, "चहा तयार आहे, घेऊन जा" म्हणून सांगितले. मी चहा गरम करून बाहेर घेऊन गेले तर अमित एकदम उत्साहात येऊन गप्पा मारत होता. आम्हाला तो कधी एकदा जातो असे झाले होते पण पठ्ठ्या निघायचे नावच काढत नव्हता. अनितापण बाहेर येऊन गप्पा मारायला लागली. तोपर्यंत मोने गुरुजी, बाबा व काका आले. ते आल्यावर मात्र थोड्यावेळाने हा निघून गेला.

अनिता तिथे असल्याने आणि तिला रात्रीचे काहीच आठवत नसल्याने तिच्यासमोर सगळे कसे काय सांगायचे हा प्रश्नच पडला. श्रीने मला व अनिताला आत आमच्या खोलीत जाऊन बसायला सांगितले. मी अनिच्छेनेच अनिताबरोबर आत गेले. अनिताने आत गेल्या गेल्या,"काय गं! खरे सांग कुठे गेली होतीस? अमित तुला सोडायला आला म्हणजे तो

कुठे भेटला तुला? त्याचे आणि तुझे कधीपासून इतके पटायला लागले?" अश्या प्रश्नांची सरबत्ती सुरु केल्यावर "अनिता तुला आता अमितबद्दल चौकशी का करायची आहे? इथे काय चालले माहित नाही तुला? कशाला गं चांभार चौकश्या करतेस?" असे म्हंटल्यावर थोडे नरमाईने घेऊन,"अगं तुझ्या काळजीपोटीच विचारले. अगं हो मिताली, मला ना एक गोष्ट सांगायची आहे तुला" असे थोडे घाबरून म्हंटल्यावर हिला रात्रीचे आठवले की काय म्हणून मी तिच्याकडे बघितले. तर तिने,"अगं काल रात्री झोपताना मी माझा अबोली रंगाचा ड्रेस घातला होता पण सकाळी उठले तर लाल रंगाचा ड्रेस होता. असे कसे झाले असेल" असे म्हंटल्यावर मी तिला,"नाही गं तू हाच ड्रेस घातला होतास"म्हंटल्यावर ती परत,"अगं पण आजी कधी आणि कुठे पडली? मला कसे काहीच कळले नाही? इतकी गाढ झोप मला कधीच लागत नाही. काल तर आपण सगळे एकत्र झोपलो होतो तरीही मला कसे कळले नाही. बरं मला सांग आजी एकटीच जर बाहेर गेली आणि पडली तर ती आत एकटीच कशी परत आली. काकू म्हणाली की तुम्हालापण आज सकाळी कळले. इतके लागलेले असताना ती एकटी चालत कशी येऊ शकेल?" मी तिला शांत करून प्रश्नांचा भडीमार थांबवायला सांगितला तोपर्यंत आजीने मला हाक मारली. मी तिला तिथेच बसायला सांगितल्यावर मीपण येते म्हणून उभी राहिली. आम्ही आजीकडे गेल्यावर आजीने अनिताला काकूला स्वयंपाकघरात मदत करायला पाठवले. ती अनिच्छेनेच तिथून गेली. आजीने मला परत यायला इतका

वेळ का लागला हे विचारल्यावर तिथे झालेला सगळा प्रकार सांगितला. “हे काय चालले आहे काहीच कळत नाहीये. मैथिलीने येऊन आता ह्यातून आपली सुटका करावी. हा भुताखेताचा प्रकार आहे की कोण आपल्याबरोबर हे मुद्दाम करत आहे? पण आजपर्यंत आपण कोणाचेच काही वाईट केले नाही मग आपल्याबरोबर कोण असे वागेल? काय चालू असेल गं मिता? माझा ना आजपर्यंत ह्या भुताखेतांवर विश्वास नव्हता! पण आता डोकेच काम करेनासे झाले आहे. पुढे काय करायचे काहीच कळत नाहीये" असे म्हंटल्यावर, "आजी मला खूप भीती वाटत आहे गं" असे म्हणून तिच्या कुशीत झोपले. रात्रभर झोप नसल्याने माझा लगेच डोळा लागला.

आज दिवसभर काहीच झाले नव्हते. पण जसजशी संध्याकाळ होत होती तशी हुरहूर दाटून आली. आज रात्री परत कालच्यासारखे झाले तर हा प्रश्न मनाला छळत होता. बाबा व काकांना मी आज काहीही झाले तरीही कोणीही घराबाहेर जायचे नाही हे सांगितले होते. त्यांचे गुरुजींबरोबर काय बोलणे झाले हे विचारले तर त्यांनी मला त्याची काळजी तू करू नकोस म्हणून सांगितल्यावर थोडा रागच आला पण....

पुढचे ४-५ दिवस सगळे व्यवस्थित चालू होते. आमचे रोजचे व्यवहार सुरळीतपणे चालू झाले होते. मोने गुरुजींनी ह्याचा काहीतरी

बंदोबस्त केला असेल असे मला वाटले. पण सगळे सुरळीत झाल्यामुळे मी काही फार विचार केला नाही.

त्या दिवसानंतर रोज संध्याकाळी आम्ही सगळे एकत्र बसून रामरक्षा व मारुती स्तोत्र म्हणायला सुरुवात केली. रोज संध्याकाळी स्तोत्र म्हणून झाल्यावर आजी आम्हा सगळ्यांना अंगारा लावायची व त्यातला उरलेला सकाळी लावायची. बरेचदा मोने गुरुजी व काकू संध्याकाळी येऊन आमच्याबरोबर स्तोत्र म्हणायचे. त्यानंतर ते आम्हाला खूप छान छान गोष्टी सांगून त्यात आपले वर्तन नेहमी कसे असावे, आपण जर चांगले असू तर आपल्या भोवती असलेल्या दुष्ट प्रवृत्तीसुद्धा आपले वर्तन बघून आपल्याला कधीच कुठले नुकसान करत नाहीत... अश्या अनेक गोष्टी सांगायचे. त्यांची सांगायची पद्धत इतकी छान होती की आम्हाला सगळ्यांना त्यांचे प्रवचन कधी संपूच नये असे वाटायचे.

शनिवारी सकाळी आमच्याकडे उदकशांत व नवग्रहशांती केली. आमच्या सगळ्यांच्याच हातून होम करण्यात आला. त्यानंतर सत्यनारायण पूजा झाली. होम व पूजा झाल्यावर घरी खूप छान वाटत होते. सगळी उदासी जाऊन एक प्रकारची सकारात्मकता आली होती. त्यादिवशी मोनेगुरुजी कुटुंब, चार गुरुजी, मामामामी, आजी शिवाय बेलवंडी कुटुंबसुद्धा जेवायला आले होते. मोनेगुरुजी व काकू सोडून बाकी सगळे संध्याकाळी चहा पिऊन

निघाले. रात्रीची जेवणं झाल्यावर सगळे उरकून मी एकटीच खोलीत बसायला गेले. अचानक खोलीतून विचित्र आवाज यायला लागले. थोड्यावेळाने परत मोगऱ्याचा बोलायचा आवाज यायला लागला. मागचेच परत सगळे त्याने मला जसेच्या तसे ऐकवले. माझ्या तोंडून शब्द निघेना. इतका आवाज ऐकून मला वाचवायला कोणीच आले नाही. त्यानंतर अचानक खोलीत अंधार झाला. त्या अंधारात पांढरा झगा घातलेली आकृती चमकली. अंधारात तिचा पांढरा झगा व लाल डोळे इतकेच दिसत होते. ती आकृती माझ्या अंगावर धावून आली. माझ्या गालांवरून हात फिरवून हळू आवाजात बोलायला लागली, "मिताली, माझे ऐक! चल माझ्याबरोबर. मी तुझी पूर्ण काळजी घेईन. इथे तुझ्या जीवाला धोका आहे. तुझे काकाकाकू खूप वाईट आहेत. ते सगळे स्वतःच्या नावावर करून तुला इथून हाकलून देणार आहेत. तुझ्या बाबांना फक्त पांढरे बाईंची पडली आहे, ते तुझी साथ अजिबात देणार नाहीत. तू माझी आहेस म्हणून तुला सांगतो, तुझी आजी अजून एक आठवडाच जगणार आहे. तुझे काकाकाकूच तिला मारणार आहेत, बघ मी सांगतोय तुला, चल माझ्याबरोबर!" तो बोलत असतानाच एकदम दार उघडल्याचा आवाज आल्यावर एकदम गायब झाला. अनिताने,"अंधारात का बसली आहेस?" असे विचारून लाईट सुरु केला. माझा अवतार बघून घाबरून काकूला जोरजोरात आवाज दिला तसे सगळे आत धावून आले. माझे केस पूर्ण अस्ताव्यस्त झाले होते. गालवर हाताचे व्रण उठले होते. माझा ड्रेस पूर्ण

अस्ताव्यस्त झाला होता. थोड्यावेळाने शांत झाल्यावर मी सगळ्यांना झालेला प्रकार सांगितला तर कोणाला कुठलाच आवाज आला नव्हता की ह्या खोलीतली लाईट थोडावेळ गेली होती हेपण कळाले नव्हते त्यामुळे असे कसे होऊ शकते ह्याचे आश्चर्य वाटले. मला घेऊन सगळे खोलीबाहेर येताना मोने गुरुजींना तिथे काहीतरी पडलेले दिसले. त्यांनी ते खिशात घातले. आम्ही परत आज रात्री सगळे एकत्रच झोपलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मोने गुरुजी, इन्स्पेक्टर विजय व काही कॉन्स्टेबल घरी आले. मागच्या आठवड्यात मोने गुरुजींकडे बाबा-काकांबरोबर जो काही प्रकार झाला त्यावेळी इन्स्पेक्टर विजय तिथे आले असताना झालेला सगळा प्रकार त्यांनी इन्स्पेक्टरांना सांगितला होता. त्याचा शोध घेणे त्यांनी तेव्हापासूनच सुरु केले होते. त्यात काल रात्री मोने गुरुजींना माझ्या खोलीत काहीतरी सापडल्याने त्यांना हा भुताखेताचा प्रकार नसून कोणीतरी मुद्दामून हे कटकारस्थान रचत आहे म्हणून सांगितले.

काल गुरुजींना काय सापडले हे मी विचारल्यावर ते आत्ता त्याबद्दल काहीच बोलू शकत नाहीत म्हणून सांगितले. त्यांनी पूर्ण घर, बाग सगळीकडे अजून काही सापडते का हे शोधायला सुरुवात केली. मी श्रीच्या जवळ येऊन त्याला इन्स्पेक्टरांना आपल्याला त्या दिवशी घराच्या बाजूला रक्त दिसलेले सांगायला सांगितले तर त्याने मला आत्ता काहीच बोलायला नको म्हणून सांगितले. श्री असा का वागत आहे तेच मला कळत नव्हते.

पोलिसांचा शोध सुरु असताना आम्ही सगळे एकीकडे नुसते बसून होतो. मी नेहमीप्रमाणे आजीकडे जाऊन बसले होते. खिडकीतून मी बाहेर पोलिसांना काही सापडते का ते बघत होते. तोपर्यंत तिथे मला श्री आणि अनिता काहीतरी कुजबुजताना दिसले. हे दोघे कधीपासून इतके चांगले मित्र झाले हे मला कळलेच नाही. पोलिसांनी आजूबाजूला कामाला येणाऱ्या मजुरांची, शेतकऱ्यांची, राजाराम आणि जयश्री काकूंची चौकशी केली. त्यांच्याशी बोलताना पोलीस त्यांच्यावरच संशय असल्यासारखे बोलत होते. त्यांची जबानी घेतल्यावर त्यांना गरज पडली तर तुम्हाला पोलीस स्टेशनला यावे लागेल म्हणून सांगितल्यावर तर दोघेजण खूप घाबरले. सगळे घर ढवळून काढल्यावर ते सगळे निघून गेले. काका व बाबा मोने गुरुजींबरोबर कुठेतरी बाहेर गेले.

काकूने अनिताला तिच्या बाबांना कॉल करून ते परत कधी येणार आहेत हे विचारायला सांगितले. त्यावर अनिताने त्यांना अजून कमीतकमी १५-२० दिवस लागतील म्हणून सांगितल्यावर काकूने,"हे बघ अनिता, हे जे काही घरी चालले आहे तेव्हा इथे तुझ्या जीवालापण धोका पोहचू शकतो शिवाय इन्स्पेक्टरांनीपण बाहेरच्या कोणालाही घरी फार वेळ थांबू देऊ नका म्हणून सांगितले आहे तेव्हा मला असे वाटत आहे की आता तू तुझ्या घरी रहायला जावे. तुझे आईवडील परत येईपर्यंत इन्स्पेक्टर कोणालातरी तुझ्या

घरावर पाळत ठेवायला सांगणार आहेत. त्यामुळे तू एकटी आहेस म्हणून घाबरायचे कारण नाही."

काकू अशी तडकाफडकी बोलल्यामुळे अनिता रडायला लागली. आजीने तिला प्रेमाने जवळ घेत,"हे बघ सोनाली, त्यावेळीच तू इन्स्पेक्टरांना अनिता आपल्या घरातलीच एक आहे हे निक्षून सांगायला हवे होते. अगं, तिचे आईवडील जाताना तिला किल्लीपण देऊन गेले नाहीत. एकटी पोर कुठे जाणार?"

काकू त्यावर," इन्स्पेक्टरांना सांगून आपण त्यांच्या घराचे कुलूप तोडूयात म्हणजे मग कोणावर काही येणार नाही"

त्यावर अनिता,"काकू मला त्या घरात खूप भीती वाटते हो! मी एकटीच कशी राहणार? आई घरी असतानाच मला फक्त त्या घरी प्रवेश आहे. आई कुठे थोड्यावेळासाठी जरी बाहेर गेली तरी ती मला माझ्या खोलीत बंद करते नाहीतर घराबाहेर काढून जाते. एवढे करूनही मला अध्येमध्ये खूप मार मिळत असतो. मी काहीतरी चोरून खाल्ले आहे किंवा तिच्या कपाटातून पैसे चोरलेत म्हणून माझ्यावर आरोप करते. मी स्वतःहून कधीच काही घेत नाही पण तरीही तिने बाबांचे कान भरल्यामुळे त्यांना पण असे वाटते की मी चोर आहे त्यामुळे तेपण आईची साथ देतात. आता जर मी एकटी त्या घरात राहिले तर आल्यानंतर ती काहीही गायब करून माझ्यावर आळ आणेल. तसेही तिला मी घरी नको आहे त्यामुळे हे कारण

पकडून ती मला घरातून हाकलून देईल मग मी कुठे जाणार?" असे म्हणून रडायला लागली.

तिचे हे रडणे बघून श्रीने,"अगं आई, राहू दे गं तिला इथे. आपल्या मितालीलापण तिचा आधार होईल. आणि तिला कशाला कोण काय करेल? तू काही काळजी करू नकोस" असे म्हंटल्यावर काकूने रागाने श्रीकडे बघून तिकडून निघून गेली.

बाहेरून काहीतरी खोदण्याचा आवाज यायला लागला. आम्ही सगळे बाहेर आलो. आजीला लागले असल्याने नीट चालता येत नव्हते शिवाय तिचा हातपण प्लास्टरमध्ये होता. तिने हाक मारून तिला बाहेर घेऊन जायला सांगितल्यावर मी मागे थांबून तिला तिचा वॉल्कर देऊन तिच्याबरोबर हळूहळू जायला लागले.

गेल्या आठवड्यानंतर मी आजीला एकटी सोडतच नव्हते. हे बघून एके दिवशी आजीने,"मिता, घाबरू नकोस. मला काहीही होणार नाही. सारखे मला चिकटून नको राहूस. फक्त कॉलेजला काय ती बाहेर जातेस. बाकी पूर्ण वेळ माझ्याबरोबर असतेस. आता जरा भयमुक्त जगायला लाग बरं!"असे मला समजावून सांगितले होते.

मोगऱ्याच्या झाडाच्या इथे एक मोठा खड्डा झाला होता, त्या खड्ड्यात राजाराम मोगऱ्याचे झाड मुळापासून काढण्यासाठी खोदत होता

पण मोगऱ्याचे मूळ खूप आतपर्यंत गेल्याने तिथे एक मोठा खड्डा झाला होता. मी लगेच तिथे पळत जाऊन," राजाराम, तुला कोणी सांगितले मोगऱ्याला इथून काढायला.! ह्याला परत लाव आणि खबरदार ह्याला परत हात लावलास तर " म्हणून मी जोरात ओरडले. माझा हा सखा माझ्यासमोर बाजूला पडला होता, ते बघून मला खूप रडू येत होते. बाबा व काकांनी मला धरून मागे आणले व हे झाड इथे ठेवता येणार नाही म्हणून सांगितले. पण मोगऱ्याचे मूळ इतके जाड व इतक्या खोल जाऊ शकते हा एक चमत्कारच होता.

बाबा व काकांनी जे सांगितले त्याने आम्ही सगळे स्तब्ध झालो होतो.

मागच्या आठवड्यात जे काही घडले ती कुठली भुताटकी नव्हती.मोने गुरुजींकडे आम्ही त्यादिवशी इन्स्पेक्टरांना भेटलो, त्यांना सगळी माहिती सांगितली. त्या दिवसापासूनच त्यांनी शोध घ्यायला सुरुवात केली पण तुम्हाला सगळ्यांना अगोदरच खूप ताण असल्याने आम्ही ही गोष्ट आमच्या दोघांच्यातच ठेवायची ठरवली. पण आता ही भुताटकी नसून आपल्याविरुद्ध कोणीतरी खूप मोठे कारस्थान रचलेले आहे हे निश्चित झाल्यावर आम्ही तुम्हाला सांगायचे ठरवले.

मोगऱ्याचे झाड आमच्याघरी कसे आले हे सगळ्यांना माहित असल्यामुळे कोणीतरी मोगऱ्याचा आधार घेऊन आम्हाला घाबरवत होते. आमचा मोगरा हा इतरांपेक्षा खरेच वेगळा होता. तो एका वर्षात खूप मोठा झाला होता. बघणारे सगळेच त्याला बघून तोंडात बोटं घालून तुम्ही ह्या झाडाचे फोटो, विडिओ करून पाठवा. इतके मोठे आणि बहरलेले झाड नक्कीच नोंदवले जाईल, असे म्हणायचे पण आमच्यासाठी हा जिव्हाळ्याचा विषय असल्याने आम्ही फक्त हसायचो.

माझ्या ह्या सख्याचा आधार घेऊन कोणीतरी आम्हाला घाबरवत होते. कोणीतरी त्याला माणसाचा आकार दिला होता. त्याच्या खाली एक स्पीकर लपवून ठेवला होता त्यातून आम्हाला हे सगळे आवाज येत होते. मैथिलीचे वर्षश्राद्ध हा दिवस आपल्या सगळयांसाठी उदास असतो हे त्या व्यक्तीने हेरून त्याच दिवसापासून आपल्याला घाबरवायला सुरुवात केली. बाहेरच्या आणि मागच्या दाराला मॅग्नेटिक लॉक लावले आहे, ज्याचा आकार एकदम छोटा असल्याने ते आपल्या कोणालाच दिसले नाही. ते लॉक फक्त त्याच्यासाठी असलेल्या मॅग्नेटनेच उघडते, ते तुम्ही लांबूनपण उघडू शकता. त्याला एक विशेष पासवर्ड दिला असल्याने मॅग्नेट कोणाच्या हातात आले तरीही ते उघडू शकत नाही. असले काही असते हे आम्ही पहिल्यांदाच ऐकत होतो. ते पोलीस त्यासाठी खास शिक्षित असलेल्या तंत्रज्ञाला बोलावून काढणार आहेत.

त्यादिवशीपण फक्त मितालीच्या खोलीतली लाईट गेली होती. बाहेर सगळीकडची लाईट होती. हे कसे काय झाले ते अजून कळले नाहीये. पोलीस तेपण शोधात आहेत. बघूया काही हाती लागते का? पण आता आपण सगळ्यांनीच जपून वागले पाहिजे. कुठेही जातायेता, घरी असतानासुद्धा डोळे उघडे ठेवा, कुठेही जराही काही संशयास्पद वाटले तर लगेच आम्हाला कळवा. पोलिसांना अजून ती व्यक्ती कोण असेल ह्याचा थोडासुद्धा सुगावा लागला नाहीये त्यामुळे आपल्याला खूपच जपून पाऊले उचलावी लागणार आहेत.

हसतखेळत छान असलेल्या आमच्या घराला कोणाचीतरी नजर लागली होती. आम्ही सगळेच आता घाबरून राहत होतो. घरी सहज भेटायला म्हणून कोणी आले तरीही त्याच्याकडे संशयाने बघत होतो.

मी व अनिताने कॉलेजला जायला सुरुवात केली होती. आम्ही रोज घरी येताना अनिताच्या घरी जाऊन तिचे आईवडील घरी आले का बघत होतो पण घराला कुलूपच असायचे. खरेतर माझे आणि अनिताचे खूप पटायचे. आम्ही दोघी बऱ्याचदा एकत्र असायचो. पण तरीही ती आता इथे २४ तास रहात असल्यामुळे कधीकधी अगदी नको वाटायचे. माझे स्वातंत्र्य हिरावून घेतल्यासारखे वाटत होते. कधीही कुठेही एकटी बसूच शकत नव्हते. कधी बाहेर बाकावर बसले तरी ही लगेच मागेमागे यायची. महत्वाचे

म्हणजे आजीचे प्रेम आता वाटले गेले होते जे मला अजिबात सहन होत नव्हते. त्यात श्रीपण काळजीने तिला काही हवे नको बघत होता. आम्ही दोघे बोलत बसलेलो असलो तरीही लगेच अनिताला हाक मारायचा आणि वर मला म्हणायचा,"तुझ्या मैत्रिणीला असे नको वाटायला की मितालीच्या दादाला मी इथे नको आहे म्हणून". तरीही एक दिवस त्याने अनिताला हाक मारुयात म्हंटल्यावर मी त्याला विचारले,"काय रे दादा, आपल्याकडे हा सगळा प्रकार चालू असताना जेव्हा पोलीस आले होते तेव्हा तू आणि अनिता परसात काय करत होता. मी तुम्हा दोघांना आजीच्या खिडकीतून बोलताना बघितले". असे म्हंटल्यावर तो एकदम दचकलाच, मला म्हणाला,"अगं त्यादिवशी ती खूप घाबरली होती. त्यामुळे परसात एकटीच थांबली होती. तिचा घाबरलेला चेहरा बघून मी तिला काय झाले हे विचारायला गेलो होतो. का ग? काय झाले?" मी काहीच नाही म्हणून मान हलवली.

थोड्या दिवसांनी काकूने परत अनिताला तिच्या आईवडिलांबद्दल विचारल्यावर तिने त्यांना कॉल करायचा प्रयत्न केला तर फोन बंद येत होता. खूपवेळा प्रयत्न करूनही फोन लागत नव्हता. तीन-चार दिवस प्रयत्न करूनही फोन लागत नाही म्हंटल्यावर बाबांनी इन्स्पेक्टरांना फोन करून शोध घ्यायला सांगितले. दोन दिवसात विजय सर सगळी माहिती काढून आम्हाला सांगायला आले. अनिताचे वडील एका प्रायव्हेट कंपनीत

कामाला होते. जिथून त्यांनी एक महिन्यापूर्वीच राजीनामा दिला आहे. ते आता त्यांच्या कुटुंबाबरोबर कोल्हापूरला राहायला गेले आहेत. पाहिजे असेल तर तिथल्या पोलीस स्टेशनला सांगून त्यांची सगळी माहिती काढता येईल. अगदी गरज लागलीच तर अनिताला ठेवून घेण्यासाठी आणि तिच्याशी चांगले वागण्यासाठी म्हणून त्यांना धमकीपण देता येईल.

कुठलेही आईवडील मुलीबरोबर असे वागू शकतात हे खरेच वाटत नव्हते. चला, आई सावत्र आहे म्हणून असे वागली पण वडिलांचे काय? आता पुढे काय करायचे हे अनितालाच विचारून ठरवायचे ठरले. अनिताला सगळे सांगितल्यावर बिचारीला खूप वाईट वाटले. आम्ही सगळ्यांनी तिला थोडा वेळ देऊन मग तिच्याशी बोलायचे असे ठरवले.

दोन-तीन दिवसांनी तिने आम्हाला सांगितले की ती महिलाश्रमात रहायला जाणार आहे. कुठे जाणार हे विचारल्यावर तिने एका आश्रमाचे नाव सांगून तिथे जाणार म्हणून सांगितले. तिने तिथे जाऊन सगळी चौकशी केली आहे व त्या आश्रमात तिला नोकरी मिळवून द्यायला पण ते लोक प्रयत्न करणार आहेत म्हणून सांगितले. त्यावर काकूने,"उद्या सकाळी जेवून मग जाशील." असे सांगून झोपायला निघून गेली. माझ्यावर इतके प्रेम करणारी काकू इतकी खडूस असू शकते हे मी पहिल्यांदाच बघत होते. काकूला अनिता इथे का नको होती तेच कळत नव्हते. बाकी सगळ्यांना

अनिता माझ्याबरोबर आहे म्हणून माझी काळजी नाही असे वाटत असताना काकूला माझी काळजी वाटत नाही का हा विचार मनात येऊन गेला.

काका व बाबांनी तिला आत्ताच कुठला निर्णय न घेता आपण काय करायचे हे ठरवू म्हणून सांगितले. त्यानंतर श्री, बाबा व काका तिघांनीही विजय सरांशी बोलून अनिता आता इथेच आपल्याबरोबर राहील म्हणून सांगितले. तिचा सगळा खर्च उचलायची जबाबदारी ह्यांनी घेतली होती. फक्त हे सगळे विजय सरांनी अनिताकडून लिहून घेऊन त्याची पोलीस स्टेशनमध्ये नोंद करून घेतली. मला एकीकडे अनिताला आश्रमात राहायला लागणार नाही म्हणून खूप आनंद झाला पण कुठेतरी आत बोचतसुद्धा होते.

आमच्या घराला आता अनिताची सवय झाली होती. काकू सोडून सगळे तिच्याशी चांगले वागत होते. अनितापण समजूनउमजून सकाळी लवकर उठून सगळ्या कामात मदत करत होती. काकू तिला फार काम करू देत नव्हती पण आजी स्वतःहून तिला मदतीला घ्यायची. काकू माझ्यावर मात्र खूप प्रेम करायची त्यामुळे कधीकधी छानपण वाटायचे.

काकाकाकू व आजी एका नातेवाईकांच्या लग्नासाठी म्हणून दोन-तीन दिवसांसाठी गेले होते. रविवारी बाबा सकाळपासूनच बाहेर गेले होते.

त्यामुळे घरात मी, अनिता व श्री असे तिघेच होतो. संध्याकाळी कंटाळा आल्याने चक्कर मारून बाहेर खाऊन मोठी चक्कर मारून घरी जायचे ठरले. आमचे घर तसे गावाबाहेर असले तरीही खूप शांत आणि गावाहून फार लांब नव्हते. त्यामुळे शेजारच्या गावात चक्कर मारून येऊ असे ठरल्यावर आम्ही जास्त रहदारी नसलेल्या रस्त्यावरून जात होतो. तिकडून जाताना एका घराबाहेर बाबांची गाडी दिसली. ती बघितल्यावर मी श्रीला एकदम,"बाबांची गाडी बघ" म्हंटल्यावर त्याने गाडी बाजूला घेऊन,"चल, काकाला सरप्राईझ देऊ" म्हंटल्यावर मीपण खुशीने तयार झाले. गाडी बाजूला लावून दार वाजवले तर एक बाई बाहेर आल्या. आम्हाला बघितल्यावर त्यांच्या चेहऱ्याचा रंगच उडाला. तोपर्यंत बाबा शर्टाची बटन लावत बाहेर आले.

आम्ही घरी पोहचल्यानंतर थोड्यावेळाने बाबा घरी आले. आम्ही कोणीच त्यांच्याशी बोललो नाही. मलातर काय करू, कशी प्रतिक्रिया देऊ तेच कळत नव्हते. मी इतकी दुःखात आहे, ह्याकडे लक्ष देण्याऐवजी बाबा फक्त स्वतःचाच कसा विचार करू शकतात? इतकी मोठी मुलगी असताना असे लफडे करणे कसे शोभते? शी! कल्पनाच करवत नव्हती. देवाला दोष देत देवाने आईला का असे माझ्यापासून नेले? नेले तर नेले मग हे सगळे दुःख माझ्याच वाट्याला का? अशी दूषणे लावत बसले होते. आजी, काकाकाकूंना सांगावे का? मी नाही सांगितले तर श्री किंवा अनिता

सांगतील का? असे बरेच प्रश्न मनात येत होते. आजकाल अनिताशी फार बोलावेसेच वाटत नव्हते, तीसुद्धा तसा प्रयत्न करत नव्हती. फक्त दुसऱ्यांसमोर माझी किती काळजी आहे हे दाखवत होती. त्यामुळे मी तिच्याशी फार बोलत नव्हते. खोलीत बसून कंटाळा आल्याने बाहेर येऊन बसले.

थोड्यावेळाने बाबा माझ्याशेजारी येऊन बसले. त्यांनी माझा हात हातात घेतला त्यावेळी हात काढून घ्यावासा असे मनात आले पण त्याऐवजी मी त्यांच्या खांद्यावर डोके ठेवून रडायला लागले. माझी आजकाल रडूबाईच झाली होती. बाबांनी मला मिठीत घेऊन तेपण रडायला लागले. आम्ही दोघे शांत झाल्यावर बाबांनी बोलायला सुरुवात केली.

मितु, मला माहित आहे तू माझ्यावर खूप चिडली असशील. आपल्या आयुष्यात इतक्या उलथापालथ होत आहेत, तुलातर सगळ्यात जास्त त्रास होत आहे तरीही मी असा कसा वागत आहे असे तुला वाटत असेल ना! अगं माझे आणि सावुचे खूप पूर्वीपासून संबंध आहेत. मी तुमच्या सगळ्यांपासून हे लपवून ठेवले होते म्हणजे अवि सोडून सगळे. हो! अवीला मी आमचे जुळले तेव्हाच सांगितले होते पण आमच्या दोघांचे हे ठरले की घरी कोणाला काही सांगायचे नाही. म्हणजे त्यामागे काही वाईट विचार नव्हता. एकतर मी मैथिलीची जागा कोणाला द्यायला तयार नाहीये, तुला

सावत्र आई घेऊन यायची नव्हती मला. सगळ्यांना समजले असते तर तिच्याशी लग्न कर म्हणून सगळे माझ्यामागे लागले असते म्हणूनच आम्ही घरी कोणाला काही सांगायचे नाही हे ठरवले.

मला सगळे ऐकायचे होते, बाबा असे का वागले हे जाणून घ्यायचे होते तरीही मी कुठलीही प्रतिक्रिया न देता मला काही फरक पडत नाही असे दाखवत होते. तरीही माझ्याकडे न बघता बाबा मला सगळे सांगत होते. पण मी काहीच बोलले नसल्याने एवढे सांगून ते शांत बसले. मी न राहवून त्यांना,"बाबा, पण मी असताना तुम्हाला दुसरे कोण का हवे होते? माझा विचारसुद्धा मनात आला नाही का तुमच्या?" असे म्हंटल्यावर बाबा एकदम हळवे होऊन,"नाही ग राणी, तूतर माझे सगळे आयुष्य आहेस. तू असताना मला खरेच कोणाची गरज नाहीये पण हे सगळे आपोआप झाले, मी मुद्दामून नाही केले. जर मला खरेच कोण हवे असते तर सगळे इतके मागे लागले होते तेव्हा दुसरे लग्न नसते का केले!

साधारण पाच-सहा वर्षांपूर्वी सावूची आमच्या बँकेत बदली झाली. एकदम शांत, अबोल असल्याने ती नेहमी एकटीच असायची. कोणालाच तिच्याबद्दल फारसे काही माहित नव्हते. तिच्या घरची परिस्थिती खूप नाजूक, पूर्ण घर तिच्यावर अवलंबून असल्याने आईवडिलांनी तिचे लग्नच लावून दिले नव्हते. दिसायला फार चांगली नसतानाही तिला थोडीफार

स्थळे आली होती म्हणे. पण आईवडिलांनी त्यांना परस्पर नकार दिला अशी थोडीफार माहिती कानावर आली होती. काही लंपट सहकारी तिच्याशी लगट करायचा करायचा प्रयत्न करायचे पण ती खूप साधी असल्याने कोणाला काही बोलली नाही पण त्याच्यामुळे ती जे थोडेफार सगळ्यांशी बोलायची तेपण बंद केले आणि ती तिच्याच कोशात राहू लागली. मी अगोदरपासूनच तिच्यापासून लांब राहत होतो त्यामुळे बोलायचा कधी संबंधच आला नाही. तुला आठवतंय का साधारण चारएक वर्षांपूर्वी अचानक धुवांधार पाऊस झाला होता, खूप नुकसान झाले होते. त्यादिवशी आम्ही बँकेतच होतो. पावसाळा नसल्याने किंवा तसे वातावरण पण नसल्याने कोणी छत्री वगैरे काहीही आणले नव्हते. पाऊस सुरु झाल्यावर थोड्यावेळाने थांबेल म्हणून सगळे निवांत होते. पण नंतर पावसाने चांगलाच जोर धरला. त्यावेळी मात्र आम्ही बँक बंद करून निघालो. प्रत्येक महिला कर्मचाऱ्यांना एकतर घरचे घ्यायला आले होते किंवा आमच्यापैकी कोणीतरी घेऊन जात होते. मी आपला एकटाच घरी येण्यासाठी निघालो तेवढ्यात माझे सावूकडे लक्ष गेले. तिला बिचारीला कोणीच विचारले नव्हते. घाबरून ती एका कोपऱ्यात उभी होती. मी तिच्याजवळ जाऊन,'घरी सोडू का?' विचारल्यावर तिने लगेच होकार दिला पण तिचे घर इथून खूप लांब असल्याचे सांगितले. ती एवढ्या पावसात एकटी घरी कशी जाईल ह्याविचाराने मी तिला घरी सोडायचे ठरवले. घराबाहेर सोडून मी परत घरी येत असताना खूप भिजलेलो असल्याने चहा

पिऊन जायला सांगितले. मलापण खूप थंडी वाजत असल्याने घरी गेलो. ती एकटी रहाते हे माहित असल्याने खूप कसेतरी होऊन अवघडून बसलो होतो. खूप भिजलो असल्याने मी कुडकुडत बसलो होतो. तिने आत जाऊन माझ्यासाठी टॉवेलबरोबर एक झब्बा व लुंगी आणून दिली. थोड्यावेळाने ती चहा घेऊन आली तेव्हा मी तिला नीट बघितले. तिने लाल रंगाचा ड्रेस घातला होता व केस टॉवेलने बांधले होते. मी त्यावेळी तिच्याकडे पाहतच राहिलो. तिने खाकरून 'चहा' असे म्हंटल्यावर भानावर येऊन चहा घेतला. दोघांनी काहीही न बोलता चहा घेतला. परत मुसळधार पाऊस सुरु झाल्याने मी तिथेच पाऊस कमी होण्याची वाट बघत बसलो. कितीवेळ आम्ही शांत बसणार ना. हळूहळू आम्ही गप्पा मारायला सुरुवात केली.

# दोन

मी पूर्ण रात्र तिच्याकडेच होतो. आम्ही त्या दिवशी रात्री खूप गप्पा मारल्या. आम्ही दोघेही एकटे होते ग! आई, अवि, वाहिनी आणि महत्वाचे म्हणजे तू माझ्या आयुष्यात असल्यामुळे मला तोपर्यंत कधीच एकटेपणा जाणवला नाही पण दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ऑफिसमधून घरी आलो त्यावेळी खूप एकटेपणा जाणवला. त्यानंतर आमच्या दोघांच्यात खूप चांगली मैत्री झाली. एक दिवस असेच सुट्टी होती, घरी एकटा होतो म्हणून तिच्या घरी गेलो. त्यादिवशी आम्ही दोघांनी आमच्यातली रेषा पार केली. त्यानंतर आम्ही दोघे बरेच दिवस एकमेकांशी बोलत नव्हतो पण आम्हाला इतकी एकमेकांची सवय लागली होती त्यामुळे करमतपण नव्हते. तुला आठवते का काही वर्षांपूर्वी मी गाडीवरून पडलो होतो, खूप लागले होते मला. दोन दिवस दवाखान्यात दाखल केले होते. तेव्हा ती मला बघायला आली. त्यावेळी आम्ही परत बोलायला लागलो.

आम्ही दोघे एकमेकांना खूप दिवस रोखू न शकल्याने आमच्यात परत संबंध प्रस्थापित झाले. पण त्यावेळेसच मी तिला लग्न करू शकत नाही म्हणून सांगितले. त्यावर ती म्हणाली,"मला कधी स्वप्नातपण वाटले नव्हते की माझे कोणाबरोबर जमेल म्हणून. एकतर घरच्या परिस्थितीने लग्न

करता आले नाही. त्यात दिसायला साधारण, स्वभाव एकदम शांत. त्यामुळे कोणाशी कधी जमलेच नाही. मला एकही मैत्रीण नाही. बँकेतपण सुरुवातीला मी सगळ्यांशी बोलायचा प्रयत्न केला पण स्वभावामुळे खूप पुढाकार घेऊन बोलायची माझी हिंमतच झाली नाही. बाकीचे पुरुष मी एकटी आहे म्हणून कधीतरी लगट करायचा प्रयत्न करायचे त्यामुळे स्वतःहून बोलणे बंद करून परत मी माझ्या कोशात गेले. पण तुम्ही बाकीच्या पुरुषांपेक्षा वेगळे होता. तुम्ही कधीच स्वतःहून माझ्याशी बोलायचा, माझ्याशी लगट करायचा प्रयत्न केला नाही. तेव्हाच मला तुम्ही आवडायला लागला होता. तुम्ही खूप एकटे आहात हे मला जाणवत होते. मला तुमच्याशी खूप मैत्री करायची होती पण स्वतःहून कसे बोलावे तेच कळत नव्हते. देवाला माझी ही भावना समजली होती म्हणूनच त्याने त्या दिवशी पाऊस पाडून आपल्याला एकत्र आणले. तुम्ही मला इतके सन्मानाने वागवता हेच माझ्यासाठी खूप आहे. मला तुमच्याकडून कुठलीही अपेक्षा नाहीये." खरे सांगतो मिता, तुझ्या आईला मी कधीच विसरू शकत नाही, तिचे स्थान मी कोणालाच देऊ शकत नाही पण त्यादिवशी मला तिच्यात कुठेतरी मैथिलीचा अंश दिसला. त्यादिवशी मैथिली तिथे येऊन माझ्याकडे बघून हसली आणि परत ती मला कधीच दिसली नाही. त्यादिवसापर्यंत मैथिली सारखी माझ्याबरोबर असायची. माझ्याशी बोलायची, गप्पा मारायची. तिच्या श्राद्धाला कधीच कावळ्याने

त्याच्यासाठी ठेवलेले पान पूर्ण खाऊन संपवले नव्हते. पण त्यानंतरच्या श्राध्दानंतर दरवर्षी कावळा पूर्ण पान संपवतो.

मितु, कृपा करून माझ्यावर रागावू नको ग.! समजून घे मला" बाबांचे सगळे ऐकून मलाच अपराध्यासारखे होत होते. मी बाबांचा कधीच विचार केला नाही, ते एकटे कसे राहत असतील हे कधीच मनात आले नाही. त्यादिवशी आम्ही दोघेजण खूप रडलो पण आमच्यातले प्रेम आणखीन घट्ट झाले.

काकाकाकू व आजी लग्नाहून परत आल्यानंतर घरी विचित्र प्रकार व्हायला लागले. घराबाहेर कुंकू लागलेले लिंबू पडलेले दिसायला लागले. कुठेही बाहेर गेलो तरी कोणीतरी पाठलाग करत होते पण मागे वळून बघितले तर कोणीच नसायचे. मोगरा मुळासकट काढला होता पण आता तिथे परत एक रोप उगवले होते. घरातले वातावरण एकदम उदास झाले होते.

एक दिवस कॉलेजमध्ये वर्गात जाताना अचानक कोणीतरी मागून आले व माझ्या अंगावर कुठल्यातरी मासांचा तुकडा टाकून गेले. ती व्यक्ती रक्ताने पूर्ण माखली होती व मांसावरसुद्धा रक्त होते. अचानक हा हल्ला झाल्याने मी खूप जोरात ओरडले. माझ्या तोंडावर मासांचा तुकडा

फेकल्याने माझा पूर्ण चेहरा रक्ताने माखला होता. माझी किंकाळी ऐकून सगळे तिथे जमा झाले पण तिथे कोणीच अश्या व्यक्तीला बघितले नव्हते ना तिथे मासांचा तुकडा होता पण माझ्या चेहऱ्यावरमात्र रक्त होते. काही जणांनी मला प्राचार्यांच्या केबिनमध्ये सोडले. तिथे माझी चौकशी सुरु झाली पण मी खूप घाबरलेले असल्याने काहीच बोलत नव्हते, माझी बोलतीच बंद झाली होती. त्यामुळे बाबांना फोन करून बोलावून घेतले. बाबा, श्री व विजय सर लगेच आले. मला असे बघून तेपण घाबरले. माझ्याशी तिथे काहीच न बोलता बाबा मला घरी घेऊन आले. विजय सर मात्र तिथेच थांबले.

घरी आल्यावरसुद्धा मी पुतळा असल्यासारखीच वागत होते. आजीने मला अंघोळ घालून स्वच्छ केले. बिचारीला खूप वाईट वाटत होते. “कोणाला आमच्या ह्या घराचे सुख बघवत नाही कळत नाहीये. एवढे धक्के पोहचल्यावरसुद्धा आम्ही सगळे खुश आहोत हे बघवत नाही मेल्याला म्हणून असा छळतोय आम्हाला. ये म्हणावे समोर. काय अडचण आहे सांग. तुला काही हवे असेल तर सांग. आम्ही तुला सगळे देतो पण आमच्या मितूला असा त्रास देऊ नकोस. बिनाआईची पोरं कशी राहत असेल विचार कर. थोडीतरी माणुसकी आहे की नाही तुझ्यात" असे बरेच बडबड करत होती, मला मात्र काहीच ऐकू येत नव्हते. माझे आवरून झाल्यावर काकूने मला चमच्याने चहा पाजवला. बाबातर माझ्याबाजूलाच बसून होते.

डॉक्टरांनी येऊन इंजेक्शन दिल्यामुळे मी झोपले ते सकाळीच उठले. सकाळी उठले तेव्हा अनिता शेजारीच केस सोडून बसली होती. तिला बघून मी परत जोरात किंचाळले. माझा आवाज ऐकून सगळे पळत आले. पण मी एका कोपऱ्यात सरकून घाबरून थरथर कापत होते. आजी आल्यावर मी तिला मिठी मारून तशीच बसून राहिले. कोणाला काय झाले तेच कळेना. अनिताला विचारल्यावर तिनेपण काही माहित नसल्याचे सांगितले. थोड्यावेळाने डॉक्टर आले, त्यांनी परत मला इंजेक्शन दिल्यामुळे मी परत झोपले. ३-४ दिवसानंतर मी परत हळूहळू बोलायला लागले.

मी परत सामान्य झाले आहे बघितल्यावर विजय सर माझ्याशी बोलायला आले. कोणाला काहीच माहित नसल्यामुळे नक्की काय झाले ह्याचे सर्वांना कुतूहल आणि काळजी वाटत होती. मी त्यादिवशी घडलेला सगळा प्रकार सांगितल्यावर त्या व्यक्तीबद्दल काही सांगता येईल का म्हंटल्यावर,”मला नीट आठवत नाहीये पण ती व्यक्ती रक्ताने माखली होती. चेहरा पूर्ण केसांनी झाकला होता. त्यामुळे चेहरा दिसला नाही. हो तिने अंगात गाऊन घातला होता. " बोलताना मला एकदम तो गाऊन मी कुठे बघितला हे मला आठवला,"तो गाऊन ना...."असे म्हणून मी शांत झाले. त्यावर बाबांनी लगेच,"काय मनू, तो गाऊन तू कुठे बघितला होतास का? काही आठवत आहे का तुला?" असे म्हंटल्यावर मी मान खाली घातली. विजय सरांनी फार न ताणता अजून काही आठवते का म्हंटल्यावर मी,"

मासांचा तुकडा होता ना, तो हृदयासारखा वाटत होता आणि ते हृदय धडधडत होते हो! हो ती व्यक्ती ना मला थोडी अनितासारखी वाटली." हे ऐकल्यावर काकूने अनिताला,"काय गं, तू कुठे होतीस त्या दिवशी? इतके सगळे मितालीबरोबर झाले तेव्हा तू तिच्याबरोबर नव्हतीस म्हणे. हे सगळे कॉलेजमध्ये आल्यावर पण तू तिथे नव्हतीस म्हणून भाऊजींनी सांगितले." सगळेच तिच्याकडे संशयाने बघायला लागले. तेवढ्यात श्रीने,"अगं आई, अनिताने मला कोणाला सांगू नकोस सांगितले म्हणून मी सांगितले नव्हते," असे म्हंटल्यावर आम्ही सगळे त्याच्याकडे आश्चर्याने बघितले. काकू,"काय बोलणार आहेस माहित आहे मला. प्रेम जडलंय ना तिच्यावर" असे म्हंटल्यावर श्री,"अगं आई, ऐकून तर घे. इथे ती आपल्यावर अवलंबून आहे हे तिला आवडत नाहीये त्यामुळे तिने मला नोकरी शोधायला सांगितली होती. एका ऑफिसमध्ये सहाय्यकाची जागा रिकामी आहे हे कळल्यानंतर मी तिला तिथे मुलाखतीसाठी पाठवले होते. ती नोकरी शोधतीये हे कळले तर बाबा व काका तिच्यावर चिडतील त्यामुळे काम होईपर्यंत कोणाला सांगू नकोस असे तिने सांगितल्यामुळे आम्ही कोणाला काही सांगितले नाही." त्यावर काकू,"अनिताला काय बोलता येत नाहीये का? का वकील म्हणून तुला नियुक्त केला आहे तिने!" काकांनी,"अगं अनिता, मितालीला आम्ही तुझ्या भरवश्यावर सगळीकडे पाठवतो. तू कॉलेजमध्ये जाणार नव्हतीस तर सांगायचे होते ना बाळा. त्यादिवशी मिताली गेली नसती" अनिता,"हो काका, माझे चुकलेच! मी मितालीला तरी सांगायला पाहिजे

होते. असे काही होईल असे वाटलेच नव्हते मला. मी ह्यापुढे कुठेच तिला एकटे सोडणार नाही. खरेच" असे म्हंटल्यावर काकूने,"मग मिळाली का नोकरी तुला?" असे विचारल्यावर तिने, "ऑफिसचा पत्ताच सापडला नाही. रिक्षावाला कुठेतरी दुसरीकडेच घेऊन गेला होता. तोपर्यंत काकांचा मला कुठे आहे विचारायला फोन आला, तेव्हा हे सगळे झालेले समजल्यावर मी लगेच घरी आले" मी,"अगं पण तू माझ्याबरोबर कॉलेजच्या गेटपर्यंत आली होतीस. नंतर मला म्हणालीस की तुला तासाला बसायचा कंटाळा आला आहे त्यामुळे ग्रंथालयात बसणार होतीस ना" त्यावर तिने नुसतीच खाली मान घातली. विजय सरांनी परत मूळ मुद्द्यावर येऊन अजून मला काही आठवत आहे का विचारून सगळे सविस्तर लिहून घेतले.

मला कॉलेजच्या नावाने धडकीच बसल्यामुळे माझे कॉलेज बंद झाले. मी घरीच राहायला लागले. दिवसभर बसून कंटाळा यायला लागल्यामुळे मी पेटी आणि कथ्थक शिकायला सुरुवात केली. पेटीच्या क्लासला मी आणि अनिता जायचो पण त्या दिवसानंतर आम्हाला सोडायला व आणायला काकू यायला लागली. तिला नको येऊ सांगितले तरी अनिता परत कुठे सोडून गेली तर नकोच असे म्हणून ती येतच होती. कथ्थकचा क्लास मी एकटीनेच लावला होता व तो संध्याकाळी असल्याने माझ्याबरोबर श्री यायचा, कधीकधी अनिता व श्री दोघेही यायचे. एकेदिवशी क्लास संपल्यानंतर मी श्रीची वाट बघत बाहेर थांबलेली

असताना माझ्यासमोरून कोणीतरी झपकन गेले व परत मागे येऊन जोरात हसून गेले. ती व्यक्ती त्यादिवशी कॉलेजमध्ये होती तीच होती, तिने तोच गाऊन घातला होता. त्या व्यक्तीला बघून घाबरून मी तिथेच चक्कर येऊन पडले.

मला शुद्ध आली तेव्हा मी माझ्या खोलीत होते. सगळेजण माझ्याभोवती बसले होते. मी शुद्धीवर आल्यावर डॉक्टर थोडावेळ माझ्याशी बोलून निघून गेले. मी खूप घाबरले होते पण ह्यावेळेस मला खूप धक्का बसला नव्हता. मी सगळ्यांना काय झाले हे सगळे सांगितले. त्यावर अनिता,"आज तर मी आजीबरोबरच पूर्ण वेळ घरी होते. हो ना आजी" असे म्हंटल्यावर काकू,"कोणाला काय तर कोणाला काय! मितालीची अवस्था बघून काळजी करण्याऐवजी हिला स्वतःचीच काळजी आहे." विजय सरांनी मला आणखीन काही माहिती विचारून,"काळजी करू नकोस मिताली, उद्यापासून मी तुझ्याबरोबर एका शिपायाला ठेवणार आहे" असे सांगून निघून गेले.

मी घरी कशी आले विचारल्यावर अमित माझ्यासमोर येऊन प्रकट झाला आणि "मैं हूँ ना!" असे हात पसरवून म्हंटल्यावर सगळ्यांनाच एकदम हसू आले. तो गेल्यानंतर,”अमित कसा काय मला घेऊन आला,” विचारल्यावर श्रीने माझ्याजवळ बसत माझा हात पकडून,"मीते, मला माफ

कर गं! नेहमीप्रमाणे तुला सोडून मी गप्पा मारायला म्हणून अड्ड्यावर गेलो. तुला घ्यायला म्हणून यायला लागलो तर वाटेत टायर पंक्चर झाले. त्यामुळे मला यायला उशीर झाला. नशिबाने अमित तिकडून जात असताना त्याने तूला खाली पडताना पहिले आणि घरी घेऊन आला. मला पंक्चर काढून यायला उशीर होणार म्हणून तुला सांगायला फोन केला तेव्हा अमितने तुझ्याबद्दल सांगून तो तुला घरी घेऊन आला.

त्यानंतर बरेचदा अमित घरी यायला लागला. खूप हसवणारा आणि हसणारा असल्याने घरी सगळ्यांना तो आवडायचा. काही वेगळे खायला केलेतर आजी खूपदा त्याला जेवायला बोलवायची. आमच्या घरातलाच एक झाला होता तो. सुरुवातीला मी त्याच्याशी खूप बोलायचे नाही पण त्याच्याबरोबर मी कधी मोकळे होऊन बोलायला लागले ते मलापण कळले नाही. आता कधीकधी तो मला कथ्थकला सोडायला आणायलापण यायचा. मी कोणाशीतरी इतकी छान बोलते आहे हे बघून घरातले खुश होते. आता तो मला आवडायला लागला होता पण श्रीने त्याचे कुठल्यातरी मुलीबरोबर संबंध आहेत म्हणून सांगितल्यामुळे मी स्वतःला रोखून धरले होते. गाडीवर जाताना कधी अचानक ब्रेक मारल्यावर मला त्याचा स्पर्श व्हायचा त्यावेळी अंगावर रोमांच यायचे. आतातर त्याला पाहिले की मला कसेतरी होऊ लागले होते. माझ्या मनातले भाव कोणाला कळू नयेत म्हणून मी खूप प्रयत्न करत होते पण तरीही आपण जे करत आहोत ते चुकीचे आहे,

त्याचे कुठल्यातरी मुलीवर प्रेम आहे तेव्हा आपल्याला असे वाटता कामा नये., असे नेहमी मनात येऊनसुद्धा कळते पण वळत नाही अशी स्थिती झाली होती. मी अमितला टाळायला सुरुवात केली. “अमितबरोबर मला नाही जायचे”, असे मी आजीला सांगितल्यावर तिनेपण होकार देऊन श्रीला मला घेऊन जायला सांगितले. अमितला मी त्याला टाळत आहे हे जाणवायला लागल्यावर तो घरी आल्याआल्या मला बाहेर बोलावून घ्यायचा. कधीतरी त्याला माझ्याच हाताची कॉफी प्यायची असायची तर कधी तो जबरदस्तीने मला त्याच्याबरोबर खायला बसवायचा. सगळयांसमोर तो मला खूप चिडवायाचा, तो खूपच फ्री असल्याने कोणाच्याही गळयात हात घालायचा, जवळ जाऊन बसायचा. अगदी आजी, काकूचे गाल वगैरे ओढायचा. त्यामुळे कोणालाच त्याचे काही वाटायचे नाही. पण मलामात्र अगदी कानकोंड्यासारखे वाटायचे.

एक दिवस कथ्थकच्या क्लासला जायची वेळ झाली तरी श्री घरी आला नव्हता. आजीसोडून कोणीच घरी नव्हते. श्रीची वाट बघून आजी मला सोडायला येणार होती तोपर्यंत अमित घरी आला. त्याने लगेच मला सोडायची व आणायची तयारी दाखवली पण आजीला मला त्याच्याबरोबर जायचे नाही हे माहित असल्याने तिनेपण तिला तिथे कुठेतरी जायचे आहे म्हणून सांगितले. त्यावर त्याने अगोदर मला सोडून मग आजीला घेऊन जायची तयारी दर्शवल्यावर तिला काहीच बोलता आले नाही. तिने मला

त्याच्याबरोबर जायला सांगून स्वतःचे काम ती दुसऱ्या दिवशी करेल म्हणून सांगितले.

खरेतर मला मनातून खूप छान वाटत होते पण त्यावेळी स्वतःवर कसा ताबा ठेवणार हा प्रश्नपण पडला होता. मी गाडीवर स्टेफनीला हात घट्ट धरून जरा लांबच बसले. अमितने पण काहीही न बोलता मला सोडले. क्लास सुटल्यावर मी खाली आलेतर तो माझी वाट बघत उभा होता. मी गाडीवर बसताना त्याने मला,"मालपे काकांनी काहीतरी सामान आणले आहे, ते आईने त्यांच्या शेतातून आणायला सांगितले आहे. त्यांना गावी जायचे आहे त्यामुळे ते सामान घेऊन मग मी तुला सोडतो चालेल का?"असे विचारल्यावर मी 'हो' म्हणून गाडीवर बसले. रहदारी असल्याने आम्हाला पोहचायला वेळ लागला. काका आमचीच वाट बघत होते. आम्हाला पिशवी देऊन ते लगेच गेले. त्यांनी आमच्यासाठी खायला म्हणून शेतातली कणसे भाजून ठेवली होती आणि चहापण केला होता. तो घेऊनच जायला सांगून ते निघाले. अमितने मला थोडावेळ तिथे बसायचे का म्हणून विचारल्यावर मी फक्त 'हं' असे उत्तर दिले व तिथे असलेल्या पारावर बसले. तो माझ्याशेजारी येऊन बसला. मी खाली मान घालून कणीस खात होते. त्यावेळी त्याने,"मिताली, काही झाले आहे का? माझे काही चुकले आहे का?" असे विचारल्यावर मी मान हलवूनच नाही म्हणून सांगितले. त्याने,"मी गेले काही दिवस बघत आहे तू माझ्याशी बोलत नाहीस, मला

टाळत आहेस, मी स्वतःहून तुला बोलावतो तेव्हा जबरदस्तीने येतेस. संधी मिळाली की लगेच पळून जातेस. काय झाले सांगशील का?" असे म्हणून माझा हात हातात घेतल्यावर तर मी एकदम स्तब्ध झाले आणि माझ्या हातातून कणीस खाली पडले. त्याने "अर्रे" म्हणून त्याचे कणीस मला खायला दिल्यावर मी नकार दिला. त्यावेळी त्याने माझी मान स्वतःकडे घेऊन माझ्या डोळ्यात बघून,"मीते काय झाले सांगणार आहेस का? तुझा हा अबोलपणा मला सहन होत नाहीये. का मला टाळतीयेस? काय झाले सांग ना" त्याच्या डोळ्यात पाणी आले होते. तरीही मी त्याच्या हाताला झटका देऊन परत खाली मान घातली. आता मला रडू आवरत नव्हते. मी रडतीये बघून त्याने मला जवळ घेतले. माझे पूर्ण अंग शहारले, मीपण त्याला जोरात मिठी मारली. त्याने माझे तोंड स्वतःकडे घेत माझ्या गालावर ओठ टेकवले. खूपवेळ आम्ही एकमेकांच्या मिठीत होतो. फोन वाजल्याने आम्ही भानावर आलो. त्याने फोन बघितला तर आजीचा फोन होता. अमितने फोन उचलून तिला सर्व सांगितले व आता येतच आहोत म्हणून सांगितले. आम्हा दोघांना खूप ओशाळल्यासारखे झाले होते. आम्ही तिथून लगेच निघालो. अमित मला घराबाहेर सोडून लगेच निघून गेला. नशिबाने घरी फक्त आजीचं होती. मी तिच्या गळ्यात पडून परत रडूबाई झाले होते. तिला माझ्या भावना समजत होत्या पण अमितचे कुठल्यातरी मुलीवर प्रेम आहे हे समजल्याने आम्ही काहीच करू किंवा बोलू शकत नव्हतो.

त्यानंतर अमितचे आमच्या घरी येणे कमी झाले होते. श्रीला तसाही अमित आमच्या घरी येणे फार पटत नसल्याने त्याच्या ते पथ्यावर पडले होते. त्यादिवसानंतर मात्र माझे कुठेच लक्ष लागत नव्हते. तो प्रसंग आठवून आठवून अंगावर शहारे येत होते, काहीच करावेसे वाटत नसल्याने नुसतीच झोपून असायची. अधूनमधून घराबाहेर लिंब पडायची, माझ्या खोलीच्यावरून कसलेकसले आवाज यायचे पण बहुतेक अमितने माझ्यावर इतकी मोहिनी घातली होती की आता मला कशाचीच भीती वाटेनाशी झाली होती.

साधारण महिनाभराने मी व आजी दोघीच घरी असताना, घरावर एकदम दगडं पडायला सुरुवात झाली. मोठमोठी दगडं पडत असल्याने त्याचा आवाज ऐकून आम्ही दोघींनी बाहेर यायचा प्रयत्न केला तर दार बाहेरून बंद होते. विजय सरांनी एका हवालदारांना माझ्याबरोबर सतत राहायला सांगितले होते पण मी नेहमीच घरातल्या कोणा ना कोणाबरोबर सतत असल्याने तेपण निवांत असायचे. अध्येमध्ये घरी जायचे किंवा कुठेतरी चक्कर मारून यायचे. मी बाहेर जाताना तर बरेचदा ते घरीच बसायचे किंवा दुसरीकडे कुठेतरी जायचे. त्यादिवशीपण नेमके त्यावेळी ते कुठेतरी बाहेर गेले होते. दगडं यायची थांबल्यावर जोरजोरात कोणाचातरी बोलायचा आवाज यायला लागला.

तुम्हाला काय वाटले? मी तुम्हाला सोडून गेलो! तुम्हाला असे वाटत आहे ना की कोणीतरी तुमच्याविरुद्ध षडयंत्र रचत आहे. कोणी जिवंत माणूस तुमच्याबरोबर असे करत आहे. मग मला सांगा तुम्ही मला पूर्ण मुळापासून काढला होता ना! मूळ निघाले होते तरीसुद्धा तिकडची सगळी माती काढून टाकली होती मग आपोआप दुसरे रोप कसे आले? आणि ते इतक्या झटक्यात कसे वाढले. मी पूर्वी होतो तसाच आकार कसा काय झाला हो माझा. त्याचा आकार तरी बघितला आहे का? मिताली, तू माझ्याशी अशी कशी वागू शकतेस? तुझ्यासाठी मी परत त्याच जागेवर जन्म घेतला पण आता तू माझ्याकडे येत नाहीस की बघत नाहीस, का असे करतेस? माझ्यावरचे प्रेम नाहीसे झाले का ग तुझे! का आता फक्त अमित दिसत आहे तुला?

असे म्हणून त्याने जोरजोरात हसायला सुरुवात केली. आवाज बंद झाला आणि जोरजोरात दार वाजायला लागले. मी बाहेर जाऊन दार उघडले तर दारात हवालदार होते. त्यांना मी कोणाला तिकडे बघितले का? विचारल्यावर त्यांनी नाही म्हणून सांगितले. त्यांना झालेला प्रकार सांगितल्यावर ते घाबरून,"ताई, आजी! कृपा करून आमच्या साहेबांना मी इथे नव्हतो म्हणून सांगू नका" असे म्हंटल्यावर मी,"अहो काका, पण हे सगळे घडत असताना तुम्ही काय करत होता हे विचारले तर! आणि मी सरांना फोन करून कळवले आहे. ते इकडे यायला निघाले आहेत" असे मी

बोलेपर्यंत सर आले. त्यांना हवालदार काका तिथे नव्हते हे न सांगताच कळले होते. त्यांनी तिकडे दुर्लक्ष करून आमच्याबरोबर काय झाले ते विचारले. हवालदार काकांना बाहेर थांबायला सांगून त्यांनी आजीला चहा करायला सांगितला. त्यांनी चहा घेताना ताटलीत हळूच एक कागद ठेवला, चहा पिऊन ते निघून गेले. मी ताटली आत ठेवताना आजीला कळू न देता चिठ्ठी हळूच हातात ठेवून त्यांना सोडायला म्हणून बाहेर गेले तर त्यांनी गाडीवर बसता बसता,''बाहेर कुठेतरी जाऊन वाच. इथे कॅमेरे आहेत. मी चिठ्ठी दिली आहे ते कोणाला कळता कामा नये.''

ते गेले आणि लगेच अमित आला. हा आत्ता कसा आला हा प्रश्न पडला असताना आजीला सांगून तो मला मालपे काकांच्या शेतात घेऊन गेला. तिथे त्याने मला,''विजय सरांनी फोन करून तुला इथे घेऊन यायला सांगितले,'' असे सांगितल्यावर मला खूप आश्चर्य वाटले. मोने काकांच्या घरी जो प्रकार घडला होता तेव्हाच त्याला काहीतरी विचित्र जाणवले होते. तिथे त्याने माझ्या गाडीजवळ श्रीला बघितले होते. तुझ्या बाबा-काकांवर इतका कठीण प्रसंग आलेला असतानाही तो त्रयस्थ असल्यासारखा काय करत आहे हे विचारायला जात असताना तो तिकडून गायब झाला. तिथेच मला त्याच्यावर संशय आला होता. त्यानंतर तू कथ्थकला जाताना जवळपास रोजच तू यायच्या आणि जायच्यावेळी मी तिकडे येऊन उभा राहायचो. ज्यादिवशी तू चक्कर येऊन पडलीस तेव्हा मलापण तिथे एक

व्यक्ती गाऊनमध्ये दिसली. तुझ्यासमोरून जाऊन तिने फटकन अंगातला गाऊन काढला आणि तिथे एकदम गर्दी झाली. मी त्या व्यक्तीकडे धावणार तोपर्यंत तू चक्कर येऊन पडलेली दिसलीस मग मात्र मी तुझ्याकडे आलो. जेव्हा सरांनी मला पोलीस स्टेशनमध्ये जबानी द्यायला बोलावले होते तेव्हा मी त्यांना सगळे सांगितले. मी त्यांना ह्या कामात मदत करायची ठरवली म्हणून त्यानंतर मी तुमच्याकडे नेहमी यायला लागलो होतो. माझे श्रीवर बारीक लक्ष होते. मी त्याचा पाठलाग करताना त्याने मला दोन-तीनदा पकडले. मी काहीतरी थाप मारली पण त्याला माझ्यावर संशय यायला लागला. मग मात्र मी त्याचा पाठलाग थांबवला व सरांनी ते काम दुसऱ्यावर सोपवले. तुला लक्षात आहे का की तुमच्या घरासमोर अचानक एक कुटुंब झोपडी करून रहात होते पण काही दिवसांनीच ती रिकामी झाली." मी हो म्हणून मान हलवल्यावर त्याने,"अगं ते कुटुंब बहुतेक श्रीनेच बोलावले होते. कारण त्यानंतर एक दिवस तुमच्या घरी येताना मी श्रीला त्या माणसाला पैसे देताना बघितले. कारण विचारल्यावर, त्याने मला तो माणूस त्याच्याकडे स्वतःहून गरज आहे म्हणून मदत मागायला आला आहे म्हणून पैसे दिले, असे सांगितले. तुला कोणी सांगितले आहे उठाठेव करायला असेही विचारले. त्यानंतर २ दिवसातच ती झोपडी रिकामी झाली. मला असे वाटत आहे की मी बघितले म्हणून श्रीनेच त्यांना जागा सोडून जायला सांगितले असेल.

"खरे सांगू मिता, काहीही कळत नाहीये पण आपल्याला आता जपून राहायला लागणार. प्रत्येक पाऊल जपून टाकायला लागणार आहे. तुला आत्तापर्यंत कळलेच असेल ना की अनिता आणि श्रीचे चक्कर चालू आहे". मी त्याला,"हे बघ अमित, मला असे वाटत आहे की तू ह्या सगळ्यापासून दूर रहा. तू का स्वतःला ह्यासगळ्यामध्ये अडकवून घेत आहेस? तू आत्तापासून ह्या सगळ्या प्रकरणातून अंग काढून घे. मी विजय सरांना कळवते तसे" असे म्हणून मी तिथून जायला लागल्यावर त्याने माझा हात धरून मला तिथे बसवत,"मिता तू माझ्याशी असे का वागत आहेस? माझे काही चुकले आहे का सांग ना!" मी त्याचा हात झटकून,"हे बघ अमित, तू माझ्याबरोबर सारखा येतजात असतोस. आमच्या घरी सारखा येतोस. ह्या सगळ्या चाललेल्या प्रकारात मदत करत आहेस हे सगळे तुझ्या मैत्रिणीला अजिबात आवडणार नाही. त्यामुळे कृपा करून तू हे सगळे बंद कर." असे म्हंटल्यावर त्याने,"माझी मैत्रीण? कुठली मैत्रीण? माझी कुठली मैत्रीण तुला असे म्हणाली ते तरी सांगशील का?" त्यावर मी,"अश्या किती मैत्रिणी आहेत अमित तुला?" अमित हसून,"अगं, खूप मैत्रिणी आहेत मला! खरेच" मी चिडून,"मला वाटले होते तू चांगला मुलगा आहेस. तुझे एकाच मुलीवर प्रेम असेल आणि तू तिच्याशी लग्नपण करशील. तू असा असशील असे वाटलेच नव्हते मला. मी निघाले आहे, माझ्यामागे आलास तर खबरदार!" असे म्हंटल्यावर तो जोरजोरात हसायलाच लागला. त्याचे हे हसणे बघून माझा अगदी संताप संताप झाला आणि माझी परत रडूबाई

झाली. मी रडत असलेले बघितल्यावर हसू थांबवून त्याने मला जवळ घेतले,"मिता, अगं मला खूप मैत्रिणी आहेत. पण माझे फक्त तुझ्यावर प्रेम आहे! आत्ता नाही तर लहानपणापासून मी तुझ्यावर प्रेम करतोय. मोनेकाकुंचे तुझ्यावर खूप प्रेम असल्याने तू लहानपणी खूपदा त्यांच्याकडेच असायची. तेव्हा आपण खूप खेळायचो. आठवते का तुला? आपण भातुकली खेळताना कितीदातरी आपण आईबाबा झालो होतो. मी कोणालाच बाबा होऊन द्यायचो नाही. किती भांडायचो मी सगळ्यांशी. पण नंतर जसेजसे जसजसे मोठे होऊ लागलो तसे आपले हे खेळणे थांबले. तुझे मोनेकाकांच्या घरी येणेपण कमी झाले. तरीही माझे तुझ्यावरचे प्रेम काही कमी झाले नाही. मी नेहमी तुला भेटायची, बोलायची संधी शोधायचो. तुला माझे प्रेम कधीच दिसले नाही! का तुला कळत असूनसुद्धा तू न कळल्यासारखे करतेस तेपण कळायचे नाही. माझे फक्त आणि फक्त तुझ्यावर प्रेम आहे मिता. फक्त तुझ्या होकाराची वाट बघत आहे मी" हे सगळे ऐकत असतानाच माझ्या अंगावर शहारे यायला लागले होते, चेहरा पूर्ण गुलाबी झाला होता. अमितने माझ्याकडे बघितल्यावर त्याला लगेच माझ्या भावना समजल्या. त्याने मला जवळ घेतल्यावर मी माझे तोंड ओंजळीत लपवले. त्याने माझे हात बाजूला करून माझा चेहरा हातात घेतला. खुपवेळ तो माझ्याकडेच असेच बघत बसला होता आणि मी खाली! बऱ्याचवेळाने मी एकदम मागे झाले. त्याला म्हणाले, "अरे, पण श्रीने घरी सगळ्यांना सांगितले आहे की तुझे कुठल्यातरी मुलीबरोबर

प्रेमप्रकरण चालू आहे म्हणून" हे ऐकल्यावर चिडून,"तरीच तू अचानक माझ्यापासून दूर राहायला लागलीस. ह्या शिऱ्याला.." असे म्हणेपर्यंत मी त्याच्या ओठांवर माझे ओठ ठेवले. आमच्या दोघांचे भान हरपले होते. कोणीतरी जोरात खाकरल्यावर आम्ही दोघे पटकन बाजूला होऊन कोण आहे बघितले तर विजय सर हसत उभे होते. ते,"चला एकदाची अमितला त्याची जीवनसाथी मिळाली. आता अमित नेहमी तुझ्याबरोबरच असल्याने मला तुझी जास्त चिंता करायला नको." थोडे थांबून,"हे बघ मिताली, मला तुझी काळजी आहे पण तरीही मला असे वाटते की असे घाबरून तू जे घरी बसली आहेस ना ते बंद कर. तुझ्याविरुद्ध जे कटकारस्थान चालले आहे, ते त्यासाठीच चालले आहे. तेव्हा तू आता निडर हो, कशालाही घाबरणे बंद कर आणि परत कॉलेजमध्ये जायला सुरुवात कर." हे ऐकून मी,"पण विजयसर मी आता अनिताशी जास्त बोलत नाहीये. मला तिच्यावर खूप संशय येतोय. त्यामुळे कॉलेजमध्ये मी एकटीच असणार, तिथे कोणी काही केले तर! त्यापेक्षा मी घरीच बसते" हे ऐकल्यावर अमित,"अगं मिता, आपल्याला असे घाबरून चालणारच नाही. हे जे कोणी करत आहे ना ती व्यक्ती तुला वेडं बनवायचा प्रयत्न करत आहे." मी,"अमित काय बोलतोयस कळत आहे का तुला?" असे मी ओरडल्यावर विजयसर,"मिताली, अमित जे बोलतोय ते खरे बोलत आहे. तुझ्या आईच्या नावाने २० एकर शेती आहे, जी आता तुझ्या नावावर झाली आहे. पण जर तुला काही झाले तर ती शेती श्री आणि बाबांच्या नावाने होणार

असे तुझ्या आईने अगोदरच लिहून ठेवले आहे. खरेतर ह्या जागेचे कोणालाच काही माहित नव्हते. तुझ्या आजोबांना आईने तसे सांगूनच ठेवले होते पण तुझे आजोबा मागच्यावर्षी वारले तेव्हा तुझ्या बाबांना हे समजले. त्यांनी घरीपण कोणालाच सांगितले नाही. पण मला खात्री आहे की श्रीला हे कुठूनतरी कळाले आहे त्यामुळे तो हे सगळे करत आहे." मी," मला बाबांनी काहीच का सांगितले नाही! खरे सांगू, मला नाही वाटत श्री असे काही करेल म्हणून. त्याचे माझ्यावर खूप प्रेम आहे. तो माझ्याशी असे वागूच शकत नाही. लहानपणापासून त्याला कोणी काही दिले तर तो मला त्यातले अर्धे द्यायचा. कधीकधी दोघांना खाऊ मिळायचा पण तो माझ्या आवडीचा असल्याने त्याचापण खाऊ मला हवा असायचा, तेव्हा कितीदातरी तो त्याचा खाऊ मला द्यायचा. नोकरी लागल्यावरसुद्धा त्याच्या पगाराचा काही हिस्सा मला द्यायचा म्हणून त्याने माझ्या नावाने एक रिकरिंग अकाउंट उघडले आहे. त्याला तसे करायची काहीच गरज नव्हती, तरीही त्याने हे केले. कोणी काहीही म्हणो श्री माझ्याबरोबर असे काही करणे शक्यच नाही"

हे ऐकल्यावर दोघेही विचारात पडले. विजय सर,"तू म्हणतीयेस ते खरे आहे मिताली. पण आतातरी आमचा त्याच्यावरच संशय आहे. आमचा शोध चालू आहे. हे सगळे जे कोणी करत आहे, ती व्यक्ती खूप हुशार आहे. त्याला हे सगळे होणार, हे प्रकरण पोलिसात जाणार हेसुद्धा

माहित होते त्यामुळे ती व्यक्ती प्रत्येक पाऊल विचार करून उचलत आहे. इतके महिने झाले तरीही आम्हाला एक धागा सापडत नाहीये. पण हे कोणी जे काही करत आहे ती तुमच्या एकदम जवळची आहे जिला तुमच्या घरातली एक न एक गोष्ट माहित आहे. आम्ही अनिताचापण शोध लावत आहोत. तिने आपल्याला सांगितले होते की तिचे आईवडील कोल्हापूरला बदली करून गेले आहेत. पण आम्हाला तिथे त्यांचा काहीच शोध लागला नाही. हे तिला सांगितल्यावर तिने थोडे रडल्याचे नाटक केले. तिला काहीच माहित नाही, असे सांगितले. आमचा तिच्यावर संशय आहेच. तिचा नक्कीच ह्यात हात आहे पण आम्हाला अजून पुरावा सापडला नाही म्हणून शांत आहोत" मी,"मग घरी सगळ्यांना सांगून तुम्ही तिला घराबाहेर का काढत नाही आहात. ती माझ्याच खोलीत राहते, मी बोलले, नाही बोलले तरी तिला काही फरक पडत नाही. बाकीच्यांशी मात्र अगदी चांगले वागते. एक काकू सोडली तर सगळ्यांवर तिची मोहिनीच पडली आहे. तिचे आणि श्रीचे काही चालू आहे असे काकूला वाटते म्हणून काकूचा तिच्यावर राग.! नाहीतर त्याअगोदर काकूलासुद्धा ती आवडायची. माझ्यापेक्षापण जास्त प्रेम करतात सगळे तिच्यावर. नको वाटते मला! मी काही बोलले तर सगळ्यांना असेच वाटेल ना की मी तिच्यावर जळते त्यामुळे मी कोणाला काही बोलत नाही. अगदी आजीलासुद्धा नाही.' विजय सर,"अगं काकूला नुसता संशय नाहीतर पक्के माहित आहे दोघांचे काहीतरी चालू आहे आणि ते खोटे नाहीये. दोघे एकमेकांच्या प्रेमात अखंड बुडाले आहेत. ते कुठेच

बाहेर जात नाहीत, किंवा बाहेर काही करतपण नाहीत. श्री आणि अनिता दोघेमिळून हे सगळे करत आहेत आणि त्यांनी मदतीला खूप सारी माणसे घेतली आहेत." मी,"तुम्ही म्हणता त्यादोघांचे चालू आहे, ते दोघे बाहेरपण भेटत नाहीत. मग कुठे भेटतात? शक्यच नाही." त्यावर अमित,"अगं त्यांना अख्खे घरच मिळतंय ना! काकूंनी त्या दोघांना नक्कीच पकडले असणार म्हणून तर त्या असे बोलत आहेत. एकदिवस माझ्या आणि विजयसरांसमोर त्यांनी अविकाकांना सांगितले पण त्यांचा ह्यावर विश्वास बसला नाही. त्यांनी काकूंनाच काहीतरी संशय घेतेस म्हणून विषय बदलला." मी,"अनितानेच श्रीला आपल्या जाळ्यात फसवले असणार. तिला आता कोणीच नाही ना! अनाथ म्हणून कोण लग्न करेल तिच्याशी आणि केलेतरी तो थोडीच इतका चांगला असणार, हे सगळे बघून पूर्ण विचाराने हिनेच माझ्या बिचाऱ्या भावाला प्रेमात अडकवले असणार. लग्नानंतर सगळे मिळणार ह्या विचाराने अनिताच करत असेल हे सगळे पण श्री शक्यच नाही. तो असा कधी विचारच करू शकत नाही. हे सगळे अनिता करत आहे असा संशय जरी आला ना तरी त्यादिवशी तो तिला पोलिसांमध्ये देईल." माझे हे ऐकून दोघे काहीही बोलले नाहीत. विजयसर,"चला आपण आता घरी निघुयात. सगळे वाट बघत असतील."हे ऐकल्यावर मी,"अरे अजून कोणाचा फोन कसा नाही आला मी कुठे आहे विचारायला" असे म्हंटल्यावर अमित हसून,"अगं आजीला माहित आहे तू माझ्याबरोबर आहेस." मी,"अरे पण ती मला तुझ्याबरोबर इतका वेळ कशी पाठवेल?

तिला असेच वाटत आहे की तुझे दुसऱ्या मुलीबरोबर प्रेमप्रकरण चालू आहे. आणि मला तू खूप आवडतोस हेपण तिला माहित आहे. मला ह्याचा त्रास होऊ नये म्हणून तर तीपण मला तुझ्याबरोबर येऊ देत नव्हती. आज इतकावेळ होऊनही तिचा फोन कसा नाही आला?" मी काय बोलले हे लक्षात आल्यावर मी एकदम लाजून शांत बसले तर लगेच अमित,"चला म्हणजे ह्या निमित्ताने का होईना पण तुझे माझ्यावर प्रेम आहे ह्याची तू कबुली दिलीस" विजयसर पण हसून,"चला आता" असे म्हणून गाडीत बसले. आम्ही दोघे पण लगेच तिथून निघालो. मी गाडीवर थोडी लांब बसल्यावर तो एकदम मागे होऊन मला चिकटला,"बघ हं मिता, मला असे बसून गाडी चालवता येणार नाही, आपण पडलो तर त्याला जबाबदार तू असशील."असे म्हणून पुढे सरकला. मी त्याला जोरात गुद्दा मारल्यावर अगदी जोरात लागल्यासारखे एकदम ओरडला. विजयसरांनी लगेच,"अरे अमित काय झाले?" असे विचारल्यावर त्याने,"काही नाही" म्हंटल्यावर हसून आमच्याकडे बघून गाडी सुरु केली. मी त्याला अगदी खेटून बसल्यावर साहेबांनी गाडी सुरु केली. घर येऊच नये असे वाटत होते पण आम्ही अगदी एका मिनिटातच घरी पोहचलो. श्री बाहेरच बसला होता. आम्हाला येताना बघून तो लगेच उभा राहिला,"मीते, अगं कुठे गेली होतीस? आज परत घरी हा सगळा प्रकार झाला तर मला लगेच का कळवले नाहीस. आणि ह्याच्याबरोबर कुठे गेली होतीस? चल आतमध्ये, सगळे तुझी वाट बघत आहेत," असे म्हणून अमितकडे दुर्लक्ष करून माझा हात धरून

मला घेऊन जायला लागला. मी अमितकडे बघून त्याला 'सॉरी' म्हणून श्रीबरोबर आत गेले. अमितपण आमच्यामागून आत आला. सगळे माझीच वाट बघत होते. मी आल्यावर सगळ्यांनीच माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरु केली. आजीने त्यांना झालेला सगळा प्रकार सांगितला होता. त्यामुळे सगळे घाबरून गेले होते. त्यात मी कुठे चालले आहे हे न सांगता अशी घराबाहेर निघून गेल्यामुळे सगळे खूप चिंतीत झाले होते. त्यावेळी मी सगळ्यांना,"मला घरी राहणे नको झाले होते. घरीच जास्त भीती वाटत होती म्हणून चक्कर मारायला बाहेर पडले होते. फिरतफिरत बरेच लांब गेले होते. अमित रस्त्यात भेटला आणि तो मला घेऊन आला. असे मी म्हंटल्यावर अनिता,"अगं पण अमित घरी आला होता ना. त्याच्याबरोबरच तर तू घराबाहेर पडलीस. मग तू असे का सांगत आहेस?" असे म्हंटल्यावर मी तिला,"तू तर घरी नव्हतीस मग तुला काय माहित?" असे म्हंटल्यावर २ मिनिटं ती लगेच गोंधळली पण लगेच स्वतःला सावरत,"अरे तू अमितबरोबर गाडीवर जात असताना मी घरी येत होते तेव्हा तुला बघितले" असे म्हंटल्यावर काका,"अगं तिला काय विचारतेस? तू मला सांग काय झाले नक्की आणि कुठे गेली होतीस तू?" त्यावर मी,"मी अमितबरोबर बाहेर पडले होते पण त्याला मी मध्येच सोडायला सांगून चालत निघाले पण तो परत भेटल्याने त्याच्याबरोबर परत आले". बहुतेक कोणालाच मी सांगितलेले खरे वाटत नव्हते पण कोणी काही बोलले नाही. आजीने अमितला जेवून जायला सांगून ताटं घेऊयात म्हणून आत गेली. मीपण

हातपाय धुवून मदतीला गेले तर अनिता तिथे सगळे करत होती. आजीने मला,” अनिता मदत करत आहे तर तू आराम कर,” असे म्हंटल्यावर मला खूप आश्चर्य आणि वाईटपण वाटले. ह्याअगोदर आजी मला सगळी कामे करता यायला पाहिजे, म्हणून कितीही दमले तरीही कामे करायला लावायची. मग आज तिला मी कामे केलेली नको आहेत. आता तिचे लक्ष अनिताकडे आहे, तिला अनिताला वळण लावायचे असेल, हा विचार करून मी माझ्या खोलीत निघून गेले. मी चिडून गेले हे आजीच्या लक्षात आल्याने आजीने काकूला “सगळयांना जेवायला बोलव” सांगून लगेच माझ्या मागे आली. मी लगेच,"आजी तू जा. मला नाही बोलायचे तुझ्याबरोबर" म्हणून कॉटवर अंग टाकले तर जवळ येऊन,"अगं मनुबाई, अशी रागावू नकोस आजीवर. तूला इतका सगळा त्रास होतोय, तू शारीरिकपेक्षा मानसिकरित्या खूप दमली असशील म्हणून मी तुला बसायला सांगितले. थोडा आराम केला की बरे वाटेल म्हणून मी म्हणाले. चिडू नकोस ग. तुझ्याशिवाय कोण आहे माझे." आजीच्या डोळयातून पाणी आले. मी लगेच आजीला मिठी मारून,"मला अनिता नको आहे ग इथे." आजी,"हो ग मनू. माहित आहे मला हे. पण तीतरी कुठे जाणार सांग मला. एकटी पोर आहे बिचारी. मी तिला माझ्या खोलीत राहायला सांगते. बास!" असे म्हंटल्यावर मी आजीला,"पण मग मी एकटी झोपू का?" आजी,"बघितलेस कशी दोन्ही बाजूने बोलतेस. मी अनिताला एकटीला माझ्या खोलीत नाही झोपवू शकत. आज आपण तिघी माझ्या खोलीत

झोपुयात." असे म्हंटल्यावर,"आजी मीच येते तुझ्या खोलीत झोपायला. नाहीतर मी माझे सामान तुझ्या खोलीत हलवते. तिला माझी खोली देऊ आपण". काकू आत येत,"नको हं मीते, तिला अशी स्वतंत्र खोली दिली तर ती काय करते आपल्याला काहीच कळणार नाही. तिला अशी स्वतंत्र खोली नाही द्यायची,"असे बोलत असतानाच अनिता तिथे उभी असलेली आम्ही बघितले. ती लगेच गोंधळून,"सगळ्यांनी तुम्हालापण जेवायला बोलावले आहे म्हणून मी बोलवायला आले" असे म्हणून तिथून निघून गेली. आम्ही काही न बोलता लगेच स्वयंपाकघरात आलो. काहीच झाले नसल्यासारखे आम्ही सगळ्यांनी हसतखेळत जेवण केले. त्यानंतर अमितला बाबांनी थांबवून घेऊन आम्ही सगळेजण खुपवेळ अंताक्षरी खेळलो. अमित सगळी प्रेमाची गाणी गात होता त्यामुळे माझा चेहरा अगदी लालेलाल झाला होता. मी खाली मान घालूनच बसले होते. अंताक्षरी खेळत असताना कोणालाच गाणी म्हणू न देणारी मी इतकी शांत बसलेले बघितल्यावर सगळे मला विचारत होते, पण आजीने तिला कोणी जबरदस्ती करू नका म्हंटल्यावर, माझा मूड चांगला करण्यासाठी जास्तच हसतखेळत मला सहभागी करून घ्यायचा प्रयत्न करत होते. पण मीमात्र अमितच्या गाण्यांमुळे लाजत होते. आज अंताक्षरी खेळताना मला अनिता व श्रीचे पण काहीतरी चालू आहे ह्याची जाणीव झाली. त्यांचे दोघांचे पण इशारो इशारोमें चालले असल्याने माझ्याकडे लक्ष गेले नाही. विजयसरांनी

सांगितल्याप्रमाणे आम्हाला दोघांनाही घरी कोणाला काही कळवू द्यायचे नव्हते. सरांनीतर आजीलापण सांगायला मनाई केली होती.

त्यारात्री आम्ही तिघी आजीच्या खोलीत झोपलो. अनिता एकटी माझ्या खोलीत झोपते म्हणत होती पण आजीने तिला आमच्याबरोबरच झोपायला सांगितले. दुसऱ्यादिवशीपासून आजी रोज रात्री आमच्याबरोबर झोपायला आमच्या खोलीत यायला लागली. आम्ही दोघी एकाच कॉटवर झोपायचो.

श्रीने दुसऱ्याच दिवशी मोगरा परत काढून टाकला होता. तिथे त्याने परत दुसरे झाड येऊ नये म्हणून कुठलेसे ऍसिड टाकले होते. पण माझ्याबरोबर होणारे प्रसंग वाढतच होते. मी कॉलेजला जायला सुरुवात केली होती. अमितनेपण कॉलेजला ऍडमिशन घेतल्यामुळे तोपण आमच्याबरोबर असायचा. आमच्याबरोबर एक हवालदारपण कायम असायचे. दुसऱ्याच दिवशी आम्ही दोघेजण हवालदारांची नजर चुकवून कॉलेजमधून हळूच बाहेर पडून मालपे काकांच्या शेतात गेलो. त्यांच्या शेतातल्या घरी कोणी रहात नसल्याने शिवाय त्याची एक किल्ली त्यांनी अमितला दिल्यामुळे अमित मला तिकडे घेऊन गेला. आम्ही इथे आहे हे कोणाला कळू नये म्हणून त्याने गाडी आतमध्ये लावली. गाडी लावून त्याने दार बंद केल्यावर माझी धडधड वाढायला लागली. मी पायाच्या बोटांनी

जमीन उकरत अंग चोरून खाली मान घालून उभी होते. जसा अमित जवळ आला तशी अजून धडधड वाढायला लागली. त्याच्याबरोबर थांबावेसे वाटत होते, त्याच्या मिठीत जावेसे वाटत होते पण त्याबरोबर एक अनामिक भीतीसुद्धा वाटत होती. त्याने मला हाताला धरून तिथे असलेल्या कॉटवर बसवले. तिथेच माठात असलेले पाणी मला प्यायला दिले. स्वतःपण पाण्याचे भांडे घेऊन अगदी माझ्याजवळ येऊन बसला. आम्हाला दोघांनाही काय बोलावे कळत नव्हते. त्यानेच विषय काढून,"मालपे काका माझ्या बाबांचे मानलेले भाऊ. मालपे आजोबा आणि माझे आजोबा जिगरी दोस्त. त्यांच्या घरची परिस्थिती नाजूक असल्याने त्यांचे सगळे शिक्षण माझ्या पणजोबांनी केले. दोघांची लग्न झाल्यानंतरसुद्धा आजोबांनी वेळच्यावेळी त्यांना मदत केली. शेतीचा काही भरवसा नसल्याने खूपदा नुकसान व्हायचे त्यावेळी आजोबा त्यांना मदत करत. मालपे कुटुंब खूप छान होते. ते शेतातली भाजी आम्हाला आणून द्यायचे, दर आठवड्याला घर शेणाने सारवून द्यायचे, घरातली बारीकसारीक सगळी कामे करायचे. त्याहून पैसे आले की त्यातले खर्चाला ठेवून उरलेले सगळे आजोबांना द्यायचे. आजोबा घ्यायचे नाहीत पण मालपे आजोबा ऐकायचे नाहीत. मग त्यांच्या स्वाभिमानाला धक्का लागू नये म्हणून आजोबा त्यांनी दिलेले पैसे बँकेत जमा करायचे. सगळे पैसे आजोबांना दिल्यामुळे त्यांना नेहमी पैशांची चणचण भासायची. त्यामुळे त्यांच्या मुलांची सगळी जबाबदारी आजोबांनी घेतली होती. त्यांची मुले दिवसभर आमच्याकडे असायची. फक्त रात्री

झोपायला घरी जायची. त्यांच्या घराला आग लागली, त्यात आजी, आजोबा, सगळी मुलं बळी पडली. डॉक्टर फक्त मालपे काकांना वाचवू शकले. त्यावेळी मालपे काका दहावीत होते. आजोबांनी त्यांची पूर्ण जबाबदारी घेऊन त्यांना डिप्लोमा करायला लावला. ही शेती चालवायला दिली. पण ह्या घराची किल्ली त्यांनी कधीच कोणाला दिली नाही. शिक्षण झाल्यावर त्यांना बाजूच्याच गावात नोकरी मिळाली. त्यावेळीसुद्धा ते ह्या घराची किल्ली घेऊन तिकडे गेले. कालांतराने त्या दोघांची लग्न झाली. ज्यावेळी बाबांचे लग्न झाले त्यावेळी त्यांनी ह्या घराची किल्ली आईला दिली. तेव्हापासून आई मालपे काका आले की घर स्वच्छ हवे म्हणून आठवड्यातून एक-दोनदा येऊन गड्याकडून घर स्वच्छ करून घेते. किराणा भरून ठेवते. मी मोठा झाल्यावर तिने ही जबाबदारी माझ्यावर दिली त्यामुळे आता ह्या घराची किल्ली माझ्याकडे असते". ह्या दुनियेत अजूनही माणुसकी जिवंत आहे, माणूस माणसाला मदत करतो पण काही करंट्यामुळे ह्याला बट्टा लागला आहे. त्यामुळे लोकांचा माणुसकीवरून विश्वास कमी होत चालला असला तरीही ह्या आणि अश्या लोकांमुळे ती कायम जिवंत राहणार ह्याची खात्री पटली. आम्ही त्यादिवशी खुपवेळ गप्पा मारत बसलो. त्यादरम्यान अमितने हवालदारकाकांना आम्ही दोघे एकत्र असल्यामुळे चिंता करू नका हेसुद्धा कळवले होते. संध्याकाळी अचानक दार ठोठावले गेल्याने आत्ता कोण आले असेल, आम्हाला दोघांना असे दार लावून आत बसलेले बघून काय होईल ह्या काळजीने आम्ही दोघेही घाबरलो. माझी

परत एकदा रडूबाई होत होती. अमितने मला शांत राहण्याचा इशारा करून तिथे असलेल्या छोट्या झरोक्यातून बाहेर बघितले आणि लगेच दार उघडायला गेला. मला कोणी बघू नये म्हणून मी तिथेच असलेल्या अर्ध्या उंचीच्या मोरीत जाऊन लपून बसले. हवालदार काकांचा आवाज आल्यावर मी बाहेर आले तर दोघे माझ्याकडे बघून हसायला लागले. घरी जायची वेळ झाली म्हणून सांगायला हवालदारकाका दार वाजवत होते. विजयसरांनी त्यांना आम्ही इथे असू म्हणून सांगितले होते. घरी जाताना मी हवालदारकाकांबरोबर गेले. जाताना माझ्या मनात अमितबद्दल विचार येत होते. मी किती चांगला जोडीदार निवडला आहे असे म्हणून मनातल्या मनात स्वतःचीच पाठ थोपटून घेत होते.. इतकावेळ आम्ही दोघेच घरी बसलो असतानाही तो माझ्याजवळसुद्धा आला नव्हता.

मागचा प्रसंग झाल्यापासून हवालदारकाका मला सोडून कुठेही जायचे नाहीत. रात्रीसुद्धा दुसरे हवालदार आमच्या घराबाहेर उभे असायचे. पण तरीही रोज कॉलेजला जाताना वाटेत बऱ्याचदा लाल लिंबू पडलेले असायचे. कधीतरी अंड्याची टरफले तर कधी मोगऱ्याची फांदी पडलेली असायची. माझ्याअगोदर जे तिकडून जायचे त्यांना कधीच असे काही दिसायचे नाही पण मी तिकडे गेले की हे सगळे एकदम प्रकट व्हायचे त्यामुळे बाकीची सगळी मुलंमुली मला घाबरायला लागली होती. बरेच दिवस हे प्रकार न थांबल्याने एक दिवस प्राचार्यांनी मला बोलावून घेऊन मी

कॉलेजला न येतासुद्धा एकदम परीक्षा देऊ शकते म्हणून सांगितले. त्यावर मी जेव्हा मला कॉलेजला यायचे आहे, असे सांगितल्यावर त्यांनी मला, माझ्यामुळे बाकीचे विद्यार्थी कॉलेजला यायला घाबरायला लागले आहेत. सगळयांच्या पालकांचीपण तक्रार आली आहे. ते ह्याबाबतीत विजयसरांशीपण बोलले होते. माझे कॉलेजला जाणे परत बंद झाले. खूप वाईट वाटले मला. एकतर अनितामुळे कॉलेजमध्ये माझी सगळयांशी मैत्री तुटली होती. आतातर सगळे मला घाबरत होते. मला खूप वाईट वाटत होते. अमितबरोबर मी घरी आले. कोणाशी काही न बोलता मी घरी जाऊन कॉटवर अंग टाकले तर एकदम काहीतरी टोचले म्हणून बघितले तर तिथे आई होती. तिचा चेहरा पूर्ण रक्ताने माखला होता.आईला रक्ताने माखलेले बघून मी तिचा चेहरा पकडून तिला पुसायला लागले तर रक्तच निघेना. पण तीमात्र माझ्याकडे एकटक बघत होती. तिला हातात घेऊन मी 'आई आई' म्हणून जोरजोरात हाका मारायला लागले. आईपण 'मितुडी मितुडी' करत मला हाका मारत होती. तिने मला घट्ट मिठी मारली होती. आम्ही दोघीजणी खुपवेळ एकमेकींकडे नुसतेच बघत होतो. थोड्यावेळाने ती,"मिताली, खूप प्रेमाने नाव ठेवले ग तुझे. तुझे खूप लाड करायचे, तुला लहानाची मोठी करताना प्रत्येक क्षण मनात जपून ठेवायचा, तुला खूप छान संस्कार लावायचे.. असे कितीतरी ठरवले होते ग. पण ह्या स्वप्नाला कोणाचीतरी नजर लागली आणि मी तुला सोडून गेले". मी,"हो ग आई, मला तुझी नेहमी आठवण येते! तू का मला अशी एकटीला सोडून गेलीस? तुला अगोदरच

माहित होते ना की तू मला जन्म दिलास तर तुझ्या जीवाला धोका आहे. मग का जन्म दिलास मला?" असे म्हणून मी जोरजोरात रडायला लागले. तिने मला जवळ घेतले,"हे बघ मितु, जे झाले ते परत काही येऊ शकत नाही. पण बाळा तू जपून रहा, तुझ्या जीवाला धोका आहे ग. ही सगळी लोकं तुला वेडं ठरवणार आहेत. तू कोणाचे म्हणजे कोणाचे ऐकू नकोस. अगं मी तुझ्याबरोबर रहायचे म्हणून मोगऱ्याचे रूप घेऊन आले होते. पण घरातल्या सर्वांना तुला एकटी पाडायचे आहे म्हणून ते माझे अस्तित्व मिटवत आहेत पण बाळा तू घाबरू नकोस, मी कायम तुझ्याबरोबर असणार आहे. सगळ्यांनी मला कितीदा तोडू दे मी परत येणार" आई माझ्याशी बोलत असताना आजी तिथे आली. तिने माझ्या हातातून आईला एकदम हिसकावून घेतले. मी आजीला जोरात ढकलून आईला परत जवळ घेऊन तिच्या मिठीत घुसले. आम्ही दोघी एकमेकींना घट्ट बिलगलो होतो. आजी जोरात खाली पडल्याने तिला उठताच येईना. ती,'सोनल अगं ये सोनल... अनिता, श्री, अवि, धनु' अश्या सगळ्यांना जोरजोरात हाका मारत होती पण तिच्या मदतीला कोणीच आले नाही. मी आजीकडे रागाने बघत,"आजी तूसुद्धा मला माझ्या आईपासून दूर करतीयेस. वाईट आहेस तू. इथे माझे कोणीच नाहीये. आई, मला सोडून तू आता कुठेच जायचे नाहीये". मी तिच्याशी बोलत असताना हवालदार काका पळत आत आले. त्यांनी मला मागून जोरात पकडले आणि एका हाताने आईला माझ्यापासून दूर करायला लागले पण आम्ही दोघींनी एकमेकींना इतके घट्ट पकडले होते कि त्यांना

मला आईपासून वेगळे करणेच जमेना. शेवटी त्यांनी मला डोक्यावर जोरात मारून खाली पडले, तितक्यात त्यांनी आईला माझ्यापासून दूर करून बाहेर घेऊन गेले. मी तशीच कॉटवर 'आईआई' म्हणून रडत पडले होते. थोड्यावेळाने सगळे खोलीत आले. आजीला उठवून बाहेर घेऊन गेले. बाबांनी मला जवळ घेतले. मी त्यांना घडलेले सगळे सांगून आपले इथे कोणीच नाहीये बाबा. चला आपण इथून दूर जाऊयात. आपल्याला तुमच्या त्या पांढरेबाईंचीसुद्धा गरज नाहीये. त्यादिवशी मी जो गाऊन बघितला होता ना तो पांढरेबाईंचा होता. आम्ही घरी आलो होतो तेव्हा त्यांनी तोच गाऊन घातला होता. बाबा हे सगळे आपल्या तिघांविरुद्ध कट रचत आहेत. आई इथे आपल्यात नाहीये तरीही तिलासुद्धा त्रास देत आहेत. चला ना आपण इथे नको राहायला". माझे रडणे काही थांबत नव्हते. बाबा मला नुसते कुरवाळत बसले होते.

मी खूप खचून गेले होते. आतातर रोज आई माझ्याजवळ येऊन बसायची, माझ्याबरोबर गप्पा मारायची, तिने मला सगळे खरे खरे सांगितले होते. आजीसुद्धा माझी नव्हती. तिचे मुलगा म्हणून श्रीवर जास्त प्रेम आहे आणि मला संपत्ती मिळाली तर ती ह्या घरात न राहता माझ्या नवऱ्याला मिळेल म्हणून तीसुद्धा माझ्याविरुद्ध आहे. इतकेच कायतर बाबांनासुद्धा मी नको होते. त्यांना माझ्यामुळे पांढरे बाईंकडे रहायला जाता येत नव्हते. त्यामुळे मी सगळ्यांशीच बोलणे बंद केले होते, खोलीतून बाहेर पडणे बंद

केले होते. अमित आला तरीही त्याला भेटायला नकार दिला. घरातल्यांनासुध्दा मी नको असल्याने कोणीच माझ्याकडे येत नव्हते, आले तरी मी कोणालाच आत घेत नव्हते. मात्र आई कायम माझ्याबरोबर असायची. तिच्या कुशीत मी झोपायची, ती मला गाणे म्हणून थोपटवून झोपवायची., माझे लाड करायची.

आज सकाळी घरात जोरजोरात आवाज यायला लागला. कोणीतरी कसलेतरी मंत्र म्हणत होते, शिवाय कसलातरी धूरसुद्धा येत होता. धूर खूप झाल्याने मला समोरचे दिसणे बंद झाले. तर कोणीतरी मला जबरदस्तीने उचलून बाहेर आणून बसवले. मला तिथे बसायचे नव्हते पण दोन व्यक्तींनी मला दोन्ही हाताला घट्ट धरून बसवून ठेवले होते. तिथे कुठला तरी होम चालला होता. मी डोळे बंद करूनच तिथे बसले होते. माझ्या कपाळाला अंगारा लावून मला कुठलेतरी तीर्थ पाजवले गेले. होम संपून सगळे शांत झाले तरीही मी खुपवेळ तिथे तशीच बसून होते.

माझ्या अंगातले त्राणच गेले होते. थोड्यावेळाने अमित माझ्या-शेजारी येऊन बसला. त्याला बघितल्यावर मी त्याच्या मांडीवर डोके ठेवून तिथेच झोपून गेले. मी डोळे उघडले तर सगळे माझी उठायची वाट बघत बसले होते. सगळ्यांना बघून मी उठून आत जात असतानाच अमितने मला तिथेच बसायला सांगितले. विजयसरांनी मला एक मोगऱ्याची फांदी

दाखवली. ती फांदी बघून मी एकदम आई म्हणून ओरडले. तर त्यांनी मला सगळे नीट ऐकून घे म्हणून सांगून,"हे बघ मिताली, कोणीतरी ही फांदी तुझ्या कॉटवर ठेवली होती. हे बघ, ही फक्त फांदी आहे आणि ह्याला तुझ्या आईचा चेहऱ्याचा फोटो काढून लावला आहे. तू नीट बघितले नाहीस आणि ह्या फांदीला आई समजून बसलीस". मी,"ही माझी आईच आहे. तुम्ही सगळे माझ्याविरुद्ध कट करत आहात. तुम्हाला कोणालाच मी नको आहे. विजयसर तुम्हीसुद्धा ह्यांच्या कटात सामील झालात ना!" असे म्हणून मी तिथून ताडकन उठले. सगळ्यांनी मला आवरायचा खूप प्रयत्न केला पण तिथे माझ्या मदतीला आई धावून आली. तिने व मी सगळ्यांना ढकलले व पळत माझ्या खोलीत जाऊन दार आतून बंद करून घेतले. सगळे बाहेर येऊन दार वाजवत होते. पण मी अजिबात दार उघडले नाही. मी आईच्या मांडीवर डोके ठेवून झोपी गेले.

थोड्यावेळाने मला जाग आली तर मी कुठल्याश्या खोलीत होते, तिथे माझे हातपाय बांधून ठेवले होते. मी घाबरून सगळीकडे बघत असतानाच एक नर्स तिथे आली. तिने हसून प्रेमाने माझी चौकशी केली. मी आरडाओरडा करून मला सोडायला सांगितले. थोड्यावेळाने बाबा तिथे आले. मला बघून ते खूप रडत होते,"मिता, का गं अशी वागत आहेस? अगं तू झालीस आणि तुझी आई देवाकडे गेली. तू तिला फक्त फोटोत बघितले आहेस. मला सांग गेलेली व्यक्ती अशी परत येईल का?" मी,"माझी आई

माझ्यासाठी परत आली आहे. तुम्हा सगळ्यांना मी नको आहे म्हणून ती माझ्याबरोबर रहायला आली आहे. मी तुम्हाला नको आहे ना, मी घरून निघून जाते. मला आई दुसरीकडे घेऊन जाणार आहे. आम्ही जातच होतो पण तुम्ही काहीतरी केले त्यामुळे ती मला घेऊन जाऊ शकली नाही." माझा अवतार खूप घाबरवणारा झाला होता. मला बघून बाबा अजूनच रडायला लागले. एक नर्स येऊन त्यांना घेऊन गेली. तिथे डॉक्टर येऊन माझ्याशी बोलत होते पण ते काय बोलत होते तेच मला कळत नव्हते. बरेच दिवस मी दवाखान्यात होते. त्यावेळी एकदाही आई तिकडे आली नाही. मला गरज असताना आई का येत नाहीये तेच कळत नव्हते. हळूहळू मी नॉर्मल होत होते. साधारण ८-१० दिवसांनी मला दवाखान्यातून सोडले व आम्ही परत घरी आलो.

कोणीतरी माझ्या खोलीत मोगऱ्याच्या फांदीला रक्त लावून माझ्या खोलीत ठेवले होते. माझ्या मनात अगोदरच भीती होती त्यात मी आईलापण खूप मिस करत होते त्यामुळे मी तिला आईच समजले होते. मी तिची प्रतिमा तयार करून तिच्याशी बोलत होते. कोणालाच मी खोलीत येऊ देत नव्हते. मला बेशुद्ध करून मानसिक तज्ज्ञांकडे नेले होते. डॉक्टरांनी माझ्याशी बोलून मला परत ठीक केले होते. पण मला खूप जपायला सांगितले होते, नाहीतर माझ्यावर वाईट परिणाम होऊन काहीही होऊ शकते म्हणूनपण सांगितले होते. आजीला मी ढकलल्याने बिचारीला जोरात

लागले होते. ती कशीबशी उठून स्वतःची कामे करत होती. मी घरी आल्यावर आजीच्या गळयात पडून तिची माफी मागितली. तिलापण माझी अवस्था कळत होती.

अमित रोज संध्याकाळी घरी यायचा. आम्ही घराबाहेरच चक्कर मारायचो पण त्यावेळीसुद्धा हवालदार काका आमच्याबरोबर असायचे. जवळपास महिनाभर सगळे व्यवस्थित चालू होते. काहीच झाले नाही. मात्र त्यानंतर एके रात्री श्री पूर्ण रक्ताने माखलेला घरी आला. तो ऑफिसमधून घरी येताना वळणावरच त्याला कोणीतरी ठोकून पळून गेले होते. त्याच्या डोक्यातून रक्त येत होते. नशिबाने फार लागले नव्हते. ४-५ दिवसांनी तोच प्रकार बाबांबरोबर, त्यानंतर काही दिवसांनी जसाच्यातसा प्रकार काकाबरोबर झाला. काहीच सुगावा लागत नव्हता. तिथे कॅमेरा वगैरे काहीच नसल्याने कोण हा प्रकार करत आहे तेपण कळत नव्हते. बरं! त्या तिघांना समोर गाडीपण दिसत नव्हती. अचानक कुठलीतरी गाडी येऊन ठोकून निघून जायची त्यामुळे ती गाडीसुद्धा त्यांना नीट दिसली नव्हती.

साधारण ४-५ दिवसांनी काकू बाहेर झाडत असताना, कोणीतरी अचानक येऊन तिच्यावर हल्ला केला पण तिला फार लागले नव्हते. नंतर हाच प्रकार अनिताबरोबर झाला. मी व आजी सोडून सगळेच जखमी झाले होते. आजीला नीट चालता येत नसल्याने ती घराबाहेर पडत नव्हती तर

माझ्याबरोबर अमित व हवालदारकाका असायचे त्यामुळे आम्हा दोघींना काही झाले नव्हते. हे सगळे झाल्यावर अनिताला आमच्यामुळे धोका नको म्हणून काकूने मागे लागून तिला कोणाच्यातरी घरी पेइंगगेस्ट म्हणून ठेवले. तिचा सगळा खर्च आम्हीच करत होतो पण तिला काकूने घरी यायलासुद्धा मनाई केली होती. ह्यावेळेस तिने कोणाचे काहीही ऐकले नाही, खूप ठाम होती ती. त्यामुळे अनितानेसुद्धा खूप आर्जवे करून काहीही उपयोग झाला नाही.

अमितमात्र माझी खूप काळजी घेत होता. रोज संध्याकाळी घराबाहेर चकरा मारल्या की आम्ही बाहेरच ओट्यावर तासंतास गप्पा मारत बसायचो. लग्न कसे करायचे, मुलांची नावे काय ठेवायची, हे गाव सोडून कुठेही जायचे नाही, आजीला मी माझ्याबरोबर घेऊन येणार, मुलांना कसे संस्कार द्यायचे अश्या खूप गप्पा मारायचो. श्रीला हे अजिबात पटत नव्हते पण मी अमित आला की एकदम आनंदी व्हायची त्यामुळे त्याला काहीच करता आले नाही शिवाय श्री सोडून बाकी सगळ्यांना तो आवडत होता.

एक दिवस संध्याकाळी अचानक बाबा पांढरेबाईंना घेऊन घरी आले. त्यांचा चेहरा पूर्ण काळानिळा झाला होता. अंगावर बऱ्याच ठिकाणी वळ उठले होते. आता नवीन काय भानगड म्हणून आम्ही सगळे घाबरलो. त्यावेळी बाबांनी सांगितले की पांढरेबाईंना आईबाबा व दोन लहान भावंडे

आहेत. दोन्ही भावांची लग्न झाली असून त्यांना मुलेसुद्धा आहेत. तरीही ती काहीही कमवत नाहीत. सगळे कुटुंब पांढरे बाईंवर अवलंबून आहे. त्यांना जेव्हा ह्या दोघांबद्दल कळाले तेव्हा बहुतेक त्यांना आता आपले कसे होणार, ह्याची चिंता लागली असेल. त्यामुळे ते सगळे आज सकाळी जाब विचारायला घरी आले होते. तिने जेव्हा आमच्या दोघांचे नाते कबूल केले तेव्हा त्यांनी लगेच माझ्याशी संबंध तोडायला सांगून दुसरीकडे बदली करून घे म्हणून सांगितले. तिने नकार दिल्यावर राग येऊन दोन्ही भावांनी तिला खूप मारले. ती बेशुद्ध येऊन खाली पडली त्यावेळी त्यांना बहुतेक आपण हिला मारून टाकले असे वाटून ते घाबरून पळून गेले असावेत. आज ही बँकेत आली नाही म्हणून मी घरी फोन केलातर ही फोनच उचलत नव्हती म्हणून काळजीने मी दुपारी घरी गेलो तर ही तिथे बेशुद्ध होऊन पडली होती. तिला आता मी दवाखान्यातूनच घेऊन येत आहे. तिला घरी एकटी जायला भीती वाटत आहे म्हणून घरी घेऊन आलो आहे". बाबांनी माझ्याकडे बघितले तर मी त्यांच्याजवळ जाऊन,"तुम्ही काही काळजी करू नका. तुम्ही एकट्या नाही आहात, आम्ही सगळे तुमच्याबरोबर आहोत" असे सांगितल्यावर त्यांच्या डोळयात पाणी आले. त्यांना आम्ही माझी खोली राहायला दिली व मी आजीबरोबर तिच्याबरोबर राहायला लागले.

त्याचदिवशी रात्री त्या जोरजोरात ओरडत बाहेर आल्या,"इथे भूत आहे. मला नाही राहायचे इथे. भुताने मला केसांनी धरून बाहेर ढकलत

ढकलत धमकी दिली आहे, आत्ताच्या आत्ता मी इथून गेले नाहीतर ते मला मारून टाकणार आहे, मला वाचवा" असे म्हणून जोरजोरात ओरडायला लागल्या. आम्ही सगळे त्यांचा अवतार बघून घाबरून गेलो. त्यांचा सगळा पदर खाली आला होता. केस पूर्ण विस्कटले होते. चेहरा घाबरल्यामुळे खूप विचित्र दिसत होता.

थोड्यावेळाने त्या शांत होऊन त्यांनी,"रात्री अचानक कोणीतरी मला हाक मारत आहे, असे वाटले म्हणून मी सगळीकडे बघितले तर तिथे कोणीच नव्हते. काहीतरी स्वप्न पडले असेल म्हणून मी परत झोपले तर 'सावू उठतेस का? का खाली फेकू तुला?' असा आवाज आल्यावर मी धाडकन उठले तर मला कोणाचातरी बोलायचा आवाज यायला लागला. मला तिथे कोणीच दिसत नव्हते पण आवाजमात्र येत होता. त्याने मला त्या खोलीत रहायला मनाई केली आहे. मितालीच्या खोलीत ती कोणालाच राहू देणार नाही म्हणे. तो बाईचाच आवाज होता.

दुसऱ्यादिवशी सकाळी विजयसरांनी पूर्ण घराची झडती घेतली पण कुठे काहीच सुगावा लागला नाही. पांढरेबाईंनी त्या खोलीतच राहायचा निर्णय घेतला. त्यांनी विजयसरांसमोर त्यांना आम्हाला मदत करायची आहे, त्यामुळे त्या माझ्याच खोलीत राहतील व काही कुठेही संशयास्पद आढळले तर लगेच कळवतील म्हणून सांगितले. पण त्या २-३

दिवसांच्यावर त्या खोलीत राहूच शकल्या नाहीत. त्यादिवसानंतर तर फक्त खोलीतच नाही तर बाहेरपण आवाज यायला लागले होते. एकतर मला घराबाहेर हाकलून द्या नाहीतर ती सगळ्यांना ह्या घरात राहणे अवघड करणार म्हणून सारखेच आवाज यायला लागले होते. घराबाहेर कधी कावळे मरून पडायला लागले होते, कधी लाल लिंब दिसायला लागली होती, कधी काळ्या बाहुल्या पडलेल्या असायच्या, तर कधीकधी रक्ताने माखलेली मोगऱ्याची फांदी पडलेली असायची. ह्याप्रकाराने तर हवालदारकाकापण घाबरून पळून गेले होते. आमच्याकडे कोणीच यायला तयार नव्हते. ते साफ करायलासुद्धा कोणी यायला तयार नसायचे. बाबा, काका किंवा श्री ह्यापैकी कोणीतरी ते उचलून दूर नेऊन टाकून यायचे.

अचानक एका रविवारी संध्याकाळी विजयसर चौघांना घेऊन घरी आले. त्यांना बेड्या ठोकल्या होत्या. आम्ही कोणीच ह्या चौघांना ओळखत नव्हतो. थोड्यावेळाने अनिता तिथे येऊन श्रीच्या गळ्यात पडून जोरजोरात रडायला लागली. श्री तिला समजावून सांगत होता पण तिचे रडणे वाढतच होते. विजयसर, बाकीचे हवालदार काहीच बोलत नव्हते की काही करतसुद्धा नव्हते. जसा काही सिनेमा चाललाय तसे बघत होते. रडतरडत अनिता,"श्री, मला वाचव. हे सगळे मला फसवत आहेत, त्यांच्या जाळ्यात अडकवत आहेत. मी खरेच काही केलेले नाहीये. तुझा माझ्यावर विश्वास आहे ना!" असे म्हणून तिने अजूनच जोरात रडायला सुरुवात केली. श्रीने

तिचे डोळे पुसत,"अनु" अशी हाक मारल्यावर काकू,"आता अनिताची अनु झाली का?" असे म्हंटल्यावर श्रीने,"आई प्लिज ऐकून तरी घे"आणि अनिताकडे बघून,"अगं काय झाले तेतरी सांग" असे म्हंटल्यावर अनिताने माझ्याकडे बघून,"मिताली तुलापण माहित आहे ना ग की माझे आईवडील मला किती छळायचे! खायलाप्यायलापण द्यायचे नाहीत, मी घरी आलेलेसुद्धा त्यांना चालायचे नाही. म्हणून तर मी कायम तुमच्याकडे असायची ना. नंतर ते मला न सांगता इथून निघून गेले. तुम्ही होता म्हणून मला आसरा दिला नाहीतर माझे काय झाले असते ग". मी,"हे बघ अनिता, माझा काही तुझ्यावर विश्वास नाहीये. तू काय केले आहेस ते सांग" असे म्हंटल्यावर काकू,"होच मुळी! कोण कुठली मुलगी आहे काय माहित? इतका चांगला मुलगा शोधून सापडणार नाही म्हणून माझ्या मुलाला जाळ्यात फसवले आहे". काकूला मध्येच तोडत श्री,"अरे तिचे ऐकून तर घ्या" असे म्हंटल्यावर काकू शांत बसली. अनिता,"हे माझे वडील व त्यांचे मित्र आहेत". हे ऐकून सगळ्यांना आश्चर्य वाटून आम्ही विजयसरांकडे बघितले तर त्यांनी,"तिलाच सांगू दे" म्हणून अनिताकडे बघितले. अनिता, "आपल्याबरोबर जे काही चालले आहे ते हे करत आहेत असे पोलिसांना वाटत आहे. म्हणून त्यांनी ह्या चौघांना पकडून आणले आहे. मलातर काहीच माहित नव्हते. इथे मला अमित घेऊन आला आणि ह्यांना बघून मलापण आत्ताच कळाले". असे म्हंटल्यावर अमित,"पण तूतर बॅग घेऊन कुठेतरी पळत निघाली होतीस. मला बघितल्यावर एवढी का घाबरलीस.

मी तुला श्रीला खूप लागले आहे म्हणून घरी चल म्हंटल्यावर तू नकार दिलास पण तिथे दोन पोलिसांना बघितल्यावर लगेच माझ्याबरोबर यायला तयार झालीस. इथे तुझे बाबा आहेत हे मी तुला सांगितलेच नव्हते मग घरी पाऊल ठेवल्याठेवल्या लगेच रडायला का सुरुवात केलीस? मी काहीच केले नाही म्हणून का सांगत आहेस? तुला असे का वाटत आहे की तुला कोणी फसवत आहे?" अमितचे ऐकून ती एकदम दचकली,"नाही रे तसे नाहीये, तू मला घ्यायला आलास तेव्हा तिथे पोलीस होते, इथे मी बाबांना व त्यांच्या मित्रांना बघितले तेव्हा मला संशय आला म्हणून मी असे बोलले". विजयसर,"हे बघ अनिता, तुम्हा सगळ्यांना आम्ही पुराव्यासकट पकडले आहे. तुझ्याविरुद्धसुद्धा आमच्याकडे भरपूर पुरावे आहेत. खरेतर तुम्हाला आम्ही पोलीसस्टेशनलाच नेणार होतो पण ह्यांच्याबरोबर माझे घरचे संबंध असल्याने आम्ही अगोदर ह्यांना इथे घेऊन आलो आहोत. आता कबूल करण्याशिवाय दुसरा काही पर्याय नाहीये. तेव्हा सगळे सांगून टाक" विजयसरांचे ऐकल्यावर अनिताने लगेच,"हो पण हे सगळे करायला श्रीने मला फशी पाडले आहे. त्यानेच मला बळजबरीने ह्यात ओढले. त्याने सांगितले की एकदा लग्न झाले की मितालीच्या सगळ्या संपत्तीवर आपलाच हक्क असेल. आपण ती जागा विकून करोडो कमवू शकू मग आपण राजाराणी आरामात बसून खाऊ. तुझ्या घरच्यांनापण आपण छान सांभाळू. म्हणून मी माझ्या आईवडिलांना तयार केले. ते अगोदर तयारच नव्हते पण मुलीच्या सुखापुढे त्यांनी हार मानली". श्रीचा चेहरा

बघण्यासारखा झाला होता. त्याने,"अनिता, अगं काय बोलत आहेस तू? मी कधी तुला हे सांगितले? मलातर मितालीच्या नावाने इतकी जागा आहे हेसुद्धा अगोदर माहित नव्हते. जेव्हा विजयसरांनी सांगितले तेव्हाच मला कळाले. मला काय करायची आहे तिची जागा? मी भरपूर कमावतो. मला एक सांग तुझ्या वडिलांनी दुसरे लग्न केले आहे ना, मग ते आपल्याला मदत करायला कसे काय तयार झाले? त्यावर अनिता,"अरे तूच मला सांगितलेस ना की घरी सगळ्यांना सावत्र आई आहे म्हणून सांग म्हणजे तुला घरी घुसणे बरे पडेल. मी अगोदर नकोच म्हणत होते पण तुझ्या प्रेमात मी इतकी आंधळी झाले होते की तू जेकाही सांगितले ते सगळे मला पटत गेले, त्यामुळे मी माझ्या बिचाऱ्या आईबाबांनापण ह्यात गुंतवले. पोलिसांना धागेदोरे सापडू नयेत म्हणून आपण त्यांना इथून हलवून कोकणात लपवून ठेवले. आता मला कळत आहे की त्यांना मी खूप त्रास दिला आहे. किती साधी माणसे आहेत ती माझ्यामुळे फसली, तुझ्यामुळे नाही फसली."

श्री," अगं अनिता, तू काय बोलतीयेस हे तुला तरी कळतंय का?" आम्ही सगळेजण हे सगळे ऐकून चक्रावून गेलो होतो, नक्की काय चालू आहे तेच कळत नव्हते.

काकाने विजयसरांना,"सर कृपा करून काय चालले आहे ते सांगाल का? डोके फिरायला लागले आहे." विजयसर,"अविसाहेब, आम्ही हा गुंता

बऱ्यापैकी सोडवला आहे पण श्रीबद्दल आम्हाला अजूनही संशय आहे, त्याच्याविरुद्ध अजून भक्कम पुरावा सापडला नाहीये.

काकू सगळ्यांकडे बघत रडत,"बघितले, मी तुम्हा सगळ्यांना सांगत होते की ही अनिता चांगली नाहीये. ती आपल्या श्रीला फसवत आहे पण तुम्ही कोणीच माझ्याकडे लक्ष दिले नाही. अनिता आम्ही तुझे काय वाकडे केले आहे? का आमच्यावर असा वचपा काढत आहेस? श्री तर किती साधा मुलगा आहे, नको ग त्याला फसवूस. तुला सख्खी आई नाही म्हणून मी तुला किती प्रेम दिले. माझे जाऊ दे पण आईंनी तर तुझ्यात आणि मितूमध्ये कधीच फरक केला नाही. मितूला तुझ्यावर संशय आला होता तरीही भाऊजी, ह्यांनी व आईंनी तुझ्यावर पूर्ण विश्वास दाखवला. कधीतरी तुझ्याशी वाईट वागले का? तुला इथून दुसरीकडे पाठवले तरीही सगळा खर्च आम्हीच करत होतो ना! आईंनी काही वेगळे खायला केले की श्रीकडून तुला पाठवायच्या ना (आजी व श्री ने चमकून काकूकडे बघितले). तुम्हाला काय वाटले मला माहित नव्हते हे. मला पाहिल्यादिवशीच आईंनी डबा भरून शिरा दिला होता ना त्यावेळीच समजले होते, तो..."

काका,"अरे विषय काय चालू आहे?"

काकूला आपण काय बोलत आहे जाणवल्यावर ती एकदम गप्प बसली.

आजी,"श्री, नक्की काय चालू आहे, तूतरी सांगणार आहेस का आम्हांला?"

श्री,"आजी, मलाच काही कळत नाहीये. मिताची शपथ घेऊन सांगतो, मला ह्यातले काहीच माहित नाही."

अमित रागाने,"अरे, तू मितालीची जागा मिळावी म्हणून हा सगळा कट रचला आहेस आणि तिचीच काय शपथ घेतोस?"

काका,"श्री आम्हाला खरे सांगशील का? तुझे आणि अनिताचे हे सगळे कधीपासून सुरु झाले?"

श्री खाली मान घालून,"मितामूळे माझी आणि अनिताची चांगली मैत्री होती. ती इथे रहायला यायच्या अगोदर मी तिला बहिणीसारखेच वागवायचो पण ती इथे आली त्यावेळी आमच्यात खूप चांगली मैत्री झाली. ती तासंतास माझ्या खोलीत येऊन गप्पा मारायची. तिचे लहानपणापासून कसे हाल झाले? तिच्या सावत्र आईमुळे तिने कसे हलाखीचे दिवस काढले? तिचे भाऊपण तिला कसे छळायचे? तिच्या बाबांचे ह्यासगळयांपुढे कसे काहीच चालत नाही हे सगळे सांगायची. मला खूप वाईट वाटायचे आणि मी सहानुभूतीने तिच्याशी खूप चांगला वागायचो. तिला इथे काही कमी पडू नये म्हणून आपण सगळेच तिचे लाड करायचो. हळूहळू माझ्या हे लक्षात यायला लागले की तिला मी आवडायला लागलोय. सुरुवातीला मी त्याकडे साफ दुर्लक्ष करायचो. पण हळूहळू मलापण ती आवडायला लागली. तिनेच मला स्वतःहून तिचे माझ्यावर प्रेम आहे म्हणून सांगितले.

त्यावेळी मीपण मला तू आवडतेस म्हणून सांगितले. त्यावेळीच मी तुम्हाला सगळ्यांना सांगणार होतो पण घरी असे विचित्र प्रकार घडू लागले त्यामुळे सांगायचे होतच नव्हते. नंतर अनितानेच मला सांगितले की आत्ता आपण कोणालाच काही सांगायला नको. जर कोणाला हे मान्य नसेल आणि त्यांनी मला घराबाहेर जायला सांगितले तर मी कुठे जाणार? त्यापेक्षा मला ह्या सगळ्यांच्या मनात जागा करू दे मग आपण सगळ्यांना सांगू. मलापण हे पटले. आईला जेव्हा आमच्यावर संशय आला तेव्हा ती खूप चिडली. आईला हे पसंद नाही हे कळल्यावर तर आम्ही आणखीनच खबरदारी घ्यायची ठरवली. आम्ही दोघांनी इथे जास्त बोलायचे नाही, एकांतात भेटायचे नाही असे ठरवले. जेणेकरून आईला असे उगाचच वाटत आहे असे सगळ्यांना वाटायला हवे, असे आम्ही दोघांनी वागायचे ठरवले. आणि खरेच कोणालाच कसलाही संशय आला नाही. उलट सगळ्यांनी मला आईकडे दुर्लक्ष कर म्हणून सांगितले. एवढेच काय तर बाबांनी आईच्यावतीने अनिताची माफी मागितली (काकूंचा चेहरा रागाने लाल झाला होता पण ती काहीच बोलली नाही). बाबा-काका मी खरेच सांगतोय, मला हे जे काही अनिता सांगतीये ते काहीच माहित नाही. माझ्या मिताला मी कसे फसवेन?"

अनिता,"श्री जेकाही सांगत आहे ते सगळे खोटे आहे. त्याचे आणि माझे तो कॉलेजला असतानाच जमले होते. तुम्ही कॉलेजमध्ये जाऊन बघू

शकता आम्ही दोघेही एकाच वर्गात होतो. पण आम्ही कॉलेजमध्ये कोणालाच काही कळू दिले नाही. आम्ही दोघे गुपचूप भेटायचो. मीतर श्रीच्या सारखी मागे लागायचे की आपण तुझ्या घरी आपल्याबद्दल सांगूयात पण तोच मला नोकरी लागू दे, नोकरी लागल्यावर मला जरा स्थिरस्थावर होऊ दे, असे म्हणून टाळत होता. कॉलेजमध्ये असतानाच मी माझ्या घरी आमच्या दोघांबद्दल सांगितले होते. मला सावत्र नाहीतर सख्खी आई आहे आणि त्यांना श्री खूप आवडला होता. तो नेहमी माझ्या घरी येऊन आमच्या सगळ्यांशी खूप छान वागायचा, आमची परिस्थिती खूप चांगली नाहीये त्यामुळे आम्हाला नेहमी काहीतरी छान खायला घेऊन यायचा, सणाला प्रत्येकासाठी काहीना काही वस्तू किंवा कपडे असे काहीतरी घेऊन यायचा. त्यानेच आम्हाला त्याच्या गोड बोलण्यामध्ये फसवले आणि हे सगळे करायला भाग पडले. माझ्या आईबाबांनापण हे पटत नव्हते पण ह्याने आम्हा सगळ्यांना संमोहित केले आणि हे सगळे करायला भाग पाडले". अनिता बोलत असताना मध्येमध्ये श्री तिला तोडायचा प्रयत्न करत आपण कॉलेजमध्ये कधी भेटलो, मी तुला कॉलेजमध्ये कधीच बघितले नाही, मी तुझ्या घरी कधी आलो, अगं तू का खोटे बोलत आहेस.... असे बरेच काही बोलत होता पण अनिता त्याच्याकडे लक्ष न देता बोलत होती. आम्ही सगळे हे ऐकून सुन्न झालो होतो.

इतका वेळ शांत बसलेले बाबा,"आमचा श्रीवर पूर्ण विश्वास आहे. तो असे कधीच वागू शकत नाही. सर तुम्ही ह्या सगळ्यांना घेऊन जाऊन उरलेली चौकशी पूर्ण करा." त्यावर अनिताचे बाबा,"ओहोहो, म्हणे आमचा काही संबंध नाही, काय हो! तुम्हीपण ह्यात सामील आहात हे कबूल करा. बऱ्याबोलाने कबूल करा नाहीतर तुमचे सगळेच पितळ उघडे करू आम्ही" हे काय नवीन! हातर सगळ्यात मोठा बाउन्सर होता आमच्यावर! मी आत्ता कुठे हळूहळू मानसिक ताणातून बाहेर येत होते, त्यात हा नवीन झटका मला सहन न होऊन मी जागेवरच कोसळले.

डोळे उघडले तर मी आजीच्या खोलीत झोपले होते. मला पूर्ण ६-७ तासाने जाग आली होती. आजीला पुढे काय झाले विचारल्यावर तिने,"मितुडी, कुठलाही विचार करून ताण घेऊ नकोस. पोलिसांनी सगळ्यांना पकडले आहे त्यामुळे आता तुला कुठलाही धोका नाहीये. तेव्हा तू आराम कर." मी,"आजी, मला आता खरेच बरे वाटत आहे, कृपा करून मला सगळे सांग. हे सगळे पचायला खूप जड जात आहे ग. नाही सहन होत आहे सगळे. इतके सगळे होऊन तू इतकी कशी शांत आहेस? तुला काहीच त्रास होत नाहीये का? सांग ना आजी. कृपा करून सांग ना!" खूप सारी आर्जवे केल्यावर आजीने,"काल तूला हे चाललेले सगळे सहन न झाल्याने तिथेच कोसळलीस. २ मिनिटातच परत उठून वेड्यासारखेच वागायला सुरुवात केलीस. नुसतीच बरळत होतीस, इकडून तिकडे उगाचच पळत

होतीस, नवीन उगवलेल्या मोगऱ्याचे रोप उखडवून घेऊन त्याला मिठी मारून 'आईआई' म्हणून रडत होतीस. आई मला तुझ्याबरोबरच राहायचे आहे, मला सोडून कुठेही जाऊ नकोस, असे बरेच काही बोलत होतीस. बडबड करतच तू झोपी गेलीस आणि आत्ता उठत आहेस." मी असे काही वागले असेल हे मला पटतच नव्हते पण आजी माझ्याशी कधीच खोटे बोलणार नाही हे नक्की माहित होते. मी,"आजी काल काय झाले सांग ना!"

"तुला त्रास व्हायला लागला तेव्हा आम्ही सगळे घाबरून तुझ्याकडे आलो. ती संधी पकडून ते चारही जण आणि अनिता पळून जायला लागले पण तिथे असलेल्या पोलिसांनी त्यांना पकडले व पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले. त्यांची आता चौकशी सुरु आहे. बघुयात काय होते ते." मी,"म्हणजे आपल्याला अजून काहीच समजले नाही का? अनिता श्रीबद्दल अशी का बोलत होती आणि बाबांचा काय संबंध ह्या सगळ्याशी?" मी असे विचारल्यावर आजीने मोठा सुस्कारा सोडला,"हे बघ मितुडी, काय चालू आहे काहीच कळत नाहीये. पुढे काय होणार आहे हे बघत बसण्याशिवाय आपल्या हातात काही नाहीये. पोलिसांनी धनूला आणि श्रीला गावाबाहेर जाण्याची मनाई केली आहे. मनू, आम्ही आता ह्या विषयावर काहीही बोलायचे नाही असे ठरवले आहे. धनु आणि श्री इथेच रहात आहेत. खरेतर ते दोघे तुला त्रास नको म्हणून दुसरीकडे रहायला जाणार होते पण मीच त्यांना थांबवून ठेवले आहे. तुझे मामा येऊन गेले. ते तुला घेऊन जायचे

म्हणून मागे लागले होते. तुला जाग आली की तुला कुठे रहायचे आहे हे तूच ठरवशील असे मी त्यांना सांगितले आहे" असे म्हणून तिने माझा फोन माझ्या हातात देऊन बाहेर निघून गेली. तिने इतकावेळ दाबून ठेवलेला हुंदका मला ऐकू आला. इतके सगळे झाल्यावर अमितवर तरी आपण विश्वास ठेवू शकतो की नाही हेच कळत नव्हते. तरीही हिंमत करून अमितला फोन केला. अर्ध्या रिंगमध्येच अमितने फोन उचलला,"मीते, कशी आहेस ग? बरे वाटत आहे का तुला? थांब मीच तिकडे येतो" असे म्हणून त्याने फोन ठेवून दिला. मी खोलीबाहेर आले तर तिथे बाबा व श्री बसले होते. मला बघून त्या दोघांना कानकोंड्यासारखे झाले. दोघेही उठून जात असतानाच मी त्यांना 'बसा' म्हणून सांगून बाहेर आले. तिथे कट्ट्यावर बसणार तोपर्यंत अमित आला. मला बघून गाडी तशीच टाकून माझ्याजवळ पळत येऊन मला मिठी मारली. आजपर्यंत कधीच न जाणवलेली ऊब आणि विश्वास त्याच्या मिठीत जाणवत होती. आम्ही दोघे खुपवेळ एकमेकांच्या मिठीतच होतो. विजयसर त्यांच्याबरोबर ४ पोलिस घेऊन आले होते. पांढरेबाईंचा शोध लागला असून त्या गावातच एका झोपडीत लपल्या होत्या. त्यांना पकडून जेलमध्ये टाकले आहे. त्यांच्या बोलण्यातून त्यांचा ह्यात काही संबंध आहे वाटत नाहीये पण त्यांच्याविरुद्ध पुरावामात्र आहे. गाऊन घालून जी व्यक्ती मितालीला त्रास देत होती...’’सर बोलताना,"त्या पांढरेबाई होत्या का? मी त्यांचा गाऊन ओळखला होता पण त्या असतील असे वाटत नव्हते." सर थोडे वैतागून,"मिताली तू गाऊन

जर ओळखला होतास तर आम्हाला तेव्हाच का नाही सांगितलेस. आमचा तपास सोप्पा नसता का झाला?"

मी,"सर, पांढरेबाईंचा गाऊन आहे हे सांगितले असते तर बाबांना वाईट वाटले असते म्हणून मी तुम्हाला काही बोलले नाही". असे म्हंटल्यावर सरांनी माझ्याकडे दुर्लक्ष करून,"श्री आणि धनु तुम्हाला पोलीस स्टेशनमध्ये यावे लागणार आहे. पांढरेबाईंच्या घरी आम्हाला जे कुदळ, फावडे सापडले आहे त्यावर इथली माती लागली आहे आणि त्यावर तुमच्या दोघांच्या हाताचे ठसे आहेत.

पोलीस त्या दोघांना घेऊन गेले. काकाला लगेच फोन केल्यावर तो सरळ पोलीसस्टेशनमध्येच गेला. आम्हीपण सगळे तिकडेच गेलो. पोलिसांनी त्यादोघांना जेलमध्ये न ठेवता एका खोलीत ठेवले होते. आम्ही गेल्यावर त्यांनी आम्हा सगळयांना त्यांना ठेवलेल्या खोलीत नेऊन त्यांच्याशी बोलायची परवानगी दिली. श्री व बाबा एकदम खचून जाऊन खाली मान घालून बसले होते.

काका,"श्री, धनु काय चालले आहे हे सगळे? आम्हाला कोणालाच हे सगळे खरे वाटत नाहीये. पण तरीही तुमच्या तोंडून आम्हाला सगळे खरेखरे ऐकायचे आहे." बाबा व श्री काहीच बोलत नव्हते तेव्हा काकाने चिडून त्यांना,"तुम्ही जर बोलला नाहीत तर नक्की खरे काय आणि खोटे

काय हे कसे कळणार आहे आम्हाला? बोलणार आहात का?" काकाचा अवतार बघून आम्ही सगळेच घाबरलो होतो.

श्री,"बाबा, मला काहीच माहित नाही. अनिता सगळा आरोप माझ्यावर का घालत आहे हे पण कळत नाहीये. मला अजूनही असेच वाटत आहे की काकाला आणि मला जसे अडकवले आहे तसेच अनितालासुद्धा अडकवले आहे. ती खूप निरागस आहे."

काकू एकदम चिडून,"सुरु झाले ह्याचे अनितापुराण! मी तुला तेव्हाच सांगितले होते, ही मुलगी चांगली वाटत नाहीये मला. नको तिच्या नादी लागूस पण ऐकेल तर...."

काकूला मध्येच तोडत,"आई तुला अनिता सून म्हणून नको होती ते तिच्या स्वभावावरून नाही तर तिचे घर असे आहे म्हणून. घराणं चांगले नसलेल्या मुलीशी माझे लग्न झालेले तुला नको होते".

काका मध्ये पडून,"काय चालले आहे तुमच्या दोघांचे? इथे प्रसंग काय ओढवला आहे आणि तुम्हाला लग्नाचे पडले आहे. हे बघ श्री, आंधळे प्रेम करणे थांबवून जरा थोडे डोके चालव. हे सगळे अनिता व तिच्या आईवडिलांनी रचलेले कारस्थान आहे. कळत नाहीये का तुला?"

श्री काहीही न बोलता खाली मान घालून बसला. काका,"बोला धनुसाहेब, तुम्हाला त्या पांढरे बाईंबद्दल काय म्हणायचे आहे?"

त्यावर बाबा,"अवि, माझं डोकंच चालत नाहीये. तुम्हाला जे पाहिजे ते तुम्ही करा. माझ्यावर थोडाजरी संशय येत असेल तर एवढाच विचार करा की मी माझ्या मुलीबरोबर असे वागू शकतो का?"

तोपर्यंत अमितने आत येऊन,"मोनेगुरुजींनी एक चांगले वकील बघितले आहेत. ते बाहेर आले आहेत. घेऊन येऊ का त्यांना?" काकाने मान हलवून होकार दिला व आम्हासगळ्यांना घरी जायला सांगितले. मी, आजी व काकू अमितबरोबर घरी आलो. घरी येताना मला सगळे जुने प्रसंग आठवायला लागले. मी, अनिता व श्री गाडीतून चक्कर मारताना ते मला मुद्दामून पांढरे बाईंच्या घरासमोरून घेऊन गेले असतील त्यामुळेच तर मला बाबांची गाडी तिथे दिसली आणि ते मला तिथे घेऊन गेले. माझ्याबरोबर जे काही झाले त्यावेळी अनिता किंवा श्री माझ्याबरोबर कधीच नसायचे. मला एकदम आठवले की क्लासच्या इथे पांढरेबाईंचा गाऊन घालून एक व्यक्ती माझ्याकडे आली त्याअगोदरच मी समोरून एक गाडी जाताना बघितली होती त्यात पांढरेबाई आणि बाबा होते. अजून असे बरेच प्रसंग माझ्याडोळ्यासमोरून तरळून जात होते. खरेच श्री व बाबांचापण ह्यात हात असेल का? एवढी करोडोंची जागा हडपून दोघे आपापल्या जोडीदाराबरोबर सुखाने राहू शकत होते. पण मग मला मारूनच का टाकले नाही? असा त्रास का दिला? काही कळत नव्हते. कोणाला काही सांगायच्या अगोदर बाबा

व श्रीशी बोलून मग सगळ्यांना सांगायचे की नाही हे ठरवू असे मनात ठरवून मी शांत बसले.

थोड्यावेळात मामामामी आले. आजीने त्यांना बसायला सांगितले पण तिकडे दुर्लक्ष करून मामीने,"मिताली तुला लागतील तेवढे चार कपडे घे व आमच्याबरोबर चल. इथे राहायची काही गरज नाहीये" असे म्हंटल्यावर मामा,"काहीही गरज नाही इथून काही घ्यायची. आपण जाताजाता तुला काय पाहिजे ते विकत घेऊ. जशी आहेस तशीच आमच्याबरोबर चल." असे म्हणून माझा हात धरून मामा जायला निघाला. मी मामाचा हात झटकून,"मामा, मी इथून कुठेच जाणार नाहीये."असे म्हंटल्यावर मामाने मला एक जोरात ठेवून दिली,"मिताली मला काहीही ऐकून घ्यायचे नाहीये. तुझा जीव जाईपर्यंत आम्ही शांत बसायचे असे वाटत आहे का तुला? काय माहित मैथिलीलापण ह्या लोकांनी मारले असेल. आजीने एवढी सगळी २० एकर जागा मैथिलीच्या नावावर केली होती. मैथिलीजर काही कारणाने नसेल तर ती जागा तिच्या मुलांना मिळेल. मुलंपण वारली तरमात्र ही जागा महाराजांच्या संस्थेला दान करावी असे आजीने लिहून ठेवले होते. तूजर वारलीस तर ही जागा ह्यांना मिळाली नसती म्हणून तुला वेडं करून तुझ्याकडून सही घेऊन ही जागा विकायची असे नियोजन असणार ह्या सगळ्यांचे. ह्यात फक्त श्री आणि धनुचे नाव आले आहे पण मला खात्री आहे हे ह्या सगळ्यांचेच प्लांनिंग असणार आहे.

काही गरज नाही इथे राहायची." माझ्या नावावर इतकी जागा आहे हे मला आजच कळत होते. हे सगळे ऐकून मामा जेकाही सांगत आहे हे खरे असेल असे मला असे वाटून गेले पण लगेच स्वतःला सावरून मी आजीच्या मागे जाऊन मामाला त्याच्याबरोबर जायला नकार दिला. आजीने त्यांना नमस्कार करून,"मितालीने कुठे रहायचे हे तीच ठरवेल, हे मी तुम्हाला कालच सांगितले होते. पण तुम्ही इथे येऊन राहिलात तरी चालेल."

काकाची वाट बघत बसण्याशिवाय दुसरा काही पर्यायच नव्हता. काका जेव्हा घरी आला तेव्हा तो खूप दमलेला वाटत होता. त्याला काय झाले हे विचारायची हिंमत झाली नाही. सगळेजण २ घास खाऊन झोपी गेलो. आमच्याघरी भुताटकी चालू आहे आणि भूतानेच आम्हाला सगळ्यांना अडकवले आहे, असेच गावात काहीजणांना वाटत होते. सगळेजण आम्हाला घाबरायला लागले होते. तर काहीजण आम्हाला चोर समजत होते. आमचे सगळ्यांचे घराबाहेर पडणे बंद झाले होते. अगदी काकासुद्धा ऑफिसला जात नव्हता. आमचा सगळा भरवसा, आधार आणि विश्वास अमितच होता. मोनेकाकासुद्धा आमच्याबरोबर होते. ते एका प्रतिष्ठित वकिलांच्या घरी भिक्षुकी करायला जायचे, त्यांना शब्द टाकून मोनेकाकांनी आमची केस त्यांना घ्यायला लावली होती.

दुसऱ्यादिवशी अमित घरी आल्यावर त्याने आम्हाला वकिलांबरोबर झालेले बोलणे सांगितले. आमच्या घरी जे कॅमेरे बसवले होते, मोगऱ्याच्या झाडाच्या इथे जे माईक सापडले, घरावर स्पीकर सापडला ते सगळे बाहेरच्या माणसाने करणे अवघड होते त्यामुळे हे कोणीतरी घरच्याच व्यक्तीने केले असणार त्यामुळे पोलिसांना बाबा व श्रीवर जास्त संशय येत होता.

हा सगळा कट पूर्णत्वाला नेण्यासाठी इतकी वर्षे नियोजन चालू असल्याने त्यात काहीच त्रुटी नव्हत्या. पोलिसांना कुठलेच धागेदोरे सापडत नव्हते. चौकशी करताना एक दिवस अचानक पोलिसांना अनिताच्या खऱ्या आईचा, रूपाचा फोटो पोलिसस्टेशन मध्ये सापडला. अनिता हुबेहूब आईसारखी दिसत होती, तिथेच त्यांना अनितावर संशय आला पण तिचा जन्मदाखला तपासल्यावर त्यावर तिचा जन्म कोल्हापूरचा होता. पण आईवडिलांचे नाव महिपती व रूपा हेच होते शिवाय तिची आई जिवंत आहे हे दिसत होते. नाव, आडनाव सगळे सारखे दिसत असले तरीही जन्म दुसऱ्या गावचा असून आई जिवंत असल्याने पोलीस संभ्रमात पडले. त्यांनी अनितावर पाळत ठेवायला सुरुवात केली पण तिचे वागणे एकदम व्यवस्थित होते. ती श्री सोडून कोणालाही भेटत नव्हती. कुठेच काहीच आक्षेपार्ह दिसत नव्हते.

विजयसर परत काही धागेदोरे सापडतात का हे बघायला परत गावी गेले त्यावेळी त्यांना आमच्या घरासमोर झोपडीत राहणारा माणूस दिसला. खरेतर त्यांनी त्याला ओळखले नव्हते पण विजय सरांना बघितल्यावर तो पळून जायला लागला तेव्हा त्यांनी त्याला पकडला. तिथून एकेक धागे सुटायला सुरुवात झाली. राजाराम पळून गेल्यावर रात्री मोगऱ्याची भूमिका पार पडायला म्हणून ह्याला थोडे दिवस तिथे ठेवले होते पण हा आपल्याच गावाचा आहे तेव्हा तो कधीही पकडला जाऊ शकतो हे लक्षात आल्यावर त्याला लगेच तिकडून जायला सांगितले. ह्याला त्यांच्या नियोजनाबद्दल फारसे काही माहिती नसल्याने काहीच हाती लागले नाही. पोलिसांनी त्याला महिपतीला फोन करून भेटायला बोलाव म्हणून सांगितले. तेव्हा महिपतीनेच ह्याला त्याच्याकडे भेटायला बोलावले व त्याला एक कामगिरी पार पाडायची असेसुद्धा सांगितले. त्यावेळी ह्या चौघांना एकत्र पकडण्यात पोलिसांना यश आले. सगळी तंत्र वापरूनसुद्धा महिपती काहीच बोलायला तयार नव्हता, तो सगळा आरोप श्रीवर टाकत होता. त्याने तर तो आजीकडे काम करणारा महिपती हे कबुलसुद्धा केले नाही. त्याने त्याचा पूर्ण चेहरामोहराच बदलल्याने त्याला कोणीच ओळखले नाही. पण त्याने सगळा आरोप श्री व बाबांवर टाकून श्रीनेच आम्हाला जसे करायला सांगितले तसे मी केले असेच सांगत होता. बाकीच्यांना फक्त त्यांना सांगितलेले कामच माहित होते. त्यामुळे ही केस सोडवणे पोलिसांना खूप अवघड जात होते. शोध घेताघेता त्यांना पांढरेबाईंबद्दल समजले तर त्यात

श्री व बाबाच जास्त गुंतले. पांढरे बाईंनीसुद्धा त्यांना बाबांनीच हे सगळे करायला भाग पडले असे सांगितले. श्री व बाबांच्याविरुद्धच सगळे पुरावे सापडत होते त्यामुळे पोलिसांनासुद्धा हे दोघेच मुख्य आरोपी आहेत असे वाटत होते.

वकीलसाहेब व विजयसर दोघांनाही श्री व बाबा निर्दोष आहेत असे वाटत होते. त्यांनी त्यांचे काम सुरु केले. त्यांनी आजीचे मृत्युपत्र वाचले, तिथे त्यांना जेव्हा अनिताच्या नावाने वाडा आहे, हे समजले तेव्हा ते अनिताशी बोलायला गेले. अनिता म्हणजे आमच्याकडे काम करणाऱ्या महिपती आणि रूपाची मुलगी आहे हे ती मान्यच करायला तयार नव्हती. विजयसरांबद्दल अनिताला एक प्रकारचा राग असल्याने ती त्यांच्याशी बोलतच नव्हती. त्यावेळी त्यांनी एक डाव आखून वकीलसाहेबांना तिच्याशी बोलायला पाठवले. वकीलसाहेबांनी गोड बोलून तिला आजीचे मृत्युपत्र, तिच्या बाबांविरुद्ध पोलिसांत दाखल केलेल्या सगळ्या आरोपाच्या प्रती, त्यांचे गावात दारू पिऊन मारहाण करतानाचे फोटो दाखवले व शेवटी त्यांनी आजीचे तिच्या खऱ्या आईबरोबरचे असलेले एक-दोन फोटो दाखवले. तिने आजपर्यंत तिच्या खऱ्या आईचा फोटोच बघितला नसल्याने तिथे ती एकदम विरघळली. अनिता अगदी आईसारखीच दिसत असल्याने तिला फोटो बघून खूपच दाटून आले. आईचा फोटो हातात घेऊन बिचारी खुपवेळ रडत होती. लहानपणापासून

तिला जे काही सांगितले गेले, तिच्या मनावर जे काही बिंबवले होते, ते सगळे तिने त्यांना सांगितले.

आईच्या आजीआजोबांची परिस्थिती खूप चांगली नव्हती. पणजोबा खूप शिकलेले असल्याने ते सरकारी नोकरीत खूप चांगल्या पोस्टवर होते. अतिशय प्रामाणिकपणे भरपूर कष्ट करून, पै पै साठवून पैसे साठवून त्यांनी स्वतःची परिस्थिती सुधारली. त्यांना शेतीची, बागायतीची खूप आवड असल्याने त्यांनी शेती विकत घेतली. अनिताचे आजोबा हे पणजोबा जिथे नोकरी करायचे, तिथे शिपाई म्हणून काम करायचे. ते पणजोबांच्या अगोदर निवृत्त झाल्यावर त्यांची परिस्थिती चांगली नसल्याने आजोबांनी त्यांना शेतीवर लक्ष ठेवायला म्हणून गावी असलेल्या वाड्यातल्या एका भागात राहायला जागा दिली व शेतीचे सगळे व्यवहार सांभाळायला दिले. पण पणजोबा निवृत्त झाल्याझाल्या वारल्याने सगळी जबाबदारी पणजीआजीवर आली. अनिताचे आजोबा खूपच प्रामाणिक असल्याने पणजीआजीने त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून सगळे व्यवहार त्यांच्या हाती सोपवले. अनिताचे आजोबा वारले तेव्हा पणजीआजीने पूर्ण कुटुंबाला सांभाळले. अनिताचे तीन काका शिकल्याने त्यांना खूप चांगली नोकरी लागली, एकानेतर पणजीआजीच्या मदतीने व्यवसायात चांगला जम बसवला. अनिताचे बाबा - महिपती मात्र अभ्यासात चांगला नसल्याने फार शिकू शकला नाही त्यामुळे पणजीआजीने त्यांना शेतीत टाकले.

महिपती आता सगळे व्यवहार सांभाळायला लागला. शेतीची लागवण करणे, त्याची काळजी घेणे, शेतीसाठी लागणारे सगळे सामान विकत आणणे, सगळ्या शेतमजुरांना हाताळणे, माल विकणे, सगळीच कामे करायचा. त्याचे चोख काम बघून पणजीआजीने सगळा कारभार त्याच्या हातात सोपवला. पण नंतर हळूहळू त्याने केलेल्या चोऱ्या, मधल्यामध्ये खाल्लेले पैसे, मजुरांना पूर्ण पैसे न देता त्यातला हिस्सा स्वतःसाठी ठेवून घेणे, अगोदर विकलेल्या मालातला थोडाथोडा हिस्सा काढायला सुरुवात करून त्याने मोठा हात मारायला सुरुवात केली. पणजीआजीने काही विचारले तर दरवेळी वेगवेगळी कारणे सांगायचा. पणजीआजीच्या हे कधीच लक्षात आले होते पण घरचाच आहे घेतले थोडे पैसे तर काय बिघडते म्हणून ती दुर्लक्ष करत होती. हातात पैसे खेळू लागल्याने त्याला वेगवेगळी व्यसने लागली. दिवसदिवस बाहेर राहायचे पण घरी आले की बायकोला मारणे सुरु केले. एकदातरी पणजीआजीमध्ये पडली तेव्हा त्याने तिलापण मारले. त्यावेळी पणजीआजीने त्याला घरातून बाहेर हाकलून दिले होते व तिथल्या नोकरांना तिने त्याला आत घ्यायचे नाही म्हणून सांगितले होते. अनिताच्या आई- रूपाला मात्र तिने स्वतःकडे ठेवून घेतले होते. नेमके त्याचवेळी रूपाला अनितापासून दिवस गेले हे समजले. त्यानंतर २-३ दिवसांनी महिपती रूपाबरोबर घरी आला. त्यावेळी तिच्या आईने नवऱ्याशिवाय मी इथे राहणार नाही असे सांगितले. महिपतीनेसुद्धा माफी मागून परत असे वागणार नाही ह्याची हमी दिली. आपलेच पोर आहे म्हणून

पणजीआजीने त्याला माफ करून परत घरी राहू दिले. त्यानंतर बरेच महिने तो घरी चांगले वागत होता.

जेव्हा पणजीआजीने स्वतःचे इच्छापत्र तयार केल्याची माहिती महिपतीला लागली त्यावेळी त्याला असे वाटत होते की त्याच्या नावाने सगळी शेती असेल. पणजीआजीने महिपती सोडून बाकी सगळ्या काकांना काहीनाकाही दिले होते. तिने प्रत्येकालाच काहीनाकाही दिले होते. रूपा जिवंत असेपर्यंत तिच्या नावाने ठराविक रक्कम तिला दर महिन्याला मिळेल अशी सोय करून ठेवली होती. तिथे असलेला अजून एक वाडा होणाऱ्या बाळाच्या म्हणजे अनिताच्या नावावर केला होता. पण तो वाडा ना अनिता कोणाला विकू शकणार होती किंवा कोणाच्या नावावरसुद्धा करू शकणार नव्हती. एकतर वाडा अनिताच्याच नावाने राहणार होता आणि तिला काही झालेच तर तो वाडा समर्थांच्या ट्रस्टला दान करावा असे पणजीआजीने लिहिल्यामुळे तो वाडासुद्धा अनिताच्या आईबाबांना त्यांच्या नावावर करता येत नव्हता. पणजीआजीचा आईवर खूप जीव असल्याने सगळी शेती तिने आईच्या नावावर केली होती. हे सगळे जेव्हा त्याला समजले तेव्हा तो सुडाने पेटून उठला. ही शेती त्याच्या बाबांनी व त्यानेच सांभाळली असल्याने त्यावर पूर्ण हक्क आपलाच आहे असे वाटून त्याने सूड घ्यायचा ठरवला. पण आपल्याला मृत्युपत्राबद्दल काही माहित आहे हे अजिबात जाणवू न देता घरी एकदम छान वागू लागला होता.

त्याने परत एकदा पणजीआजीचा विश्वास संपादन करून नकळत तिच्या सह्या घेऊन सर्व मालमत्ता स्वतःच्या नावावर केली. एकदा पणजीआजी काही कारणाने दुसऱ्या गावी गेली. रात्री परत येतायेता पणजीआजीची गाडी अचानक पंक्चर होऊन दरीत कोसळणार होती पण देवाचे उपकार त्यामुळे ती अगदी दरीत जाताजाता ड्रायव्हरने एकदम थांबवली. हा अपघात नसून कोणीतरी तिला मारायचा कट केला होता आणि पोलिसांचा महिपतीवर संशय आहे पण भक्कम पुरावा न मिळाल्याने ते अजून त्याला पकडू शकत नाहीयेत हे जेव्हा तिला समजले त्यावेळी तिनेपण पूर्ण चौकशी करायची ठरवली.

तिने वकिलांना बोलावून परत सगळी चौकशी करायला लावली तेव्हा तिचे स्वतःचे मृत्युपत्र बदलले गेले असून ती गेल्यावर सगळी संपत्ती महिपतीला मिळणार, असे त्यात लिहिले होते. तिने परत पहिले मृत्युपत्र नोंदणीकृत करून घेतले. हे सगळे महिपतीला जेव्हा समजले त्यावेळी ती वाड्यात परत यायच्या आत हा पिऊन तर्रर होऊन घरी गेला आणि रुपाला खूप मारले. दिवस भरत आले असल्याने तिला प्रसवकळा सुरु झाल्या. वाड्यातल्या बायकांच्या मदतीने अनिताचा जन्म वाड्यातच झाला पण दवाखान्यात न्यायच्या अगोदरच आईचा मृत्यू झाला. महिपतीविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केल्यावर उद्या काही झाले तर अनिताच्या

साहाय्याने आपण सुटू असे वाटल्याने तो अनिताला घेऊन तिकडून पळून गेला. त्यानंतर बरेच शोधूनही त्यांचा काहीच पत्ता लागला नाही.

महिपती गावाहून पळून मुंबईत एका मित्राच्या घरी रहायला लागला. त्याच्या घराशेजारीच हिची आत्ताची आई रहात होती. महिपती पोटापाण्याची सोय करायला अनिताला घरी बंद करून जायचा. शिवाय अनिता दिवसरात्र जोरजोरात रडायची तेव्हा हिला त्याचा खूप त्रास व्हायचा. ती वेश्याव्यवसाय करत असल्याने रात्री कोणी तिच्याकडे आले की हिच्या रडण्याने त्यांना त्रास व्हायचा. शिवाय दिवसभर तिला झोपायला लागायचे पण अनिताच्या रडण्यामुळे तिला झोप लागत नसल्याने त्याच्याबरोबर रोज भांडण व्हायची. महिपती बाहेरख्याला असल्याने त्याचे आणि हिचे जमायला लागले. त्याने मनाने कहाणी तयार करून तिला सांगितली. महिपतीला मृत्युपत्राबद्दल माहित असल्याने पणजीआजीने सगळी संपत्ती खूप जणांमध्ये वाटली होती त्यामुळे सगळी संपत्ती स्वतःच्या नावावर करणे अवघड जाणार होते. पण पूर्ण शेतजमीन आईच्या नावाने असल्याने ती स्वतःच्या नावाने करणे त्याला जास्त सोपे वाटले. त्याने स्वतःच्या नावावर सगळी जमीन परत कशी मिळवता येईल ह्याचे सगळे नियोजन तिला सांगून आपण खूप श्रीमंत होणार हे सांगितले. त्याचे सगळे आयोजन ऐकून तीपण ह्यात सामील झाली. हे तिघे एकत्र राहायला लागले. आईचे लग्न झाल्यावर ते आमच्याच गावात राहायला आले.

अनिताच्या आईचेच नाव त्यांनी ह्या दुसऱ्या बाईला दिले. अनिता लहान असल्यापासूनच ह्या सावत्रआईने अनिताच्या मनात पणजीआजीबद्दल विष कालवायला सुरुवात केली. पणजीआजी कशी आईला राबराब राबवायची, एखाद्या जनावरासारखे वागवायची, काही काम चुकले की मारायची आणि बाबा मारतात म्हणून सगळ्यांना खोटे सांगायची. पणजीआजीबरोबर कोणी रहात नसल्याने तिने मुद्दामून महिपती इतका हुशार असूनसुद्धा त्याला शिकू न देता शेतीत गुंतवले. शेतीची सगळी कामे महिपतीच बघत असला तरीही त्याला पैसेमात्र द्यायची नाही. अनिताच्या आईबाबांना तिने स्वतःवरच असे अवलंबून ठेवले होते की शक्यतो त्यांनी बाहेर कुठे जाऊ नये. दिवस भरत असतानाच पणजीआजीने रूपाला खूप मारल्यामुळे तिला त्रास सुरु झाल्यावर घाबरून घराबाहेर बाहेर पळून गेली. महिपतीने घरी आल्यावर रूपाची अवस्था बघून वाड्यात अजून २-३ कुटुंब राहत असलेल्यांच्या बायकांना मदतीला बोलावले व घरीच अनिताचा जन्म झाला. रूपाला दवाखान्यात न्यायच्या अगोदरच ती वारली. रात्री पणजीआजी घरी आल्यावर तिने घाबरून महिपतीच्या विरुद्धच पोलिसात तक्रार केली. खूप श्रीमंत असल्याने सगळे तिला घाबरून राहायचे त्यामुळे सगळ्यांनी महिपतीविरुद्ध जबानी दिली असती अशी भीती वाटल्याने त्याला पोलिसांनी अटक करायच्या अगोदर तिकडून पळून यावे लागले. खरेतर अनिताला तिथेच ठेवून पळणे सोपे गेले असते

पण एवढ्याश्या बाळाला ह्या राक्षसांच्या हातात देऊन पळून जाणे त्याला योग्य न वाटल्याने तो अनिताला घेऊन तिकडून पळाला. स्वतः त्यात अडकू नये म्हणून उपकार केल्यासारखे पणजीआजीने त्यांच्याविरुद्ध केलेली तक्रार मागे घेतली.

नेहमी तेचतेच सांगून तिच्या मनात आपण आईच्या मृत्यूचा बदला घेतला पाहिजे हे तिच्या मनावर बिंबवायला सुरुवात केली. अनिताला जेव्हा त्यांनी पहिल्यांदा आईला दाखवले त्यावेळी ती दोनेक वर्षीचीच असेल पण तेव्हासुद्धा ती आईला बघून मारायला धावली होती पण महिपतीने तिला पकडून ठेवले व वेळ आली की आपण ह्यांना मारुयात असे समजावून सांगितले. लहानपणापासून हिच्या मनात द्वेषाचे बीज रोवून तिचे बिचारीचे बालपण ह्यादोघांनी खाऊन टाकले होते.

माझा जन्म होऊन आई देवाघरी गेली. तिथूनच त्यांनी हळूहळू त्यांचे आयोजन अमलात आणणे सुरु केले. बाबा स्मशानातून परत येत असताना बरोबर त्यांच्या वाटेत त्यांनी ही फांदी टाकली आणि बाबांनी ती उचललीसुद्धा! महिपतीने ती फांदी काढून टाकून तिथे दुसरे मोगऱ्याचाही रोप आणून लावले. त्याचवेळी त्यांनी स्वतःच्या घरीसुद्धा तीन-चार रोपं लावली. त्याची खूप छान देखभाल करून त्यांना चांगले वाढवले. जर आमच्या घरी मोगऱ्याचे झाड वाढले नाहीतर त्यातले चांगले वाढलेले एक

झाड ते तिकडे नेऊन लावणार होते. आमचा मोगरा आईची देण असल्याने सगळेच त्याची काळजी घ्यायचे, त्या प्रेमाने तोपण खूप छान वाढला होता.

महिपती व रूपाने काही गुंडाना कामावर ठेवले व त्यातल्याच एकाला आमच्या घरी कामाला पाठवले. त्याने स्वतःचे नाव राजाराम सांगून तो आमच्याघरी कामाला लागला. आमच्या सगळ्यांचा विश्वास संपादन केला असल्याने तो आमच्या घरी कधीही येणेजाणे करू शकायचा. श्रीजसा कॉलेजमध्ये जायला लागला त्यावेळीच अनिताने कॉलेजमध्ये ऍडमिशन घेतली. तिने त्याचेच सगळे विषय घेतल्याने दोघे एकाच वर्गात होते. तिने त्याचवेळी त्याला पटवण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याने कधी तिच्याकडे लक्षसुद्धा दिले नाही. खूप प्रयत्न करूनही जेव्हा तिला त्याला पटवणे जमले नाही तेव्हा तिने माझ्याशी मैत्री करण्याचा डाव आखला आणि माझ्याबरोबर मास्टर करण्यासाठी म्हणून ऍडमिशन घेतली. मीमात्र तिच्या जाळ्यात लगेच अडकले गेले. आमच्या दोघींची खूपच चांगली मैत्री झाल्याने तिने घरी शिरकाव करून सगळ्यांच्या मनात आपले स्थान तयार केले. तिचे इतके चांगले वागणे बघून कोणी तिच्यावर संशय घेतला नाही.

त्यांनी एकदम व्यवस्थित नियोजन केले होते. अनिता श्रीशी लग्न करून आमच्या घरची होणार होती. माझ्याशी एकदम चांगली मैत्री करून तिने माझा व घराच्यांचा विश्वास संपादन करायचा. हळूहळू मला वेडी करून

वेड्यांच्या इस्पितळात भरती करायचे. माझ्याकडून नंतर हळूच सही घेऊन सगळे श्रीच्या नावाने करायचे. शिवाय त्याबरोबरच श्रीचेपण मृत्युपत्र करून त्याची सगळी मालमत्ता अनिताच्या नावावर करायची. एकदा मी सही करून सगळी जागा रीतसर श्रीच्या नावाने झाली की नंतर श्रीला मारून टाकून सगळी संपत्ती स्वतःच्या नावावर करायची.

हळूहळू त्यांच्या आयोजनाप्रमाणे त्यांनी आईच्या श्राध्दाचे निमित्त करून मोगऱ्याच्या माध्यमातून आम्हाला घाबरवायला सुरुवात केली. राजारामनेच त्याचा आकार बदलला होता, दुसरा मोगरा परत आणून लावला होता शिवाय तिथे परत रोप उगवू नये म्हणून त्याजागी ॲसिड टाकले. तेव्हा त्याने लगेच तिथली सगळी माती काढून परत नवीन माती टाकून थोड्यादिवसांनी दुसरे रोप लावले. तो घरातली बाकीचीपण सगळी कामे करत असल्याने त्यानेच सगळीकडे बाकीची यंत्रणा बसवली होती. त्यांच्या नियोजनाप्रमाणे सगळे काही व्यवस्थित चालू होते. त्याला मदत करायला म्हणून खोटे कारण सांगून अनितानेसुद्धा घरी शिरकाव केला. आम्हाला सगळ्यांना घाबरावयाला ते यशस्वी झाले होते, मीसुद्धा जवळपास वेडीच होणार होते. पण जेव्हा अनिताबरोबर माझे जमेनासे झाले, तिथे त्यांचे गणित चुकले.

पण त्यांनी फक्त एकाच नियोजनावर अवलंबून न राहता अजून एक नियोजन केले होते. अनिताची ही खोटी आई रूपा हिचा वेश्याव्यसाय असल्याने महिपतीने हळूहळू तिच्याकडे पांढरपेशा लोकं आणायला सुरुवात केली. अश्या लोकांना बाहेर मजा करायची असते पण स्वतःचे पितळ उघडे पडू नये म्हणून भीतपण असतात. ह्यांनी त्याचाच फायदा घेऊन बाबांच्या बँकेतल्या लोकांना हिच्याकडे आणायला सुरुवात केली. त्यांनी बरोबर त्यांना धमकावून रुपाला बाबांच्याच बँकेत कामाला लावले आणि काही वर्षांनी त्यांच्याच शाखेमध्ये बदली करून घेतली. तिचे खरे नाव सावित्री पांढरे.

इतकी वर्षे सगळे दुसरे लग्न कर म्हणून मागे लागलेले असताना, खूपजणींनी त्यांच्याबरोबर लग्न करायची इच्छा स्वतःहून बोलून दाखवूनसुद्धा एकदाही कोणाच्याही बंधनात न अडकणारे बाबापण हिच्या जाळ्यात बरोबर अडकले. त्यामुळे अनिता घराबाहेर पडल्यावर पांढरेबाईंनी आमच्या घरी प्रवेश केला.

एकेदिवशी राजाराम घरावर चढला असताना हवालदार काकांनी त्याला बघितले. त्यावर त्याने काहीतरी दुरुस्तीचे काम करत आहे म्हणून खोटे सांगून वेळ मारून नेली पण आपण पोलिसांच्या जाळ्यात अडकू

शकतो असे वाटून त्याने "वडील खूप आजारी आहेत, तेव्हा आता ह्यापुढे मी गावी जाऊन त्यांचे दुकान सांभाळणार आहे" असे सांगून पळ काढला.

इतके मोठे कारस्थान कोणी करू शकतो ह्यावर विश्वासच बसत नव्हता. पैशासाठी माणूस इतक्या खालच्या थराला कसा काय जाऊ शकतो? स्वतःच्या बायकोबद्दल प्रेम नाही, काही भावना नाहीत ठीक आहे पण मुलीबरोबर कोण असे वागू शकतो? सुडापायी, संपत्तीपायी आपल्या मुलीचा असा वापर कोण कसा घेऊ शकतो? पण म्हणतात ना वाईटाचा शेवटी नाशच होतो.

हे सगळे जेव्हा मामाला, जानकी आजीला (आईची आई) समजले तेव्हा त्यांना खूप वाईट वाटून ते आम्हाला भेटायला घरी आले. झालेल्या गैरसमजाबद्दल त्यांनी आजी व काकूची माफी मागितली. दोन्ही आजी व मामा अनिताला भेटायला जेलमध्ये गेले. अगोदर त्यांना तिच्याबरोबर कसे वागावे हे समजत नव्हते. तिलासुद्धा आम्ही लोकं खरेच चांगले आहोत की नाही हे कळत नव्हते. आम्ही श्री व बाबांना वाचवायला असे वागत आहोत किंवा सगळे खोटे पुरावे जमा केले असतील का? नक्की आमचे बरोबर आहे की तिच्या बाबांनी सांगितलेले खरे, हे तिला कळत नव्हते.

काय झाले? कोणी केले? कोणाचे चुकले? कोणाचे बरोबर आहे? हे काहीही न बोलता आजीने तिला जवळ घेतले. जानकी आजीने तिला जवळ घेऊन,"अगदी रूपालाच बघत आहे असे वाटत आहे. आमची रूपा खूप गोड होती, एकदम सरळ, शांत, सोशिक. आईला खूप मोठा आधार होता रूपाचा. अगदी शेवटपर्यंत आईची लेक बनून राहिली ती! त्यादिवशी आई रुपाला सोडून का गेली? ह्याचा तिला शेवटपर्यंत पश्चाताप होत होता. रूपाच्या मृत्यूला ती स्वतःलाच जबाबदार धरत होती. शेवटीशेवटी तर ती फक्त रुपाचेच नाव घेत होती. आज तुला बघायला आई पाहिजे होती. खूप आठवण यायची तिला तुझी! महिपतीने तुला कुठे ठेवले असेल? तुझे आबाळतर होत नसतील ना? त्याने नक्की तुझ्याबरोबर काय केले असेल? असे खूप प्रश्न तिला पडायचे. महिपतीने तिला घरी चिट्ठी पाठवली होती त्यात त्याने जर महिपतीविरुद्धची तक्रार मागे नाही घेतली तर तो तुला वेश्येकडे विकेल आणि कोणालाच तुझा काही पत्ता लागणार नाही, अशी धमकी दिल्यामुळे तिने त्याच्याविरुद्धची तक्रार मागे घेतली. हे सगळे अनिताला खोटेच वाटत होते. पण आत्ताच पणजीआजीची सगळी कागदपत्र पोलिसांकडे सुपूर्त केली आहेत, त्यात तुझ्या बाबांचेसुद्धा पत्र आहे, हे सांगितले तेव्हा तिने ते पत्र मागितले पण आजीने ते पोलिसच तुला दाखवू शकतील हे सांगितले.

हळूहळू अनिताला सत्यपरिस्थितीची माहिती पडली. तिच्या स्वतःच्याच बाबांनी केवळ संपत्तीसाठी तिचा वापर केला होता, तिचे बालपण नष्ट केले होते. तिची खोटी आई तिच्याबरोबर खोटेखोटे प्रेमाचे नाटक करत होती. उद्या जर श्री व बाबा ह्यातून निर्दोष सुटले तर सगळे पुरावे अनिताच्या विरुद्ध होते. तिच्या स्वतःच्या बाबांनी तिलाच फसवायचे आयोजन केले होते. तिला हे सगळे सहन न होऊन स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला. त्या जेलमध्येच एका बाईकडून तिच्याकडे असलेल्या सुरीने तिने हात कापून घ्यायचा प्रयत्न केला. पण नशिबाने त्यात ती वाचली.

महिपती व सावित्रीविरुद्ध सगळे पुरावे सिद्ध झाले. महिपतीला फाशीची तर सावित्री पांढरेला जन्मठेपेची शिक्षा झाली. तर अनिताला ह्या सगळयात बळीचा बकरा बनवल्याने शिवाय आम्ही सगळयांनीसुद्धा अनिताच्या बाजूने जबानीची दिल्याने तिला फक्त एक वर्षाची शिक्षा झाली. बाकीच्या साथीदारांनापण शिक्षा झाल्या होत्या.

अनिता जेलमधून सुटायच्या दिवशी श्री स्वतः तिला घ्यायला गेल्यावर तिला खूप मोठा धक्का बसला. आम्ही तिला स्वीकारू असे वाटतच नव्हते पण काकूनेसुद्धा तिला मनापासून स्वीकारले होते.

अजूनही मोठे काम बाकी होते- अमितच्या आईवडिलांना पटवणे. आमच्याबरोबर इतका सगळा प्रकार झाल्याने त्यांना आमच्याबरोबर कुठलेही नाते नको होते, त्यात मला मध्ये खूपच मोठा मानसिक धक्का बसल्याने रुग्णालयातपण दाखल केले होते. एकदा मानसिक रुग्ण असलेली व्यक्ती परत व्यवस्थित बरी होऊच शकत नाही अशी त्यांची समजूत होती.

मोने गुरुजी व काकूंनी त्यांना समजावयाचा खूप प्रयत्न केला पण त्यांनी काही ऐकूनच घेतले नाही. अमितच्या आईवडिलांची परवानगी मिळेपर्यंत लग्न करायचे नाही हे आम्ही दोघांनीही ठरवले होते पण ते मानतच नव्हते. मला होकार देणे सोडाच पण त्यांनी आता त्याच्यासाठी स्थळ शोधणे सुरु केले. त्याच्या आईने अमितने माझ्याशी लग्न करू नये खूप काही वेगवेगळे प्रयोग करून प्रयत्न करत होती. त्यात तिने त्याच्याशी बोलणे बंद केले, भूखहडताळ करून बघितला. इतक्या साऱ्या धमक्या देऊनसुद्धा अमित बधत नाही हे बघून शेवटचा उपाय म्हणून त्याच्या आईने स्वतःच्या जीवाचे काही बरेवाईट करून घ्यायची धमकी दिली आणि ती बरोबर लागू पडली. अमितने घाबरून तिने पसंद केलेल्या कुठल्याही मुलीबरोबर लग्न करायला होकार देऊन मला भेटून माझी माफी मागून निघून गेला. घरच्यांना आता माझे कसे होणार म्हणून काळजी लागली पण मी खंबीर बनून शांत राहिले.

दुसऱ्यादिवशी सकाळी अमितच्या घरी त्याच्या आईशिवाय कोणी नसेल ह्याची खात्री करून घरी गेले. मला बघून त्यांना काय करावे तेच कळाले नाही. मी तिथे जाऊन बसले. त्यांचे आमच्याबरोबर खूप चांगले संबंध होते त्यामुळे आमच्याबरोबर जे काही झाले त्याचे त्यांना खूप वाईट वाटत होते. मला बघून त्यांना अगदी भरून आले. मी कशी आहे वगैरे चौकशी करून त्यांनी त्यांना मला सून म्हणून नकार देताना खूप वाईट वाटत आहे हे सांगितले. त्यावर मी त्यांना,"काकू, तुम्हाला आमच्याबरोबर जे काही झाले त्यामुळे तुम्हाला मी सून म्हणून नको आहे, हे मला अगदी मान्य आहे. पण ह्यात माझी काय चूक आहे? काकू मला एक सांगा माझ्याजागी जर दुसरी मुलगी असती तर ती इतकी खंबीर राहिली असती का? माझ्याबरोबर किती, काय झाले आहे हे सगळे तुम्हाला माहित आहे. जेव्हा खूपच झाले त्यावेळी मला असे वाटले की माझी आई खरेच माझ्याबरोबर राहायला, माझी काळजी घ्यायला परत आली आहे पण माझी आई बाकीच्यांबरोबर असे वागूच शकत नाही, कोणाला त्रास देऊ शकत नाही असेपण वाटत होते. त्यामुळे माझी द्विधा अवस्था होऊन मला रुग्णालयात दाखल केले गेले. पण मी आले ना त्यातून लगेच बाहेर." माझे ऐकून काकू रडायला लागल्या. त्यांनी मला जवळ घेऊन,"मिताली, मला खरेच तुझे खूप वाईट वाटतंय ग! तुमचे सगळेच कुटुंब ह्या परिस्थितून कसे काय गेले? तुम्ही सगळे इतके सगळे होऊनही कसे काय एवढे खंबीर राहिलात ह्याचे सगळयांनाच आश्चर्य वाटत आहे. इतके सगळे होऊनही तुम्ही सगळे एकत्र

राहिलात. खरेतर श्री आणि तुझ्या बाबांविरुद्धच सगळे पुरावे होते तरीही तुम्ही त्यांच्याबरोबर राहिलात. मामा घ्यायला आलेला असताना त्याला नकार देऊन तू इथेच राहिलीस. सोनलने आपला मुलगा जेलमध्ये असूनसुद्धा तुझ्यावर रागराग न करता उलट तुझी जास्त काळजी घेतली. सगळ्यांना तुमचे कौतुक वाटत आहे." अमित आत येत,"आई तुला हे सगळे मान्य आहे मग तू हिला स्वीकारत का नाहीस?" अमितला बघून काकूंना खूप राग आला,"मला वाटले मिताली तू मला भेटायला आली आहेस. तुम्ही सगळ्यांनी मिळून माझ्याविरुद्ध हे कारस्थान रचले आहे." अमित,"आई कारस्थान कसले?" काकू,"मग काय, मी आपली हिच्याशी खरेच मनापासून बोलत होते तर तू बरोबर तोच धागा पकडून मला ब्लॅकमेल करायला आलास". मी मध्ये पडून,"काकू, मला खरेच माहित नव्हते अमित असा येईल म्हणून. तुम्ही सगळे घरी नसताना एकदा मला काकुंशी बोलायचे असे काल मी त्याला सांगितले होते. तो असा येईल असे मला अजिबात वाटले नव्हते" असे मी म्हणेपर्यंत अमितचे बाबासुद्धा आत आले, त्यांच्याबरोबर आमच्या घरातले सगळे आले. अमितचे बाबा त्याच्या आईला म्हणाले,"काल अमितला जेव्हा मितालीने फोन केला तेव्हा मी तिथेच होतो आणि मी त्या दोघांचे सगळे बोलणे ऐकले. मला असे वाटले की तू चिडून तिला घराबाहेर हाकलून देशील किंवा परत काहीतरी स्वतःला करून घेशील त्यामुळे मी अमितला आपण इथेच थांबू म्हणून सांगितले. काही झाले तर सगळे असावेत म्हणून अमितने तिच्या सगळ्या

घरच्यांनासुद्धा बोलावून घेतले. खरेतर मलापण हे स्थळ पसंद नव्हते पण तू सगळे सांभाळत होतीस, लग्न कसे होऊ नये म्हणून प्रयत्न करत होतीस म्हणून मी शांत बसलो होतो. आता आम्ही सगळयांनी तुमच्या दोघींचे सगळे बोलणे ऐकले. मितालीबद्दल असलेली सहानभूती जाऊन आता मला तिच्याबद्दल आणि तिच्या घरांच्याबद्दल खूप अभिमान वाटत आहे. तू विचार कर, ह्यांच्याजागी दुसरे कोणीही असते तर त्यांचे कुटुंब उध्वस्त झाले असते पण इतके सगळे त्यांच्याबरोबर होऊनही ते सगळे एकत्र राहिले, त्यांची एकी कोणीही तोडू शकले नाही. मला असे वाटत आहे, आपण खूप नशीबवान आहोत की मिताली अमितच्या प्रेमात आहे. दुसरी कुठली मुलगी आपल्या घरी लग्न करून आली तर ती कशी असेल आपल्याला माहित नाही. आपल्या मुलाला आपल्यापासून दूर केले, वेगळी राहिली तर आपण काय करू शकणार? पण मितालीबद्दल मला खात्री आहे ती आपल्या कुटुंबाला नेहमी एकत्र ठेवेल. रेवती उद्या लग्न होऊन सासरी जाईल त्यावेळी आपण असलोनसलो तरीही तिला माहेर कायम असेल. बघ विचार कर, तू जो निर्णय घेशील तो आम्हासगळयांना मान्य असेल" अमितच्या वडिलांचे बोलणे ऐकून आम्ही सगळे भारावून गेलो. काहीही न बोलता त्याची आईमात्र तिथून उठून निघून गेली. आम्ही सगळे उदास झालो.

आजीने आम्हाला सगळ्यांना 'चला' म्हणून सांगून ती उठल्यावर आम्ही सगळेच उठून बाहेर जाणार तेवढ्यात त्याच्या आईने आम्हाला 'बसा' म्हणून सांगितल्यावर त्यांच्याकडे बघितले तर त्या ताटात ओटी घेऊन आल्या होत्या. मला त्यांनी एक साडी देऊन ‘नेसून ये’ म्हणून सांगितले. अनिताबरोबर आत जाऊन मी साडी नेसून आले. अमित झब्बा, टोपी घालून तिथे बसला होता. त्याच्याशेजारी मला बसायला सांगितले. तोपर्यंत बाबा बाहेरून आले. मोने गुरुजी व काकूसुद्धा आले. गुरुजींनी हसत," मिताली अगदी चांगला दिवस बघूनच बोलायला आली आहे बरं! आज अगदी चांगला मुहूर्त आहे." असे म्हंटल्यावर सगळ्यांनी हसून होकार दिला आणि तिथेच आमचा साखरपुडासुद्धा झाला!!

# मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

**9987737237**